# अंकशास्त्र

संपादक: द. शं. केळकर



सं. ठाणें
१८८२
बध
REFBK-0018430

१८०३०

८८८९
सं५५
३१.३.८८
निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ८८८९ वि: १७५
नोंद दि. ३१-३-८८
क्र. २९८

हिंदुधर्मसंरक्षक आद्य शंकराचार्य लिखित

# मंत्रशास्त्र

संपादक :
ज्योतिषाचार्य, मंत्रशास्त्रज्ञ
द. शं. केळकर

RFFBK-0018430

श्रीगजानन बुक डेपो प्रकाशन, मुंबई २८.

प्रकाशक : आर. व्ही रघुवंशी, श्रीगजानन बुक डेपो, कबुतरखाना,
भवानीशंकर रोड, दादर, मुंबई २८

© द. शं. केळकर

प्रथमावृत्ती, २१ मार्च १९७२

मूल्य १० रुपये

मुखपृष्ठ : चित्रकार वांदोडकर, मुंबई

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, सदाशिव पुणे ३०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ८८५९ वि: ...
क्रमांक २९८६ नों. दि. ...

जिने आयुष्यात ज्ञानार्जनाचा मंत्र
मला दिला, असंख्य लोकांना विभूती देऊन बरे केले;
त्या आमच्या मातोश्री भागीरथीबाई केळकर
यांच्या स्मृतीस ही कृती
अर्पण असो

आद्य शंकराचार्यांनी हा ग्रंथ लिहून भारतीयच नव्हे तर जगातील मानव जातीवर उपकार करून ठेवले आहेत. रॉयल एशियाटिक सोसायटीचे आम्ही सभासद असल्यामुळे हे पुस्तक आमच्या हाती लागले. आम्ही ते सावंतवाडीस आणले. आमचे चहाते श्री. मनोहर चिंतामण गोंधळेकर डेप्युटी इंजिनियर ह्यांनी हस्तलिखित प्रत तयार करण्याचे आम्हास कबूल केले, त्याप्रमाणे आपले काम साभाळून दोन महिने रात्रंदिवस मेहनत करून हे पुस्तक तयार झाले. मराठीकरण आम्हा दोघाचे आहे. आमचे स्नेही, चोखदळ प्रकाशक रघुवंशी ह्यांनी पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची जबाबदारी घेतली म्हणून हे पुस्तक मराठीत येत आहे. आर्त जनतेची दुःखे ह्या ग्रथातील उपासनेने दूर होतीलच. प्रथमच अनुष्ठान पद्धती दिली आहे. ती आचरून मग जप सागितला तेवढा करावा. फळ मिळते. मंत्र उपसानेने आर्तांची दुःखे दूर होतात. कामना पुऱ्या होतात, हे आम्ही पाहिले आहे. आद्य शकराचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथास पुष्टी ती काय जोडायची ? संकेश्वर मठाचे शंकराचार्यांनी हा ग्रथराज प्रसिद्ध होत असता आम्हाला पत्र पाठवून आमच्या कार्याचा गौरव केला आहे. ते पत्र आम्ही 'तुमचे भाग्य' मासिकात प्रसिद्ध केलेच आहे. जनहित झाले म्हणजे प्रकाशक व आमच्या श्रमाचे चीज होईल.

द. शं. केळकर

१८८३०

# अनुष्ठान-पद्धती

कोणत्याही मंत्राचे अनुष्ठान करताना, खाली लिहिल्याप्रमाणे क्रम पाळावा.

१. **संकल्प** :– शुभदिनी, शुद्ध होऊन शुचिर्भूतपणे अनुष्ठानाच्या जागी प्रवेश करून, आसनावर पूर्वाभिमुख बसून, देशकालाचा उच्चार करून, आपण हे अनुष्ठान, कोणत्या कारणासाठी करीत आहोत, ते सांगून, अनुष्ठान करीत असल्याचा संकल्प करून, उदक सोडावे.

२. **आसनशुद्धी** :– संकल्प करून झाल्यावर, आसनशुद्धी मंत्राने आसन शुद्ध करावे.

३. **न्यास** :– यानंतर करन्यास व हृदयन्यास करावा. तो मंत्रासहित सोबत दिला आहे. प्रत्येक मंत्रास ऋषी, देवता, छंद, बीज, कीलक असतात. त्याचाही प्रथम उच्चार करणे आवश्यक असते. या सौंदर्यलहरींचा ऋषी, देवता, छंद इत्यादी सोबत दिले आहेतच. ते म्हणून मग न्यास करावेत.

४ **देवताध्यान** :– न्यास म्हणून झाल्यावर, देवीचे ध्यान करून, ती यंत्राधिष्ठित झाली आहे, अशी कल्पना करून, "**आगच्छ वरदे देवी, जपे मे संनिधौ भव,**" असे तिला आवाहन व विनंती करावी. तिची मानसिक पूजा करावी.

५. **मंत्रजप** :– यानंतर मंत्रजप करावा. मंत्रजप एकाग्रतेने देवीचे ध्यान मनात कल्पून, पश्यती वाचेत करावा.

६. **नैवेद्य** :– मंत्रजप पूर्ण झाल्यावर सांगितलेला नैवेद्य दाखवून धूपदीप दाखवून देवीस निरोप द्यावा. त्यापूर्वी झालेला जप देवीस समर्पण केला असे म्हणून, उदकाने ओली झालेली माती कपाळावर टिळ्याप्रमाणे लावून मगच उठावे.

अनुष्ठान काळात सर्व नियम पाळून राहावे.

आद्य शंकराचार्यांनी हा ग्रंथ लिहून भारतीयच नव्हे तर जगातील मानव जातीवर उपकार करून ठेवले आहेत. रॉयल एशियाटिक सोसायटीचे आम्ही सभासद असल्यामुळे हे पुस्तक आमच्या हाती लागले. आम्ही ते सावंत-वाडीस आणले. आमचे चहाते श्री. मनोहर चिंतामण गोंधळेकर डेप्युटी इंजिनियर ह्यांनी हस्तलिखित प्रत तयार करण्याचे आम्हास कबूल केले, त्याप्रमाणे आपले काम सांभाळून दोन महिने रात्रं-दिवस मेहनत करून हे पुस्तक तयार झाले. मराठीकरण आम्हा दोघांचे आहे. आमचे स्नेही, चोखंदळ प्रकाशक रघुवंशी ह्यांनी पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची जबाबदारी घेतली म्हणून हे पुस्तक मराठीत येत आहे. आर्त जनतेची दुःखे ह्या ग्रंथातील उपासनेने दूर होतीलच. प्रथमच अनुष्ठान पद्धती दिली आहे. ती आचरून मग जप सांगितला तेवढा करावा. फळ मिळते. मंत्र उपसानेने आर्तांची दुःखे दूर होतात. कामना पुऱ्या होतात, हे आम्ही पाहिले आहे. आद्य शंकराचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथास पुष्टी ती काय जोडायची ? संकेश्वर मठाचे शंकराचार्यांनी हा ग्रंथराज प्रसिद्ध होत असता आम्हाला पत्र पाठवून आमच्या कार्याचा गौरव केला आहे. ते पत्र आम्ही ' तुमचे भाग्य ' मासिकात प्रसिद्ध केलेच आहे. जनहित झाले म्हणजे प्रकाशक व आमच्या श्रमाचे चीज होईल.

द. शं. केळकर

१६७३०

# अनुष्ठान-पद्धती

कोणत्याही मंत्राचे अनुष्ठान करताना, खाली लिहिल्याप्रमाणे क्रम पाळावा.

१. **संकल्प** :– शुभदिनी, शुद्ध होऊन शुचिर्भूतपणे अनुष्ठानाच्या जागी प्रवेश करून, आसनावर पूर्वाभिमुख बसून, देशकालाचा उच्चार करून, आपण हे अनुष्ठान, कोणत्या कारणासाठी करीत आहोत, ते सांगून, अनुष्ठान करीत असल्याचा संकल्प करून, उदक सोडावे.

२. **आसनशुद्धी** :– संकल्प करून झाल्यावर, आसनशुद्धी मंत्राने आसन शुद्ध करावे.

३. **न्यास** :– यानंतर करन्यास व हृदयन्यास करावा. तो मंत्रासहित सोबत दिला आहे. प्रत्येक मंत्रास ऋषी, देवता, छंद, बीज, कीलक असतात. त्याचाही प्रथम उच्चार करणे आवश्यक असते. या सौंदर्य-लहरींचा ऋषी, देवता, छंद इत्यादी सोबत दिले आहेतच. ते म्हणून मग न्यास करावेत.

४ **देवताध्यान** :– न्यास म्हणून झाल्यावर, देवीचे ध्यान करून, ती यंत्राधिष्ठित झाली आहे, अशी कल्पना करून, **" आगच्छ वरदे देवी, जपे मे संनिधौ भव, "** असे तिला आवाहन व विनंती करावी तिची मानसिक पूजा करावी.

५. **मंत्रजप** :– यानंतर मंत्रजप करावा. मंत्रजप एकाग्रतेने देवीचे ध्यान मनात कल्पून, पश्यंती वाचेत करावा.

६. **नैवेद्य** :– मंत्रजप पूर्ण झाल्यावर सांगितलेला नैवेद्य दाखवून धूपदीप दाखवून देवीस निरोप द्यावा. त्यापूर्वी झालेला जप देवीस समर्पण केला असे म्हणून, उदकाने ओली झालेली माती कपाळावर टिळ्याप्रमाणे लावून मगच उठावे.

अनुष्ठान काळात सर्व नियम पाळून राहावे.

## अनुष्ठान न्यास-ध्यानादी मंत्र

श्रीगणेशाय नमः । अस्य श्रीसौन्दर्यलहरीस्तोत्रस्य गोविन्द षिः, अनुष्टुप छंन्दः, श्रीमहात्रिपुरसुन्दरी देवता, " शिवःशक्त्यायुक्त " इति बीजम्, " सुधा-सिन्धोर्मध्ये " इति शक्तिः, "जपो जल्प-शिल्पम्" इति कीलकम्, अस्माक सर्वेषां सकुटुम्बाना क्षेम-स्थैर्यायुरारोग्य-धन-धान्य-सम्पत्ति-सन्तत्यवाप्तिद्वारा ऐहिकामुष्मिक-सकलाभीष्टसिद्ध्यर्थं श्रीमत्त्रिपुरसुन्दरीप्रीत्यर्थंच सौन्दर्यलहरी स्तोत्रपा ठम करिष्ये ।

अथ करन्यासः

ॐ ह्राँ अङ्गुष्ठाभ्यां नम ।
ॐ ह्रीँम् तर्जनीभ्यां स्वाहा ।
ॐ ह्रूँ मध्यमाभ्यां वषट् ।
ॐ ह्रैँम् अनामिकाभ्यां हुँ।
ॐ ह्रौँम् कनिष्ठिकाभ्यां वौषट् ।
ॐ ह्रः करतलकरपृष्ठाभ्यां फट् । इति करन्यास
अथाङ्गन्यासः ।
ॐ ह्राँ हृदयाय नमः ।
ॐ ह्रीँम् शिरसे स्वाहा ।
ॐ ह्रूँ शिखायै वषट् ।
ॐ ह्रैँम् कवचाय हुँ ।
ॐ ह्रौँ नेत्रत्रयाय वौषट् ।
ॐ ह्रः अस्त्राय फट् ।

अथ ध्यानम् ।

लौहित्यनिर्जितजपाकुसुमानुरागां पाशाङ्कुशौ धनुरिषूनपि धारयन्तीम् ।
ताम्रेक्षणामरुणमाल्यविशेषभूषां ताम्बूलपूरितमुखीं त्रिपुरां नमामि ॥

### अथ पञ्चोपचाराः ।

लं पृथिव्यात्मन्यै नमो गन्ध परिकल्पयामि ।
हं आकाशात्मन्यै नमः पुष्पं परिकल्पयामि ।
यं वाय्वात्मन्यै नमो धूप परिकल्पयामि ।
वं वन्ह्यात्मन्यै नमो दीप परिकल्पयामि ।
रं जलात्मन्यै नमो नैवेद्य परिकल्पयामि ॥

० ० ०

# सौंदर्यलहरी या महान ग्रंथराजाचा परिचय

श्री त्रिपुरसुंदरी ललिता देवीचे वर्णन करणारे सौंदर्यलहरी हे महान काव्य इ. स. ८०० चे सुमारास, श्रीविद्येचे उपासक शंकर-भगवत्-पाद म्हणजेच आद्यशंकराचार्य यांनी लिहिले. हे काव्य म्हणजे खरोखर सौंदर्याच्या लहरीच आहेत. याचे वैशिष्ट्य म्हणजे १) प्रतिभाशील काव्यशक्तीचा नाजुक आविष्कार, २) त्रिपुरसुंदरी स्तोत्र, ३) कौलमार्गाने पवित्र उपासना करणाऱ्यासाठी मंत्रयुक्त स्तोत्र. यातील प्रत्येक श्लोक हा मंत्ररूपच असून त्या प्रत्येक श्लोकासाठी यंत्र, उपासना पद्धती व फलप्राप्ती दिली आहे. दैनंदिन उपासनेत निष्काम भक्तियुक्त अंतःकरणाने हे काव्य वाचणाराचे जीवनात फार मोठे सुपरिणाम निश्चितपणे घडून येतील. ४) श्रीविद्योपासना ही वेदप्रणीत उपासना असल्यामुळे ही उपासनाही आगम तंत्रयुक्त उपासना आहे.

या स्तोत्रात एकूण १०३ श्लोक समाविष्ट असून त्यांत दोन भाग पडतात. पहिल्या ४१ श्लोकांचे समुच्चयास "आनंद-लहरी" व ४२ ते १०३ श्लोकांस "सौंदर्य-लहरी" असे नाव आहे. यापैकी आनंद-लहरी या भागात त्रिपुरसुंदरीची आंतरयाग उपासना (योगमार्गाने श्रीचक्र स्वतःचे शरीरात कल्पून केलेली उपासना) व सौंदर्यलहरीत बहिर्याग उपासना (देवीची स्थापना यंत्रावर शरीराचे बाहेर कल्पून केलेली उपासना, म्हणजेच कौलमार्गी उपासना) दिग्दर्शित केली आहे. म्हणजेच या काव्यात एका बाजूने योगमार्गाने निर्विकल्प समाधीचा रस्ता, तर दुसऱ्या बाजूने सगुणोपासनेद्वारा निर्विकल्प समाधीचाच रस्ता दाखवून, शेवटी अंतिम उद्दिष्ट परमेश्वरप्राप्ती सूचित केली आहे. या स्तोत्राचे पहिले ४१ श्लोक, म्हणजे आनंद-लहरी नित्य उपासनेत ठेवल्यास, साधकाची कुंडलिनी-शक्ती जागृत होते असा लेखकाचा दावा आहे.

या पुण्यभूमीवर भरतखंडात अद्यापीही टिकून असणाऱ्या सनातन धर्माचे वैशिष्ट्य म्हणून, उपासनामार्गातील लवचिकता हे दाखविता येईल. लहानापासून थोरापर्यंत, तर वर्णविचार न करता ज्याच्या त्याच्या पात्रतेनुसार, प्रत्येकाला

आध्यात्मिक प्रगती करता येण्यासारखे अनेक मार्ग, या लवचिकपणाचे उदाहरण म्हणून दाखविता येईल. वेदोपासना ही श्रेष्ठच यात शंकाच नाही, पण ही ज्याला शक्य नाही त्याच्यासाठीच वेदोप्रणीत पचदेवताची सगुण उपासना, किंवा या पचदेवतातील एखाद्या अगर आपल्या आवडीप्रमाणे दुसऱ्याही दवताची पूजा ही वेदमान्यता आहे. श्रीविद्या हा याच उपासनेतला एक प्रकार म्हणता येईल. ही उपासना सगुण-निर्गुण अशा दोन्ही प्रकारांनी प्रत्येकास आपल्या पात्रतेनुसार करता येते. श्रीविद्या उपासना म्हणजे त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वरी शक्तीची स्रीरूप कल्पून केलेली उपासना, असे म्हणण्यास हरकत नाही.

ही उपासना दोन प्रकारानी करता येते हे वर लिहिलेच आहे. या दोन प्रकारास १ ) निर्गुणोपासना, आतरयाग असे व २ ) सगुणोपासनेस बहिर्याग असे नाव आहे. यात आतरयाग म्हणजे स्वशरीरात श्रीचक्र कल्पून, कुडलिनी शक्ती योगमार्गाने सर्व चक्राचा व ग्रथींचा भेद करून सहस्रार चक्रात नेऊन तिचे शिवाशी मीलन करणे. ही उपासना अर्थातच सर्वश्रेष्ठ आहे आणि या उपासनामार्गास समयाचार असे संबोधतात.

बहिर्यागात, श्रीयत्र हे सोन्यासारख्या शुद्ध धातूचे बनवून, त्या यत्रात मध्यबिंदूत शक्तिरूप देवता कल्पून, त्या देवतेची मत्र, तंत्रद्वारे केलेली उपासना असते. या मार्गास कौलमार्ग असेही नाव आहे. या कौलमार्गात ६४ वेगवेगळ्या पद्धतींनी उपासनेचे मार्ग अगर प्रकार असून, ते मार्ग ६४ तत्रे म्हणून ओळखले जातात. या तत्रानी क्षुद्र सिद्धी लवकर प्राप्त होत असल्यामुळे व उपासनेतील सुलभतेने ही तत्रे लोकप्रिय होण्यास वेळ लागला नाही. पण नतर ही उपासना, अविवेकी, हलक्या वृत्तींच्या लोकांच्या हाती जाऊन, लोक वामाचाराकडे वळले. कापालिक, क्षपणक वगैरे अघोरी पंथ निर्माण होऊ लागले. सगुणोपासनेमुळे सामान्य माणसास पेलणारी ही उपासना, मूळ उद्देश "सगुणोपासनेतून निर्गुणोपासना हा बाजूलाच पडून लोक सिद्धिप्राप्तीच्या मोहात फसून दुराचारी बनू लागले. समाजात सात्त्विक उपासनेऐवजी अघोरी उपासना मूळ धरू लागल्या.

अर्थातच, तत्कालीन विचारवतानी, समाजधुरीणानी हे प्रकार पाहून, हे वाट चुकलेले उपासक पुन्हा शुद्ध भूमिकेवर यावेत यासाठी प्रयत्न सुरू केले. समय-मार्ग उपासना ही कशी श्रेष्ठ आहे हे तत्कालीन लोकाच्या मनावर बिंबविण्याची त्यानी पराकाष्ठा केली. सौदर्यलहरींचा उगम ह्या प्रकारे झाला. पुन्हा एकवार, श्रीदेवींची ही उपासना शुद्ध पायावर यावी याच हेतूने शंकर भगवत्पाद

यानी हे काव्य निर्मिले. या सौंदर्यलहरींनी वामाचारातले वाम, अमगल वाहून जावे व बाह्यउपासनेतील शुद्धपणा कायम राहावा हाच त्यांचा या काव्यातील हेतू होता.

सौंदर्यलहरीनिर्मितीची पूर्वपीठिका ही अशी आहे. त्यावेळची परिस्थिती व सध्याच्या काळातील परिस्थितीचा विचार करता, बरेच साम्य आढळते. हल्लीच्या या ऐहिक सुखाच्या, सिद्धींच्या, मागे लागूनही माणूस सुखी बनला आहे का ? मानसिक सुख हेच शेवटी परमसुख आहे. हे सुख सत्तेत नाही. संपत्तीत तर नाहीच नाही. या सुखाअभावी जगात आज लाखो, कोट्यवधी लोक निराश, अश्रद्ध, झालेले आढळतील. सिद्धिप्राप्तीचा महिमा तो हाच म्हणता येईल. लोक शेवट विसरून, उत्तरोत्तर त्याच्यामागेच मोहित होऊन जात असतात. सिद्धी साधून पुन्हा शेवटास पोचणारे पूर्ण समाधानी लोक फारच थोडे आढळतील. परमेश्वरी उपासना हीच शेवटी पूर्ण समाधानाप्रत पोहोचवील. म्हणूनच, आजच्या या काळात, पुन्हा एकवार या सौंदर्यलहरींची ही गंगा समाजाच्या सर्व थरापर्यंत नेणे जरुरीचे भासते.

आजच्या काळात ही मूळ संस्कृतमधली गंगा, मराठीत आणल्याशिवाय सामान्य माणसाप्रत पोचणे अशक्य, यासाठीच हे स्तोत्र अनुवादित केले आहे. त्या श्रीचक्राधिष्ठित त्रिपुरसुंदरीची, सामान्य लोकानाही, या प्रयत्नाने कल्पना आली तरीही, अनुवादकाचे प्रयत्न सार्थकी लागले असे म्हणता येईल.

या श्लोकाचे अनुष्ठानाची पद्धत प्रथम अनुष्ठान पद्धती, या शीर्षकाखाली दिली आहे. त्यानुसारच अनुष्ठान करावे. प्रत्येक व्यक्तीच्या पूर्वसंचितानुसारच व शास्त्रोक्त पद्धतीने अनुष्ठान करण्यानेच सिद्धी, फलप्राप्ती होत असते. या कामी, देवीवर संपूर्ण श्रद्धा ठेवूनच अनुष्ठान करावे. फलप्राप्तीस वेळ लागल्यास, पुन्हा पुन्हा तसेच करीत राहावे. पूर्वकर्म दूषित असते ते पूर्ण शुद्ध झाल्याखेरीज फल-प्राप्ती कशी होईल ? यासाठी एकनिष्ठ उपासनेची जरुरी आहे. जसजसे दूषित पूर्वकर्म शुद्ध होईल तसे तसे त्याचे सुपरिणाम दिसत जातील. ही आपल्या दूषित कर्मांची पूर्वपीठिका प्रथम ध्यानात घ्यावी, म्हणजे वृत्ती उतावीळ होणार नाहीत. थोडक्यात, उपासना किती करावी. तर इच्छित साध्य होईपर्यंत, हा दंडक लक्षात घेऊनच, सुरुवात करावी.

एक ना एक दिवस, व्यक्तिपरत्वे देवीकृपा होईलच होईल.


## श्लोक

**शिवः शक्त्या युक्तो यदि भवति शक्तः प्रभवितुं**
**न चेदेवं देवो न खलु कुशलः स्पन्दितुमपि ।**
**अतस्त्वामाराध्यां हरिहरविरिञ्च्यादिभिरपि**
**प्रणन्तुं स्तोतुं वा कथमकृतपुण्यः प्रभवति ॥ १ ॥**

## अर्थ.

हे माते भगवती, ( ह्या ब्रह्मांडाचा सूत्रधार मानला गेलेला ) भगवान शंकर फक्त तुझ्यासहित असतानाच, परमेश्वर होऊ शकतो. अन्यथा ( तुझ्याशिवाय ) तो, थोडीशी हालचाल करण्यासही असमर्थ आहे. असे असताना, ज्या तुझी पूजा प्रत्यक्ष हरि, हर, विरञ्ची आणि इतर देवांकडून होते, अशा तुझ्यासारख्या देवीची पूजा नमस्कार करण्यास, ज्याने ( पूर्वपुण्याईने ) अधिकार संपादन केला नाही, असा ( पापी ) कोण पुरुष धजू शकेल ? ॥ १ ॥

## यंत्र



## उपासना

१ ) यंत्र रंगीत पीठाने तयार करावे. अनुष्ठान : १२ दिवसाचे जपसंख्या १००० प्रत्येक दिवशी. नैवेद्य : त्रिमधुरा. ( खोबऱ्याचा कीस + गूळ + तूप ). फलप्राप्ती : इच्छापूर्ती.

२ ) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. अनुष्ठान : १२ दिवसाचे. जपसंख्या प्रत्येक दिवशी १००० वेळा. नैवेद्य : गोड वडया. फलप्राप्ती : भरभराट. सर्व अडचणींतून मुक्तता.

## विवेचन

सौन्दर्यलहरीचा हा पहिलाच श्लोक म्हणजे " श्रीविद्ये "चे सारसर्वस्वच आहे. श्री विद्येच्या उपासकाचे अंतिम उद्दिष्ट जीवन्मुक्ती, परब्रह्माशी एकरूप होणे हेच आहे. पण व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने त्याच्या ज्ञानापरत्वे, अधिकारा-परत्वे, हे उद्दिष्ट पोहोचण्याच्या मार्गांत फरक आढळतो.

या पहिल्याच श्लोकातील शिव-शक्तीचे अभिन्नत्व वेगवेगळ्या चौदा प्रकारे दर्शविता येते. ( १ ) वेदांत, ( २ ) सांख्य, ( ३ ) मुख्य देवता ( श्रीविद्येची ), ( ४ ) सूचक महत्त्वाचे शब्द, ( ५ ) त्या शब्दाचे महत्त्व, ( ६ ) स्वरोत्पत्ती, ( ७ ) यंत्र. ( ८ ) प्रणव ( ९ ) मातृका, ( १० ) कादी-विद्या. ( ११ ) हादी-विद्या. ( १२ ) पंचाक्षरी ( १३ ) गुरू व ( १४ ) चंद्र-कला.

उदाहरणार्थ, पहिल्या वेदांतानुसार, हा विश्वाचा सर्व खेळ ब्रह्म व माया यांच्या योगे ईश्वर बनूनच चालतो. नुसत्या एकट्या ब्रह्माकडून कोणतेही कार्य होणार नाही. त्याला मायेची जोड पाहिजे. यातील ब्रह्म-माया म्हणजेच शिव—शक्ती होत.

सांख्य दृष्टिकोनातून हाच मिलाफ " पुरुष " व " प्रकृती " म्हणून दाखविला जातो. येथे शिवशक्ती ऐवजी पुरुष-प्रकृती म्हटले जाते.

अशा प्रकारे मूळतत्त्व एकच, शिवशक्तीची अभेद्य युती पण ती वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून पाहिली जाते, व त्याप्रमाणे त्याची उपासना केली जाते.

## श्लोक


**तनीयांसं पांसुं तव चरणपङ्केरुहभवं**
**विरिञ्चिः संचिन्वन्विरचयति लोकानविकलम् ।**
**वहत्येनं शौरिः कथमपि सहस्रेण शिरसां**
**हरः संक्षुद्यैनं भजति भसितोद्धूलनविधिम् ॥ २ ॥**

## अर्थ

( हे माते ) तुझ्या चरणकमळावरील धुळीच्या कणातून, ब्रह्मदेव ह्या ब्रह्मा-डाची उत्पत्ती ( रचना ) करतो. भगवान विष्णू, आपल्या सहस्रशीर्षांवर त्याचा भार वाहतो, तर, भगवान रुद्र, त्याचा संहार करून, ती रक्षा सर्वांगास लावतो.

( तात्पर्य, तुझ्या पायाच्या धुळीचा एक अल्पसा कणही एवढया प्रचंड ब्रह्मांडाच्या उत्पत्ती, स्थिती व लयाच्या या कार्यास आधारभूत होण्याइतका समर्थ आहे, मग प्रत्यक्ष तुझी महती काय वर्णावी ? )

### यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. अनुष्ठान : ५५ दिवसांचे. जपसंख्या प्रत्येक दिवशी १००० वेळा, नैवेद्य : दुधाची खीर ( Milk-gruel ). फल : कार्यात यश, जगमोहन.

### विवेचन

या श्लोकात देवीची श्रेष्ठता वर्णन केली आहे. देवीच्या पायांतील धुळीचा ल्हानसा कणही हे ब्रह्मांड बनू शकतो हे दर्शविले आहे. वेगवेगळ्या प्रकारे याचे विवेचन करता येते. देवीचे अंकित असणारे गुण म्हणजेच सत्त्व, रज, तम व गुणातीतत्व हे या कणांतही असल्याने याच गुणाच्या आधारे या ब्रह्मांडाची निर्मिती, स्थिती, लय हे त्रिदेव करू शकतात. किंवा सर्व जग हे ज्या परमाणूंचे बनले आहे, ते परमाणू म्हणजेच धुळीचा अल्पसा कण असेही दर्शविता येते. ॥ २ ॥


### श्लोक

**अविद्यानामन्तस्तिमिरमिहिरद्वीपनगरी**
**जडानां चैतन्यस्तबकमकरन्दस्त्रुतिझरी ।**
**दरिद्राणां चिन्तामणिगुणनिका जन्मजलधौ**
**निमग्नानां दंष्ट्रा मुररिपुवराहस्य भवति ॥ ३ ॥**

### अर्थ

( हे माते ) अज्ञानी ( आत्मविद्या न जाणणाऱ्या ) लोकांच्या मनातील ( जन्म-मरणाचे अनंत फेऱ्यात साचलेला ) अंधार दूर करणारा ( ज्ञान ) सूर्य, सप्तसागरांतील ज्या द्वीपनगरीतून उगवतो ते बेट ( प्रत्यक्ष तूच ) आहेस. मूढ ( जडवादी, कर्मठ, आत्मरहस्य न ओळखणारे ) जनासाठी, प्रज्ञारूपी फुलातून वाहणाऱ्या मधाचा झरा ( म्हणजे तूच ) दरिद्री लोकाना मनोवांच्छित साध्यासाठी ( तू म्हणजे ) प्रत्यक्ष चिंतामणी रत्नच आहेस. तर जन्ममरणाच्या प्रवाहात बुडालेल्यांना, तू म्हणजे प्रत्यक्ष ( मुर असुराचा वध करून बुडालेल्या पृथ्वीला वर काढणारा वराहावतारी भगवान विष्णूचा ) वराहरूपातील दातच वाटतो ॥२॥

### यंत्र



### उपासना

( १ ) सोन्याच्या पत्र्यावर कोरून, ईशान्य दिशेस तोंड करून पूजा करणे. अनुष्ठान ५४ दिवसाचे, दररोज २००० वेळा फल : वेदांचे ज्ञान.

( २ ) सोन्याच्या पत्र्यावर कोरून ईशान्य दिशेस तोंड करून पूजा करणे अनुष्ठान १५ दिवसाचे. जप दररोज १००० वेळा. फल : ज्ञानप्राप्ती, धनप्राप्ती.

### विवेचन

या श्लोकाचे विवेचन दोन प्रकारानी करता येते. श्लोकाच्या पहिल्या वाक्याने सुचविले आहे की या जगाची उत्पत्ती अविद्येने होते हा लोकांच्या मनातील भ्रम, हे अज्ञान, देवी नाहीसे करते. दुसऱ्या वाक्याने, देवी सांख्याच्या मनातील भ्रम, की जड मूळ प्रकृतीने हे जग निर्माण होते, हा भ्रम नाहीसा करते. तिसऱ्या वाक्यात ती परमाणुवाद्याना इशारा देते. तर चौथ्या वाक्याने ती दुराचारी लोकांना नीट वागण्याचा मार्ग सूचित करते.

दुसऱ्या प्रकारच्या विवेचनाप्रमाणे, हा श्लोक देवतेच्या वर्णनात्मक आहे. देवी, उगवत्या सूर्याच्या किरणाप्रमाणे आरक्त तेजस्वी असून, तिच्या चारी हातांत अनुक्रमे ( १ ) पुष्पधनु, ( २ ) पंचबाण ( ३ ) स्फटिक-माळ व ( ४ ) पुस्तक धारण केलेले असून, ती तीन डोळ्यांची असून, चन्द्रकला धारण केलेली आहे. या श्लोकातच वाक्‌भवबीज " ऐं " हेही दर्शविले आहे. ॥ ३ ॥


### श्लोक

त्वदन्यः पाणिभ्यामभयवरदो दैवतगण--
स्त्वमेका नैवासि प्रकटितवराभीत्यभिनया ।
भयात् त्रातुं दातुं फलमपि च वाञ्छासमधिकं
शरण्ये लोकानां तव हि चरणावेव निपुणौ ॥४॥

### अर्थ

( हे देवी ) या आश्रित जगास कोण आधार देतो ? हे देव, ( तू सोडून ) शरणार्थींचे मनातील भीतिपरिहारार्थ व त्यांना वर देण्यासाठी आपल्या दोन्ही हाताचा उपयोग करतात. पण केवळ तूच ( चार हात असूनही ) हातांनी अभयदान व वरदान दर्शवीत नाहीस. कारण ( तुझ्या पायाशी ) शरण आलेल्यांच्या मनातील भीती नाहीशी करण्यास व त्यांस इच्छित देण्यास ( नुसते ) तुझे पायही समर्थ आहेत. ॥ ४ ॥

### यंत्र




### उपासना

( १ ) चांदीच्या पत्र्यावर यंत्र कोरून, पूर्वेकडे तोंड करून उपासना

करावी. अनुष्ठान १६ दिवसांचे. जपसंख्या १००० दर दिवशी. फल राज्याचे स्वामित्व.

( २ ) सोन्याच्या पत्र्यावर यत्र कोरावे. अनुष्ठान ३६ दिवसाचे. जपसंख्या ३००० दररोज. फल: खडतर जन्मदारिद्र्य, रोग व इतर दुःसह त्रासातून सुटका.

## विवेचन

हा श्लोक देवीच्या वर्णनपर आहे. देवीच्या हातात उसाचे धनुष्य, बाण, पाश व अंकुश आहेत. इतर देव, जे भक्तास अभयदान अगर वरदान देतात, त्यासाठी त्याना हाताने त्या त्या मुद्रा दाखवाव्या लागतात. पण देवीला मात्र यासाठी हाताचा उपयोग करावा लागत नाही. कारण या दानास देवीचे पायही समर्थ आहेत. देव स्वर्गभोग अगर मोक्ष देऊ शकतात, तर देवीचे पाय भक्तांस दोन्हीही, स्वर्गीय सुख व जीवन्मुक्ती, देऊ शकतात.

याच श्लोकात बाला-मंत्र " ऐं क्लीं सौ " सूचित केला आहे. ॥ ४ ॥


## श्लोक

**हरिस्त्वामाराध्य प्रणतजनसौभाग्यजननीं**
**पुरा नारी भूत्वा पुरिपुमपि क्षोभमनयत् ।**
**स्मरोऽपि त्वां नत्वा रतिनयनलेह्येन वपुषा**
**मुनीनामप्यन्तः प्रभवति हि मोहाय महताम् ॥५॥**

## अर्थ

( हे देवी ) भगवान विष्णू, प्रार्थनार्थी लोकांना वैभव देणाऱ्या तुझी प्रार्थना करूनच, पूर्वी अलौकिक स्त्री रूप घेऊन ( वैराग्याबद्दल प्रसिद्ध अशा ) त्रिपुरांचा नाश करणाऱ्या भगवान शंकरानाही विचलित करू शकले. तर ( भगवान विष्णूंप्रमाणेच ) मदनसुद्धा तुझ्या भक्तिसामर्थ्यानेच प्रत्यक्ष रतीलाही हरविण्याइतके सुंदर रूप घेऊन, वैराग्यश्रेष्ठ मुनिवर्यांच्याही मनात मोह निर्माण करू शकला. ॥ ५ ॥

### यंत्र



### उपासना

ताम्याच्या पत्र्यावर यत्र कोरून, पूर्वेकडे तोंड करून उपासना करणे. अनुष्ठान ८ दिवसाचे. दररोज २००० जपसंख्या. जप करताना यत्र मस्तकावर धारण करावे.

फल ' आपल्याबद्दल लोकाच्या मनात अनुकूल ग्रह निर्माण करणे. लोकाना मोहित करणे.

### विवेचन

या श्लोकात देवीची महती वर्णन केलेली आहे. श्रीविष्णू देवीची श्रीचक्रोपासना व पच-दशाक्षरी मंत्र म्हणूनच, देवीच्या कृपेने अलौकिक अशा मोहिनीचे रूप, देव-दानवात अमृताची वाटणी करताना घेऊ शकले, व आपल्या सौंदर्याच्या बळावर दानवांना फसवू शकले. ते रूप सर्व देवात वैराग्याच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ अशा शंकरानाही विचलित करण्याइतके मोहक होते.

श्रीविष्णू हे पंच-दशाक्षरी विद्येच्या पहिल्या काडाचे शिर आहेत. तर लोपा-मुद्रा व नंदिकेश्वर विद्येचे पहिले प्रस्तार आहेत. "इम "हे देवीचे काम कलारूप बीज आहे. त्या जपाने श्रीविष्णू देवीसारखेच रूप घेऊ शकले, हे या श्लोकात सूचित केले आहे.

याच श्लोकात मदनाचाही, श्रीविष्णूप्रमाणेच निर्देश केलेला आहे. त्रिपुर-सुदरीची पूजा करण्यापूर्वी, प्रथम मदन-रतीची पूजा करण्याचा प्रघात आहे. स्मर म्हणजेच मदन हाही पचदशाक्षरी मत्राचा शिर म्हणून ओळखला जातो.

अच्युतानदाच्या विवेचनानुसार, या श्लोकात "साध्य-सिद्धासन विद्या" "ह्रीम् क्लीम् ब्लेम्" दर्शविली आहे. ॥ ५ ॥


### श्लोक

धनुः पौष्पं मौर्वी मधुकरमयी पञ्च विशिखा
वसन्तः सामन्तो मलयमरुदायोधनरथः ।
तथाप्येकः सर्वं हिमगिरिसुते कामपि कृपा–
मपाङ्गाते लब्ध्वा जगदिदमनङ्गो विजयते ।। ६ ।।

### अर्थ

हे हिमगिरिकन्ये, मधमाश्यांच्या ओळीची दोरी असलेले फुलाचे धनुष्य, फक्त पाचच बाण धारण करणारा ( कामदेव ) मदन, वसंत ( ऋतू ) सारखा ( ल्ढवय्या ) मदतनीस घेऊन, आणि मलय पर्वतावरून येणाऱ्या वाऱ्याच्या रथा-वर आरूढ होऊन अशा सर्व ( अपुऱ्या क्षुद्र ) सरंजामाने, एकटा केवळ तुझ्या एका कृपाकटाक्षानेही; सर्व जग जिंकू शकतो. ।। ६ ।।

### यंत्र




### उपासना

सोन्याच्या पत्र्यावर यंत्र कोरून, पूर्वेस तोंड करून उपासना करावी. अनुष्ठान २१ दिवसांचे. जपसंख्या दररोज ५००. नैवेद्य : २१ उसाची कांडकी. फल : पुरुषत्वप्राप्ती.

### विवेचन

या श्लोकात देवीचा कृपाकटाक्षही काय सामर्थ्य देऊ शकतो हे दर्शविले आहे. वास्तविक, मदनाला शंकरानी आपल्या तिसऱ्या डोळ्यानी जाळून टाकले आहे. म्हणजे तो शरीरविरहित. त्यात त्याचे साथीदार वसंत म्हणजे वसंतऋतू. हत्यार कोणते तर फुलाचे बाण. म्हणजे धड चांगलेसे शस्त्रही नाही आणि चांगले सैन्यही नाही. अशा तुटपुंज्या अवस्थेतही, केवळ देवीच्या कृपाकटाक्षाच्या बळावर, मदन जग जिंकू शकतो. हा देवीचेच कृपेचा महिमा आहे.

याच श्लोकात " क्लिम् " हे कामबीजही सूचित केले आहे. ॥ ६ ॥


### श्लोक

**क्वणत्काञ्चीदामा करिकलभकुम्भस्तननता**
**परिक्षीणामध्ये परिणतशरच्चन्द्रवदना ।**
**धनुर्बाणान्पाशं सृणिमपि दधाना करतलैः**
**पुरस्तादास्तां नः पुरमथितुराहोपुरुषिका ॥ ७ ॥**

### अर्थ

शरद ऋतूतील पूर्ण चंद्रबिंबाप्रमाणे ( तेजस्वी ) मुखचन्द्रमा असलेली, गजछाव्याचे गंडस्थळाप्रमाणे असलेल्या स्तनयुग्माच्या भाराने किंचित वाकलेली, कृशकटी, किणकिणाट करणारी, कटिमेखला धारण केलेली. चारी हातात पुष्प-धनुष्य, पचबाण, अंकुश व पाश धारण करणारी, त्रिपुरदमन भगवान शंकराचे एकमेव भूषण अशी, ( हे देवी ) तू आम्हा (भक्तांपुढे ) समोर उभी राहा ॥ ७ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यात कोरावे, अगर रक्षेत काढावे. पूर्वेकडे तोंड करून बसावे. अनुष्ठान ४५ दिवसाचे. जपसंख्या रोज १००० जप करताना यंत्र ( सोन्याच्या पत्र्यावरील ) मस्तकावर धारण करावे. नैवेद्य दुधाची खीर आणि भात. फल . शत्रूवर विजय.

### विवेचन

या श्लोकात शक्तीचे रूपवर्णन केले आहे. हे रूप शिवाला इतके आवडते

की त्या भरात तो म्हणून जातो, " अहो पुरुषिका " ( अशा देवीचा मी पती. केवढे माझे भाग्य ? ) देवीच्या हातात जी शस्त्रे दाखविली आहेत ती प्रतीकात्मक आहेत. स्थूल, सूक्ष्म व परादर्शक आहेत. पंच पुष्पबाण म्हणजे ( १ ) कमल, ( २ ) रक्तकैरव, ( ३ ) कल्हार, ( ४ ) इंदीवर व ( ५ ) सहकार. ह्या फुलांचे बाण होत.

धनुष्यरूपदर्शक " धाम् ", पंचबाण म्हणजे द्राम्, द्रिम्, क्लीम्, ब्लूम् व संह् पाश म्हणजे " ऱ्हीम् " व अकुश म्हणजे " क्रोम् " दर्शवितात.

परा-रूपात, धनुष्य म्हणजे " वासना ", मय " मन ", पचबाण म्हणजे पचतन्मात्रा, पाश म्हणजे भावना, अंकुश म्हणजे क्रोध, दर्शवितात.

आमच्यापुढे ये, या अर्थात, मणिपुर चक्रातून हृदयें-कमलात, अनाहत चक्रात ये असा भावार्थ दिसतो. या श्लोकात देवीची स्थूल, सूक्ष्म व परा रूपे दर्शविली आहेत. स्थूल रूप म्हणजे वर्णन केलेले रूप, शकराला प्रिय असलेले, डोळ्यानी दिसणारे रूप होय. पंचदशाक्षरी अगर षोडषाक्षरी हे सूक्ष्म रूप आणि कुंडलिनी शक्ती हे परारूप दर्शविते.

या श्लोकात वशिणी बीज " ब्लूम् " सूचित केले आहे ॥ ७ ॥


### श्लोक

**सुधासिन्धोर्मध्ये सुरविटपिवाटीपरिवृते**
**मणिद्वीपे नीपोपवनवति चिन्तामणिगृहे ।**
**शिवाकारे मञ्चे परमशिवपर्यङ्कनिलयां**
**भजन्ति त्वां धन्याः कतिचन चिदानन्दलहरीम् ॥ ८ ॥**

### अर्थ

अमृतसागरात वसलेल्या, रत्नखचित बेटावरील कल्पवृक्षांचे जंगलात असलेल्या नदनवनात, चिंतामणि रत्नानी उभारलेल्या राजप्रासादात, ( अनेक त्रिकोणाकृतीतील ) शिवाकार मचकावर, परमशिवरूपी शय्येवर अधिष्ठित, प्रज्ञा व शुद्धानंदाची मूर्तिमत लहरी, अशा तुझी जे ( थोडेसेच पण अधिकारी ) उपासक सेवा करतात, ते केवळ धन्य होत. ॥ ८ ॥

## यंत्र



## उपासना

यंत्र रक्तचदनाच्या गंधात काढून त्याची लाल फुलांनीच पूजा करावयाची. अनुष्ठान १२ दिवसांचे. जपसंख्या दररोज १२०० वेळा. नैवेद्य : "काळी मिरी." फल : कारागृहातून मुक्तता. सर्व कार्यांत यश.

## विवेचन

मागल्या श्लोकात देवीचे रूपवर्णन केल्यावर, या श्लोकात देवीचे निवासस्थान जे श्रीचक्र त्याचे वर्णन केलेले आहे. अमृतसागर म्हणजे श्रीचक्रातील भूग्रह व बिंदू हे देवीचे निवासस्थान. त्रेचाळीस त्रिकोण हा देवीचा राजप्रासाद, तर वर टोके असलेले पच त्रिकोण म्हणजे कल्पवृक्षाच्या रागा. देवी शिवमचकावर बसली आहे, त्या मचकाचे चार पाय, ब्रह्मा, विष्णू, रुद्र व ईश्वर हे आहेत. सदाशिव या मचकाच्या फळ्या तर त्रिगुण तेजात्मक परा-शिव हीच त्या मचकावरील गादी सूचित केली आहे.

याच श्लोकाचा दुसराही अर्थ सूचित करता येतो. जो योगी, तुझी चिदानदलहरींची–ज्याची वस्ती अनाहत चक्रात आहे, म्हणजेच मूलाधार व सहस्रार याच्या मध्ये आहे–उपासना करतो तो धन्य आहे.

या श्लोकातील " परमशिवपर्यंकनिलया " या शब्दात ओंकारातील परमशिव बिन्दू व पराशक्ती नाद याचे ऐक्य सूचित केले आहे. ओं हे अक्षर "अ," " उ " " म " याचे म्हणजेच ब्रह्मा, विष्णू, रुद्र, आणि ईश्वरसूचक अर्ध मात्रा युक्त आहे. त्यामुळे देवी या देवतायुक्त मचकावर बसली आहे हे वर्णन जुळते. ललिता सहस्रनामातही " पञ्च-ब्रम्हासनास्थित " असे नाव आहेच.

याच श्लोकात कामेश्वरी बीज " क्लीम् " सूचित केले आहे. ॥ ८ ॥

## श्लोक

महीं मूलाधारे कमपि मणिपूरे हुतवहं
स्थितं स्वाधिष्ठाने हृदि मरुतमाकाशमुपरि ।
मनोऽपि भ्रूमध्ये सकलमपि भित्वा कुलपथं
सहस्रारे पद्मे सह रहसि पत्या विहरसे ॥ ९ ॥

## अर्थ

( हे देवी ) मूलाधार चक्रातील भूमीचा छेद करून, मणिपूर चक्रातील पाण्याचा भेद करून, स्वाधिष्टान चक्रातील अग्नीतून, अनाहत चक्रातील वायूचा भेद करून, वरील ( विशुद्धिचक्रातील ) अवकाशाचा व मनाचा ( भ्रूमध्यातील आज्ञाचक्राचा ) भेद करून, येणेप्रमाणे संपूर्ण कौल-मार्गाचा ( कुंडलिनी मार्गाचा ) भेद करून, तू ( प्रियतम अशा ) शिवाबरोबर, ( सहस्रारचक्रात ) सहस्रदल कमलात, एकांतात विहार करीत आहेस. ॥ ९ ॥

## यंत्र




## उपासना

सोन्याच्या पत्र्यावर कोरून, गंधाने माखावे. अनुष्टान ४५ दिवसांचे. जपसंख्या दररोज १००० वेळा. नैवेद्य : दुधाची खीर. फल : पचमहाभूतावर स्वामित्व व परदेशी गेलेला नातलग परत येणे.

## विवेचन

या श्लोकात व्यष्टीत कुडलिनी शक्ती आणि समष्टीत ही दैवी शक्ती त्रिपुरासुंदरी, व्यष्टीत सहस्रार चक्रात व समष्टीत परमशिवाशी मीलनासाठी जाताना कशा प्रकारे जाते हे दर्शविले आहे.

या ब्रम्हांडातील प्रत्येक व्यक्तीत ही दैवी शक्ती कुंडलिनी रूपाने वास करीत असते. ही शक्ती नसेल तर ते शरीर मृत बनते. प्राणवायू ताब्यात आणून त्याच्या सहाय्याने ही कुंडलिनी शक्ती जागृत होऊन, कौलमार्गाने म्हणजेच सुषुम्ना नाडीतून वर सहस्रार चक्रात जाताना ती षट्चक्राचा भेद करीत जाते तेच या श्लोकात वर्णिले आहे. ॥ ९ ॥

### श्लोक


**सुधाधारासारैश्चरणयुगुलान्तर्विगलितैः**
**प्रपञ्चं सिञ्चन्ती पुनरपि रसाम्नायमहसः**
**अवाप्य स्वां भूमिं भुजगनिभमध्युष्टवलयं**
**स्वमात्मानं कृत्वा स्वपिषि कुलकुण्डे कुहरिणि ॥ १० ॥**

### अर्थ

तुझ्या चरणकमलामधून वाहणाऱ्या जलरूपी अमृताने ( सहस्रार चक्रातून परत मूलस्थानी मूळाधार चक्रात परत जाताना ) सर्व नाड्या भरून, तेजस्वी चन्द्र मंडलातून परत येऊन ( मूळाधार चक्रातील पोकळीत ) साडेतीन वेटोळी घालून हे देवी ( कुडलिनी शक्ती ) तू झोपतेस. ॥ १० ॥

( मागल्या श्लोकात कुडलिनीचे षट्चक्र भेदन करून सहस्रारचक्रात परब्रम्हाशी मीलन व या श्लोकात पुन्हा स्वस्थानी आगमन दाखवले आहे. )

### यंत्र




### उपासना

सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. अनुष्ठान ६ दिवसाचे. जपसंख्या

प्रत्येक दिवशीं १००० वेळा. यत्र रेशमी गोफात गुफून कमरेशी बांधावे. नैवेद्य : फळे. फल : पौरुषत्वप्राप्ती, स्त्रीत्वप्राप्ती योग्य नियमित ऋतुप्राप्ती.

### विवेचन

मागल्या श्लोकात, योगमार्गाने कुंडलिनी शक्ती जागृत होऊन ती षट्चक्रांचा भेद करून सहस्रार चक्रात कशी जाते हे दाखविल्यानंतर, ही शक्ती सर्व चक्राना पुनरुज्जीवित करून, पुन्हा त्याच मार्गाने खाली येऊन, मूलाधार चक्रात आपल्या नेहेमीच्या जागी, साडेतीन वेटोळी घालून झोपते, हे या श्लोकांत दर्शविले आहे. ॥१०॥


### श्लोक

**चतुर्भिः श्रीकण्ठैः शिवयुवतिभिः पञ्चभिरपि**
**प्रभिन्नाभिः शंभोर्नवभिरपि मूलप्रकृतिभिः ।**
**त्रयश्चत्वारिंशदवसुदलकलाश्रत्रिवलय-**
**त्रिरेखाभिः सार्धं तव शरणकोणाः परिणताः ॥ ११ ॥**

### अर्थ

( हे देवी ) हा तुझा प्रसाद ( श्रीचक्र ), शिवाचे मूळस्थान जो बिंदू तो सोडला, अष्टदल व षोडषदल कमळ, मेखलात्रय व भूप्रहाच्या तीन रेषासहित, चार श्रीकण्ठ व पाच शिवयुवती अशा नऊ मूळप्रकृतीच्या ४३ कोनांनी युक्त आहे. ॥ ११ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरावे. अगर लोण्यावर कोरावे. लोणी नतर भक्षण

करावे. अनुष्ठान आठ दिवसांचे. जपसंख्या १००० दररोज. नैवेद्य : गुळाची खीर, वड्या आणि महानैवेद्य. फल : वंध्यत्वहारक. यंत्र कमरेस बांधावे.

## विवेचन

या श्लोकात त्रिपुरसुंदरीचे वसतिस्थान जे श्रीचक्र त्याचे वर्णन केले आहे. हे श्रीचक्र ४३ त्रिकोणांनी तयार होते. श्रीक्रमातील मूळ त्रिकोणाचा एक कोन, अष्टकोन चक्रातील आठ, दोन दशकोणातील वीस, व चतुर्दशकोणातील १४ असे एकूण ४३ त्रिकोण बनतात. त्यानंतर अष्टदल कमळ. षोडशदल कमळ, मेखलात्रय व भूग्रह असे श्रीचक्र बनते. मूळ त्रिकोणातील बिंदू म्हणजेच परमशिव.

आंतरयागात श्रीचक्र शरीरान्तर्गत कल्पिले आहे. ते असे. शिवाचे चार त्रिकोण व शक्तीचे पाच त्रिकोण म्हणजे ( १ ) मज्जा, ( २ ) शुक्र, ( ३ ) प्राण व ( ४ ) जीव हे शिवयुक्त त्रिकोण. ( १ ) त्वचा ( २ ) अस्थी ( ३ ) मांस ( ४ ) मेद व ( ५ ) अस्थी म्हणजे शक्तियुक्त त्रिकोण. यातूनच पञ्चभूते, पञ्च तन्मात्रा, पंचज्ञानेंद्रिये, पच कर्मेंद्रिये व मन हे शक्ती–त्रिकोणातून व माया, शुद्धविद्या, महेश्वर व सदाशिव ही शिवयुक्त त्रिकोणातून तयार होतात. अशा प्रकारे मूळ ९ त्रिकोणातून पंचत्रीस तत्त्वे तयार होऊन हा देह ( श्रीचक्रात्मक ) बनतो. ॥ ११ ॥

## श्लोक

**त्वदीयं सौन्दर्यं तुहिनगिरिकन्ये तुलयितुं**
**कवीन्द्राः कल्पन्ते कथमपि विरिञ्चिप्रभृतयः ।**
**यदालोक्यौत्सुक्यादमरललना यान्ति मनसा**
**तपोभिर्दुष्प्रापामपि गिरिशसायुज्यपदवीम् ॥ १२ ॥**

## अर्थ

हे हिमनगकन्ये, तुझे सौंदर्याची तुलना करण्यास, ब्रह्मदेवादी आद्य कविश्रेष्ठही अपुरे पडतात. ( तुझ्या सेवेतील ) देवकन्या, उत्सुकतेच्या भरात ( तुझ्या सौंदर्याचे गुणगान करताना ) नकळत, योग्यांना तपश्चर्या करूनही दुर्लभ, असे शिवतादात्म्य प्राप्त करतात. ॥ १२ ॥

( या श्लोकात देवीचे सौंदर्यवर्णन केले आहे. एकट्या शंकराखेरीज देवीचे सौंदर्य दुसरा कोणीही वर्णन करू शकत नाही. तो देवीशी एकरूपच झालेला असल्यामुळे त्याच्या इतके देवीचे सौंदर्य जवळून कोण पाहणार ?

### यंत्र

सौः

सौः

### उपासना

पाण्याच्या भांड्यात यंत्र काढून पाण्याने भरावे. ते पाणी नतर प्यावे. अनुष्ठान ४५ दिवसाचे. जपसंख्या १००० प्रत्येक दिवशी. नैवेद्य . मध. फल : वक्तृत्व, प्रतिभाजागृती.

### विवेचन

मागल्या श्लोकात देवीच्या वसतिस्थानाचे, श्रीचक्राचे वर्णन केल्यावर, या श्लोकात सायुज्यतेचा, शिवशक्ती ऐक्याचा गौरव केला आहे.

जे आद्यकवी, देवीचे शब्दचित्र काढण्याचा प्रयत्न करतात, त्यात ब्रह्मदेव श्रेष्ठ कवी. पण त्यालाही हे शब्दचित्र नीट काढता येत नाही. त्यांच्या मनोविश्लेषणाच्या व प्रगटीकरणाच्या शक्तीत ते कमी पडल्याने त्याचे वर्णन एखाद्या देवांगनेपर्यंतच पोहोचते. पण त्यांनी वर्णन केलेल्या देवांगना, देवीचे सौंदर्यपानात मग्न होऊन त्या त्याची तुलना करताना नकळतच शिवाशी तादात्म्य पावतात, सौंदर्याचे गुणग्रहण करताना मनाने देवीच्या अगदी जवळ जाण्याच्या प्रयत्नात शिवमय होऊन जातात. कारण एकटा शिवच देवीचे सौंदर्य अगदी जवळून पाहू शकतो.

याच श्लोकात, केवळ देवीचे सतत ध्यान केल्याने देवांगनांना जी सायुज्यता लाभते ती, मोठमोठ्या निष्ठावंत कर्मठानाही लाभत नाही, हेही सूचित केले आहे. ॥ १२ ॥

### श्लोक

नरं वर्षीयांसं नयनविरसं नर्मसु जडं
तवापाङ्गालोके पतितमनुधावन्ति शतशः ।
गलद्वेणीबन्धाः कुचकलशविस्त्रस्तसिचया
हठात त्र्युटच्चत्काञ्च्यो विगलितदुकूला युवतयः ॥ १३ ॥

### अर्थ

( हे देवी ), तू एखाद्या जराजर्जर, कुरूप, अरसिक अशा माणसाकडे तुझा कृपाकटाक्ष टाकल्यानेही, त्याचे मागे शेकडो युवतींचे तांडे ( देहभान हरपून, तो मनुष्य प्रत्यक्ष मदनावतारच आहे असे भासून ) वेणीबंध तुटले आहेत, अंगावरील वस्त्र दूर झाले आहे, कटिबंध ( धावण्याच्या ) श्रमाने तुटण्याच्या अवस्थेत आलेले, असे धावत सुटतात. ॥ १३ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर, अगर शिशाच्या पत्र्यावर कोरून, जपानंतर गळ्यात बांधावे. अनुष्ठान ६ दिवसांचे. जपसंख्या दररोज १०००. नैवेद्य : त्रिमधु अगर शिजविलेला भात. फल : स्त्रीवशीकरण.

### विवेचन

या श्लोकात कवीच्या मुक्त प्रतिभेचा विलासच दिसतो. देवीच्या ओझरत्या दृष्टिकटाक्षातही केवढे प्रचण्ड सामर्थ्य भरलेले आहे त्याचे वर्णन या श्लोकात केले आहे.

देवीच्या एका कृपाकटाक्षानेही, अगदी कुरूप, वृद्ध, अनाकर्षक माणूसही आकर्षक बनतो, मदनासारखा भासतो. त्यामुळे त्याच्यामागे तरुणींचे तांडे धावू लागतात. हा श्लोक मदन-प्रयोग म्हणून ओळखला जातो. ॥ १३ ॥


### श्लोक

**क्षितौ षट्पञ्चाशद् द्विसमधिकपञ्चाशदुदके**
**हुताशे द्वाषष्टिश्चतुरधिकपञ्चाशदनिले ।**
**दिवि द्विःषट्त्रिंशन्मनसि च चतुःषष्टिरिति ये**
**मयूखास्तेषामप्युपरि तव पादाम्बुजयुगम् ॥ १४ ॥**

### अर्थ

(हे माते ) तुझे चरणकमल, पृथ्वीचे छप्पन्न, पाण्याचे बावन्न, अग्नीचे बासष्ट, वायूचे चौपन्न, आकाशाचे बहात्तर, आणि मानसाचे चौसष्ट प्रकाश किरणांच्याही वर आहेत ॥ १४ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. अनुष्ठान ४५ दिवसांचे. जपसंख्या दररोज १००० वेळा. नैवेद्य : दुधाची खीर, वड्या आणि शिजविलेला भात. फल साथीचे रोगापासून, दुष्काळापासून बचाव.

### विवेचन

या श्लोकात देवीचे चरणकमल सहस्रार चक्रात सर्वांचे वर कसे असतात हे दर्शविले आहे. यातील प्रकाशकिरण म्हणजे सहा चक्रांत ज्या तीन ग्रंथी आहेत, त्या ग्रंथी, ( रुद्र, विष्णू व ब्रह्म ) त्या अग्नी, सूर्य व दर्शक आहेत. या तत्त्वातून

निघालेले प्रकाशकिरण एकूण ३६० त्याच्यावर देवीचे पाय आहेत. म्हणजेच देवीचे स्थान हे या षड्चक्राचे व तीन ग्रंथींच्या सहस्रार चक्रात आहे, हे दर्शविले आहे.

याच ३६० किरणांचे वर्णन आणखी काही पद्धतीने करता येते. ३६० तिथींचे एक सौर वर्ष. प्रत्येक दिवस म्हणजे एक किरण. सहा ऋतूनी सहा चक्रे दर्शविली जातात. देवी नाद व बिंदुरूपाने या सर्वांच्यावर म्हणजेच कलागोचर कालातीत आहे असे म्हणता येते. ३६० किरण म्हणजे शिवतत्त्व व शक्ती तत्त्वातून निर्माण होणारी अनेक तत्त्वे; देवीचे स्थान या तत्त्वांपासून दूर म्हणजेच तत्त्वातीत आहे. ३६० किरण म्हणजे षड्चक्रन्यासात येणारी मुळाक्षरे. देवीचे स्थान त्याच्याही वर दर्शविले आहे ॥ १४ ॥

## श्लोक

**शरज्ज्योत्स्नाशुभ्रां शशियुतजटाजूटमुकुटां**
**वर त्रासत्राणस्फटिकघुटिकापुस्तककराम् ।**
**सकृन्नत्वा न त्वां कथमिव सतां संनिदधते**
**मधुक्षीरद्राक्षामधुरिमधुरीणा भणितयः ॥ १५ ॥**

## अर्थ

( तुझ्या दोन हातात ) पुस्तक व स्फटिक मण्यांची माळ धारण करून ( उरलेल्या दोन हातानी ) अभय व वरदान देणारी, केशसभारावर चन्द्रकोरीचा मुकुट धारण करणारी, शरच्चंद्राचे शीतल चांदण्याप्रमाणे तेजस्वी अशा तुला केवळ एक वेळ वंदन करण्यानेही, तुझ्या भक्तास, गोडीत द्राक्षरस, कामधेनूचे दूध, मध या पदार्थांशी तुलना करणारे शब्दसामर्थ्य का बरे लाभणार नाही ? ॥ १५ ॥

## यंत्र



ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ... मंत्रशास्त्र ... विषय
क्रमांक ... लो० वि०



## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, जपानंतर ताईत म्हणून गळ्यात बांधावे. अगर पाण्याच्या भांड्यांत कोरून भांडे पाण्याने भरावे. जपानंतर ते पाणी प्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मध, फळे, साखर. फलप्राप्ती : कवित्व, ज्ञानप्राप्ती.

## विवेचन

श्लोक १३ मध्ये देवीचे सहज कटाक्षाची महती वर्णन केल्यावर देवीच्या योग्य मार्गाने केलेल्या उपासनेचे फल या व पुढल्या सहा श्लोकात सांगितले आहे.

देवीची सात्त्विक उपासना केल्याने, पंचदशाक्षरी मंत्रातील वाक्भवकूटाचे उपासनेने मिळणारे फल यात दाखविले आहे.

देवीच्यापुढे केवळ एकवेळ नमन करण्यानेही, उपासक प्रतिभाशाली कवी वा ज्ञानी बनतो. कवित्वशक्तीसाठी, देवीची क्रियाशक्तिरूपातील उपासना या श्लोकात सांगितली आहे.

श्लोक १३ हा ज्याप्रमाणे 'मदन प्रयोग' म्हणून ओळखला जातो त्याप्रमाणे हा श्लोक व पुढील दोन श्लोक "सारस्वत प्रयोग" म्हणून ओळखले जातात. ॥ १५ ॥

## श्लोक


**कवीन्द्राणां चेतःकमलवनबालातपरुचिं**
**भजन्ते ये सन्तः कतिचिदरुणामेव भवतीम् ।**
**विरिञ्चिप्रेयस्यास्तरुणतरशृंगारलहरी**
**गभीराभिर्वाग्भिर्विदधति सतां रञ्जनममी ॥ १६ ॥**

## अर्थ

कविश्रेष्ठांचे मानसकमल उमलविणाऱ्या नवोदित अरुण बिम्बाप्रमाणे आरक्तवर्णा अशा तुझी उपासना करणारे विरळच असे पुण्यात्मे, साक्षात् ब्रह्मदेवाची

प्रियभार्या, सरस्वती हिच्या मुखातून निघणाऱ्या शृंगार रस गंगाप्रवाहाप्रमाणे वाहणाऱ्या शब्दभांडाराने ज्ञानी लोकांना आनंदित करतात. ॥ १६ ॥

### यंत्र



### उपासना

सोन्याच्या पत्र्यावर यंत्र कोरून घ्यावे.

अनुष्ठान ४१ दिवसांचे. जपसंख्या दररोज १००० वेळा. नैवेद्य : मध. फलप्राप्ती . वेदाची, शास्त्राची ज्ञानप्राप्ती, सभा जिंकणे.

### विवेचन

मागल्या श्लोकाप्रमाणेच, याही श्लोकात, देवीच्या उपासनेने कवित्वशक्ती लाभते याचे वर्णन केले आहे.

देवीची अरुणा म्हणून हृदयकमलात पूजा करणारा उपासक, वाक्भव कूटाने देवीची राजस उपासना करणारा उपासक, प्रती सरस्वती बनतो. ॥ १६ ॥


### श्लोक

**सवित्रीभिर्वाचां शशिमणिशिलाभङ्गरुचिभि-**
**र्वशिन्याद्याभिस्त्वां सह जननि संचिन्तयति यः ।**
**स कर्ता काव्यानां भवति महतां भङ्गिसुभगै-**
**र्वचोभिर्वाग्देवीवदनकमलामोदमधुरैः ॥ १७ ॥**

### अर्थ

हे माते, नुकत्याच पैलू पाडलेल्या चन्द्रकांत मण्याप्रमाणे ( रंगाने ) तेजस्वी अशा वशिणी आदि अष्टदेवतासह तुझे चिंतन करणारा, साक्षात् सरस्वतीचे मुखकमलातून आलेले असे सुगंधित, सुमधुर, शब्दभांडाराने विद्वत्तापूर्ण झालेले अशा महाकाव्याचा जनक बनू शकतो. ॥ १७ ॥

### यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान ४५ दिवसाचे. जपसंख्या दररोज १००० वेळा. नैवेद्य : मध, फळे, बुधसाखर. फलप्राप्ती : सर्व शास्त्रांवर प्रभुत्व.

### विवेचन

मागल्या श्लोकात देवीची अरुणा म्हणून केलेल्या उपासनेने, साधकास शब्दप्रभुत्व प्राप्त होते, हे दिल्यावर, तशाच प्रकारच्या सात्त्विक उपासनेने साधक महाकवी बनू शकतो, असे या श्लोकात दिले आहे.

या श्लोकात देवीची उपासना ज्ञानशक्तिरूप, शक्तिकूटाधिष्ठित अशी करावी हे सांगितले आहे.

श्रीचक्रांत सर्व रोगहर चक्राच्या वशिणी आदी अष्टदेवता असून वर्णमालेपैकी अष्टवर्गाच्या म्हणजे अ वर्ग, क वर्ग, च वर्ग, ट वर्ग वगैरे आठ वर्गांच्या देवता आहेत. आगम तत्रानुसार त्यांचा रंग स्वच्छ स्फटिकासारखा आहे. ॥ १७ ॥

### श्लोक


**तनुच्छायाभिस्ते तरुणतरणिश्रीसरणिभि-**
**र्दिवं सर्वामुर्वीमरुणिमनिमग्नां स्मरति यः ।**
**भवन्त्यस्य त्रस्यद्वनहरिणशालीननयनाः**
**सहोर्वश्या वश्याः कति कति न गीर्वाणगणिकाः ॥१८॥**

### अर्थ

सर्व पृथ्वीलोक व स्वर्गलोक, आरक्त तेजाने ( उजळून ) बुडवून, बाल

रवीचे अरुण तेजाचे जणू वसतिस्थान असा भास निर्माण करणारी तेजस्वी अंगकांती धारण करणाऱ्या तुझे स्मरण करणारा, स्वर्लोकीच्या उर्वशीसह कोणत्या व किती अप्सरांना ( मोहवून ) वनहरिणीप्रमाणे चचलनेत्र ( अधिर ) बनवून, कह्यात आणणार नाही ? ॥ १८ ॥

## यंत्र



## उपासना

सोन्याच्या पत्र्यावर चदन, फुले, केशर अगर हळदीने काढणे.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा. नैवेद्य : दुधाची खीर व पानसुपारी. फलप्राप्ती : सर्ववशीकरण.

## विवेचन

या श्लोकात देवीची उपासना करणारा साधक काय करू शकतो त्याचे वर्णन केले आहे. कामराजकूटाधिष्ठित इच्छाशक्ती रूपात देवीची उपासना, या श्लोकात सांगितली आहे.

देवीच्या कृपेने साधक इच्छित वस्तू प्राप्त करू शकतो. उर्वशी आदी अप्सरा या स्वर्गीय देवांगना आहेत. त्यामुळे त्याचे डोळे लवत नाहीत. सदैव उघडे असतात. पण साधकाच्या इच्छाशक्तीने ( देवीच्या कृपेने लाभलेल्या ) त्यांच्या मनात साधकाविषयी मोह निर्माण होऊन, त्याचा पडताळा त्याच्या अचल नेत्रांची बावरलेल्या हरिणीच्या डोळ्याप्रमाणे, जी अवस्था होते त्यावरून समजून येतो. तात्पर्य, साधकास इच्छाशक्तीच्या प्रभावाने अशी कोणतीही गोष्ट अशक्य रहात नाही. ॥ १८ ॥


### श्लोक

मुखं बिन्दुं कृत्वा कुचयुगमधस्तस्य तदधो
हकारार्धं ध्यायेद्धरमहिषि ते मन्मथकलाम् ।
स सद्यः संक्षोभं नयति वनिता इत्यतिलघु
त्रिलोकीमप्याशु भ्रमयति रवीन्दुस्तनयुगाम् ॥ १९ ॥

### अर्थ

हे शिवे, बिन्दू म्हणजे तुझे मुख, त्याखालील दोन बिंदू म्हणजे स्तनयुग्म व त्याही खाली शकराचे अर्धांग ( त्रिकोण ) कल्पून जो तुझ्या मदनकलेचे चिंतन करतो, तो नारीजनास तत्काळ मोहवितो. एवढेच नाही तर, चद्र-सूर्य ज्याचे स्तनयुग्म अशा त्रैलोक्यासही वश करतो. ॥ १९ ॥

### यंत्र



### उपासना

यत्र सोन्याच्या पत्र्यावर, भस्माने, गधाने, कुकुमाने, अथवा स्वयभू फुलाने काढणे. अनुष्ठान : २५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १२००० वेळा. नैवेद्य : दूध, मध आणि फळे. फलप्राप्ती : राजेलोक, राक्षस, स्त्रिया, जनावरे याना मोहित करणे.

### विवेचन

हाही श्लोक, मागल्या श्लोकाप्रमाणेच " मदन प्रयोग " म्हणून ओळखला जातो. देवीची " इच्छाशक्ति " रूपात, कामराजकूटाधिष्ठित म्हणून उपासना केल्यास, साधकास केवळ जगातील स्त्रियाच काय, पण त्रिलोक वश करता येतात, असे या श्लोकात दर्शविले आहे.

" मन्मथकला " या शब्दात क्लीम् हे बीज, तसेच 'क्' व 'ल्' सोडता उरणारे 'ई' हे गुप्त-महासारस्वत बीज सूचित केले आहे. त्या बीजात तीन बिंदु दाखविता येतात. ॥ १९ ॥


श्लोक

**किरन्तीमङ्गेभ्यः किरणनिकुरुम्बामृतरसं**
**हृदि त्वामाधत्ते हिमकरशिलामूर्तिमिव यः ।**
**स सर्पाणां दर्पं शमयति शकुन्ताधिप इव**
**ज्वरप्लुष्टान्दृष्ट्या सुखयति सुधासारसिरसा ॥ २० ॥**

अर्थ

तुझी मूर्ती हृदयकमलात चिंतून, तुझे चरणतेजाने, चन्द्रकांत मण्याप्रमाणे पाझरणाऱ्या अमृताने सर्वांग अमृतमय बनणारा ( तुझा उपासक ) गरुड पक्ष्याप्रमाणे सर्पांचे गर्वहरण ( नुसत्या दर्शनाने ) करतो. ( तसेच ) ज्वरग्रस्ताचे व्याधिनिवारण नुसत्या ( अमृतमय ) दृष्टिक्षेपाने करतो. ॥ २० ॥

यंत्र




उपासना

( १ ) यत्र भस्माने अगर पाण्याने काढावे. जपसंख्या दररोज १००० वेळा. फलप्राप्ती : विषापासून बचाव.

( २ ) यत्र भस्माने अगर पाण्याने काढावे. अनुष्टान ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज २००० वेळां, फलप्राप्ती : सर्पांना मोहित करणे.

विवेचन

या श्लोकात देवीच्या उपासनेने, साधकास कोणत्या दैवीशक्ती प्राप्त

होतात याचे वर्णन केले आहे. पहिल्या अर्ध्या भागात, देवीची अमृतेश्वरी म्हणून उपासना करणाऱ्या साधकाचे नुसत्या दर्शनाने, सर्प, गरुड पक्ष्यास पाहून जसे बिळात लपतात, तशीच सर्पांची अवस्था होते हे दाखविले आहे. म्हणजे देवीच्या उपासनेने साधकास सर्पांपासून भय रहात नाही. दुसऱ्या भागात, साधक आपल्या अमृतमय नजरेने काय करू शकतो याचे वर्णन केले आहे. रोगपीडिताचे दुःख निवारण करण्यास वैद्यास औषधयोजना करावी लागते. पण तेच कार्य, अमृतनाडी रहस्य जाणणारा देवीचा उपासक, त्याचे सर्व शरीरच अमृतमय झाल्याने केवळ दृष्टिक्षेपानेही करू शकतो. ॥ २० ॥


### श्लोक

**तटिल्लेखातन्वीं तपनशशिवैश्वानरमयीं**
**निषण्णां षण्णामप्युपरि कमलानां तव कलाम् ।**
**महापद्माटव्यां मृदितमलमायेन मनसा**
**महान्तः पश्यन्तो दधति परमाल्हादलहरीम् ॥ २१ ॥**

### अर्थ

(अविद्येने येणारे) अशुद्धत्व आणि मनोभ्रम (श्रीविद्याज्ञानाने) नष्ट झालेले योगी, विद्युतरेखेप्रमाणे तन्वंगी, चन्द्र, सूर्य, अग्नी, तेजाचे सार, कमलवनांत सर्व षट्कमला (षट्चक्र) पेक्षा उंच अशा सहस्रदल कमलात (चक्रात) स्थित अशा (तुझ्या) चन्द्रकला दर्शनाने, अनुपम सुख मिळवितात. ॥ २१ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या, चांदीच्या अगर तांब्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या दररोज १००० वेळा. नैवेद्य : फळे, मध अगर गूळ. फलप्राप्ती : शत्रूवर विजय.

## विवेचन

श्लोक १९ मध्ये तीन बिंदुरूपाने त्रिपुरसुंदरीची कामकलारूप उपासना दिग्दर्शित केली आहे. तीन बिंदू म्हणजे वरचा बिंदू, अग्नितत्वदर्शक, राजस गुण दर्शक ब्रम्हदेवाचे अधिकाराखालील, नतरचे दोन बिंदू चद्र सूर्य तत्वे दर्शक, तमोगुण व सत्त्वगुणदर्शक, व रुद्र व विष्णू याचे आधिपत्याखाली येतात. त्याच्या खाली, सूक्ष्म चित्कला ही " ह " कारातील वरचा अर्धा भाग सोडलेली, त्रिगुणात्मक योनी, म्हणजेच तीन बिंदू जोडणारा त्रिकोण, त्रिगुणदर्शक

ही वर्णन केलेली उपासना " बाह्य उपासना " होय.

या श्लोकात अभ्यातर, आतर उपासना, देवीची चित्स्वरूप उपासना वर्णन केली आहे. अर्थातच ही उपासना फक्त थोर योगी जनासच शक्य आहे. त्यापेक्षा कमी अधिकाराच्या साधकासाठी श्लोक १९ मधील बाह्य उपासनाच योग्य आहे.

या आतर उपासनेत, देवीचे उपासना मत्रातील ( पंचदशाक्षरी ) प्रत्येक अक्षराची धारणा, शरीरान्तर्गत १८ चक्रात करून, मग या अक्षरातील एका आड अक्षर वरच्या अक्षरात समाविष्ट करीत शेवटी सर्व अक्षरे विलीन होऊन साधक उपास्यदेवत " शिवशक्ती " मय होतो व जीवन्मुक्त होतो.

शरीरान्तर्गत १८ चक्रे अशी : ( १ ) कौलपद्म ( २ ) विशु ( ३ ) मूळाधार, ( ४ ) मणिपुर ( ५ ) स्वाधिष्ठान ( ६ ) अनाहत ( ७ ) विशुद्धी ( ८ ) लंबिकाग्र ( ९ ) आज्ञा, ( १० ) इन्दू ( ११ ) अर्धचन्द्र ( १२ ) रोधिनी ( १३ ) नाद, ( १४ ) नादान्त ( १५ ) शक्ती ( १६ ) व्यापिका, ( १७ ) समना व ( १८ ) उन्मना. ॥ २१ ॥


## श्लोक

**भवानि त्वं दासे मयि वितर दृष्टिं सकरुणा–**
**मिति स्तोतुं वाञ्छन्कथयति भवानि त्वमिति यः**
**तदैव त्वं तस्मै दिशसि निजसायुज्यपदवी–**
**मुकुन्दब्रम्हेन्द्रस्फुटमकुटनीराजितपदाम् ॥ २२ ॥**

## अर्थ

( ज्यावेळी ) तुझा उपासक, " हे भवानी, या तुझ्या दासानुदासावर कृपादृष्टी टाक " अशा ( लीनभक्ति ) भावनेने याचना करताना "भवानि त्वाम्" ( माते, तू आणि मी एकच ) असे उच्चार करतो, त्याच क्षणी, हे देवी, ब्रह्मा, विष्णू, इन्द्र यांच्या ( देदीप्यमान ) मुकुटाची निरांजन प्रभा ल्यालेली तू, त्यास सायुज्यता देतेस. ( तुझ्यात सामावून घेतेस. ) ।। २२ ।।

## यन्त्र



## उपासना

यन्त्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. यंत्र ताईताप्रमाणे जपानंतर बांधावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध, त्रिमधुरा, दही, दूध, आणि विविध मसालेभात.
फलप्राप्ती : सर्व ऐहिक सुखांची प्राप्ती, कशाचीही कमतरता न पडणे.

## विवेचन

श्लोक १९ मध्ये बाह्य-उपासना व मागील श्लोकात " आंतर-उपासना " दिग्दर्शित केल्यावर, या श्लोकात भक्ती उपासनेचे वर्णन केले आहे. भक्ती उपासनेत भक्त, आराध्य दैवतमय होऊनच जात असतो. " तत् त्वमसि " या महावाक्यातच भक्तिमार्गाचे सार आहे.

जो या भक्तिमार्गाने देवीची उपासना करतो, तो सायुज्यप्राप्ती मिळवून जीवन्मुक्त होतो, हेच या श्लोकात सांगितले आहे. ॥ २२ ॥


## श्लोक

त्वया हृत्वा वामं वपुरपरितृप्तेन मनसा
शरीरार्धं शंभोरपरमपि शङ्के हृतमभूत् ।
यदेतत्त्वद्रूपं सकलमरुणाभं त्रिनयनं
कुचाभ्यामानम्रं कुटिलशशिचूडालमकुटम् ॥ २३ ॥

## अर्थ

हे माते, तुझे संपूर्ण शरीरच आरक्तवर्णी, त्रिनयनयुक्त, स्तनभाराने किंचित् वाकलेले, मुकुटावर चन्द्रकोर धारण केलेले पाहून, शिवाचे केवळ वामांगच व्यापून समाधान न झाल्याने, त्याचे उजवे अर्धांगही तू व्यापलेस, असा मला भास होतो. ॥ २३ ॥

## यंत्र



## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, अनुष्ठानानंतर घरात पूजेत ठेवणे.

अनुष्ठान : ३० दिवसांचे. जपसंख्या : दररोज २००० वेळा.

नैवेद्य : दुधाची खीर. फलप्राप्ती : रोग, कर्ज, अमानवी त्रासांपासून मुक्तता.

## विवेचन

इतर अनेक श्लोकांत असलेलीच मध्यवर्ती कल्पना " शिवः शक्तीयुक्ता " हीच याही श्लोकात सांगितली आहे. शंकराचे अर्धनारीनटेश्वराचे रूप या श्लोकात घेतले आहे. या रूपात शंकराचा अर्धा उजवा भाग व उमेचा अर्धा डावा भाग असतो. पण एवढयावरच तृप्ती न झाल्याने हल्के हल्के उमेने शंकरांचा भागही व्यापण्यास सुरवात केली. शंकराचा रंग फिक्कट पांढरा. तोही रंग व्यापल्यामुळे पांढऱ्याऐवजी तांबूस ( उमेचा वर्ण आरक्त ) दिसू लागला. तिसरा डोळा व चन्द्रकला ही समान झाली. शंकराचे उजव्या भागाचे वक्षाचाही आकार वृद्धिंगत झाला. हेच या श्लोकात सुचविले आहे.

उत्तर कौलमार्गीयांच्या तत्वाप्रमाणे " शिवतत्त्व शक्तितत्त्वाने संपूर्णपणे व्यापलेले असल्यामुळे शिवतत्त्व नाहीच, फक्त शक्तितत्त्वच आहे " हेच तत्त्व या श्लोकात दर्शविले आहे. ॥ २३ ॥


## श्लोक

**जगत्सूते धाता हरिरवति रुद्रः क्षपयते**
**तिरस्कुर्वन्नेतत्स्वमपि वपुरीशस्तिरयति ।**
**सदापूर्वः सर्वं तदिदमनुगृण्हाति च शिव–**
**स्तवाज्ञामालम्ब्य क्षणचलितयोर्भ्रूलतिकयोः ॥ २४ ॥**

## अर्थ

ब्रह्मदेव हे जग निर्माण करतो, विष्णू त्याचे पालन करतो व रुद्र त्याचा संहार करतो. शेवटी हे सर्व अदृश्य करून स्वतः ईश्वरही अदृश्य ( विलीन ) होतो. श्रीदेवीचे भृकुटीसंकेताने चालणारा ( फक्त ) सदाशिव ( परमेश्वर ) यास साक्ष उरतो. ( लहान तत्त्व क्रमाने मोठ्या तत्त्वात विलीन होत शेवटी फक्त परमतत्त्व शिल्लक राहणे, या उत्पत्ति, स्थिती, लय या उत्क्रांतिचक्राचा स्वीकार करतो ) ॥ २४ ॥

## यंत्र




## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, जपानंतर ताईताप्रमाणे गळ्यात बांधावे.
अनुष्ठान : २० दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध. फलप्राप्ती : पिशाच्चत्रासापासून मुक्तता.

## विवेचन

उत्पत्ती व विनाश यांचे चक्र उत्क्रांति तत्त्वानुसारच आहे या तत्त्वानुसार ब्रह्मदेव सृष्टी निर्माण करतो. विष्णू तिचे पालन करतो तर रुद्र त्या सृष्टीचा संहार करतो. त्यानंतर या महाप्रलयात ईश्वर या सृष्टीबरोबरच ब्रह्मा, विष्णू, रुद्र यांनाही विलीन करून, आपण स्वत:ही नाहीसा होतो अशारीतीने, लहान तत्त्व, मोठ्या तत्त्वात विलीन होत होत सर्व लोक विनाश पावून शेवटी फक्त सदाशिव राहतो.

श्री देवीच्या संकेतानुसार, शिव पुन्हा नवीन सृष्टीच्या निर्मितीस सुरवात करतो. त्रिगुणातून तीन देव निर्माण करतो व ते देव पुन्हा आपल्या कार्यास सुरवात करतात. अशा रीतीने शेवटी श्रीशक्ती हीच सर्वश्रेष्ठ ठरते व पचमहाभूते त्या देवीचे दास आहेत हेच या श्लोकात विशद केले आहे. ॥ २४ ॥


## श्लोक

**त्रयाणां देवानां त्रिगुणजनितानामपि शिवे**
**भवेत्पूजा पूजा तव चरणयोर्या विरचिता ।**
**तथा हि त्वत्पादोद्वहनमणिपीठस्य निकटे**
**स्थिता ह्येते शश्वन्मुकुलितकरोत्तंसमकुटाः ॥ २५ ॥**

## अर्थ

हे शिवप्रिये, तुझ्या चरणकमलांची पूजा म्हणजेच, तुझ्या त्रिगुणांतून निर्माण झालेल्या साक्षात् ब्रह्मा, विष्णू, रुद्राचीच पूजा. म्हणूनच हे ( तिन्ही ) देव, तुझ्या ( सिंहासनाच्या ) ( रत्नखचित ) पायरीशेजारी, आपल्या बद्ध करानी मुकुटास हा स्पर्श करीत ( तुझ्या आज्ञेची वाट पाहात ) सदैव उभे असतात ॥ २५ ॥

## यंत्र



## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मध. फलप्राप्ती : मानसन्मानाची, बढतीची जागा मिळणे.

## विवेचन

मागल्या श्लोकांत देवी सर्वश्रेष्ठ कशी हे विशद केल्यावर, या श्लोकांत, देवीची उपासना म्हणजेच सर्व देवांची उपासना कशी हे सांगितले आहे. ब्रह्मा, विष्णू, रुद्र हे देवीचे सेवक आहेत. ते देवीच्या सिंहासनाच्या पायरीशेजारी तिच्या आज्ञेची वाट पाहात उभे असतात. यामुळेच, त्या देवीची उपासना करणे म्हणजे पर्यायाने या देवांचीही उपासना करण्यासारखेच आहे. कारण धन्याच्या सेवेतच चाकराला आनंद प्राप्त होत असतो. ॥ २५ ॥

## श्लोक


**विरिञ्चिः पञ्चत्वं व्रजति हरिराप्नोति विरतिं**
**विनाशं कीनाशो भजति धनदो याति निधनम् ।**

**वितन्द्री माहेन्द्री विततिरपि संमीलितदृशां**
**महासंहारेऽस्मिन्विहरति सति त्वत्पतिरसौ ।। २६ ।।**

### अर्थ

हे महासति, ( महाप्रलयात ) ब्रह्मदेव पंचत्वात विलीन होतो. विष्णूचे अस्तित्व संपते, ( खुद्द ) यम नाश पावतो, सहस्रनेत्र इन्द्राचे अचल नेत्र कायमचे मिटतात. अशा या महासंहारात केवळ तुझा पति शंकरच, सुरक्षित राहतो.।।२६।।

### यंत्र




### उपासना

( १ ) सोन्याच्या पत्र्यावर नावासहित कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ओळीने सहा महिन्यांतील प्रत्येक प्रतिपदेस ( शुद्ध पक्षातील ) जपसंख्या : १००० प्रमाणे. फलप्राप्ती : सर्वत्र विजयप्राप्ती.

( २ ) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ६ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : गुळाची खीर. फलप्राप्ती : शत्रूवर विजयप्राप्ती.

### विवेचन

या श्लोकांत, देवीच्या पातिव्रत्याचा महिमा वर्णिला आहे.

महाप्रलयात, ब्रह्मा, विष्णू, रुद्र यासारखे, मर्त्य मानवाचे दृष्टीने अमर, असे देवही नाश पावतात. पण एकटा सदाशिव मात्र बचावतो त्याचे कारण म्हणजे देवीच्या पातिव्रत्याचा प्रभावच होय. यावरूनही देवीच्या एकरूपत्वामुळेच शिवास शिव म्हणून स्थान आहे, हा गर्भित अर्थ उघड होतो. ।। २६ ।।


### श्लोक

**जपो जल्पः शिल्पं सकलमपि मुद्राविरचना**
**गतिः प्रादक्षिण्यक्रमणमशनाद्याहुतिविधिः ।**
**प्रणामः संवेशः सुखमखिलमात्मार्पणदशा**
**सपर्यापर्यायस्तव भवतु यन्मे विलसितम् ॥ २७ ॥**

### अर्थ

कोणतीही कृती माझ्याकडून घडो, ( हे माते ) ती तुझी पूजाच दर्शविते. माझे बोलणे म्हणजेच तुझी प्रार्थना, माझ्या दैनंदिन कार्यातील बदलत्या अवस्था ह्याच तुझ्या पूजेतील विविध मुद्रा, माझे ( काम करताना ) चालणे याच तुझ्या भोवती प्रदक्षिणा, माझे विविध अन्नोदकसेवन हेच तुझ्या यज्ञपूजेतील आहुति-द्रव्य, माझे ( झोपेसाठी ) आडवे पडणे हेच तुझे साष्टांग नमस्कार, आणि माझी सुखप्राप्ती म्हणजेच तुला आत्मसमर्पण. ॥ २७ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या अगर दुसऱ्या कोठल्याही चांदी, तांबे इत्यादी पत्र्यावर कोरून घ्या.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : गुळाची खीर फलप्राप्ती : आत्मज्ञानप्राप्ती.

### विवेचन

मागील श्लोकात देवीची महती, व तिच्या उपासनेने साधकास लाभणाऱ्या

सिद्धींचे वर्णन केल्यावर, या श्लोकांत, देवीशी तादात्म्य पावलेल्या साधकाचे वर्णन केले आहे.

देवीची उपासना करण्यात दोन प्रकार आहेत. पहिल्या उपासनेत साधक देवीची मूर्ती समोर ठेवून पचोपचार, मंत्रजप, मुद्रा, नैवेद्य वगैरेने उपासना करतो. दुसऱ्या उपासनेत या सर्व गोष्टी, देवीशी तादात्म्य पावून मनानेच होत असतात. स्तोत्ररचनाकार याच पद्धतीने उपासना करतो हे 'मे' या शब्दाने लक्षात येते.

अशा उपासनेत, साधकाची प्रत्येक हालचाल, शब्दोच्चार हा देवीकरताच होत असतो, असे या श्लोकात दाखविले आहे. ॥ २७ ॥


### श्लोक

**सुधामप्यास्वाद्य प्रतिभयजरामृत्युहरिणीं**
**विपद्यन्ते विश्वे विधिशतमखाद्या दिविषदः**
**करालं यत्क्ष्वेलं कवलितवतः कालकलना**
**न शंभोस्तन्मूलं तव जननि ताटङ्कमहिमा ॥ २८ ॥**

### अर्थ

हे माते, अजर, अमर करणारे (प्रख्यात) अमृत पिऊनही ब्रह्मेंद्रादि देव (महाप्रलयात) नाश पावतात. पण प्रत्यक्ष हलाहल पिऊनही भगवान शंकर (तुझे पती) चिरंजीव झाले हा तुझ्या कर्णभूषणाचाच (सौभाग्यालंकार) प्रभाव. ॥ २८ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर अगर सोन्याच्या कर्णभूषणावर कोरून गळ्यात अगर कानात वापरणे.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या दररोज १००० वेळा.
नैवेद्य : त्रि-मधुरा, दुधाची खीर आणि पानसुपारी.
फलप्राप्ती : अनैसर्गिक मृत्यूपासून बचाव, सर्व दुःखांचा शेवट.

## विवेचन

भक्तिभावाने देवीची उपासना करणाऱ्या उपासकास लाभणाऱ्या सिद्धींचे वर्णन, मागल्या श्लोकात केल्यावर, या श्लोकात देवीच्या सौभाग्यालंकाराचे सामर्थ्य वर्णन करून त्यायोगे उपासकासही अभयदान लाभते हे या श्लोकात वर्णिले आहे.

ब्रह्मा, इन्द्र, रुद्र इत्यादी देवाचा स्वर्गात वास असतो, ते अमृत पितात. अर्थात सामान्य मर्त्य मानवाच्या दृष्टीने हे स्वर्गनिवासी देव अमर आहेत. पण त्यानाही महाप्रलयात मृत्यू गाठतो. पण एकटा सदाशिव मात्र या संहारसत्रात अभग राहतो. याचे कारण, देवीची कर्णभूषणे हे होय. जोपर्यंत सुवासिनीच फक्त धारण करीत असलेली कर्णभूषणे देवीच्या कानात आहेत, तोपर्यंतच सदाशिवास मरण नाही. अर्थातच या कर्णभूषणावरच कालाचे अस्तित्व अवलंबून असल्यामुळे, ही कर्णभूषणे कानापासून बाजूला होणे कधीही शक्य नाही; म्हणजेच सदाशिवासही मरण कधीही नाही, हेच या श्लोकात सूचित केले आहे.

आपणाकडे सुवासिनीस मगळसूत्राचे जे महत्त्व, तसेच महत्त्व कर्णभूषणास, ताटंकास आहे. ॥ २८ ॥

## श्लोक


**किरीटं वैरिञ्चं परिहर पुरः कैटभभिदः**
**कठोरे कोटीरे स्खलसि जहि जम्भारिमकुटम् ।**
**प्रणम्रेष्वेतेषु प्रसभमुपयातस्य भवनं**
**भवस्याभ्युत्थाने तव परिजनोक्तिर्विजयते ॥ २९ ॥**

## अर्थ

"हे देवी, ब्रह्मदेवाचा मुकुट संभाळ, कैटभमर्दन श्रीविष्णूचे कठिण मुकुटास अडखळशील, इन्द्राचा मुकुट संभाळ." अवचित घरी येणाऱ्या शंकराच्या (स्त्रीसुलभ पतिप्रेमाने अधीर होऊन) स्वागतास उठताना, (साष्टांग नमस्कार

घातलेल्या त्रिदेवांना पाहून ) तुझ्या सेवकांनी दिलेल्या प्रेमळ इशाऱ्याचा विजय असो. ॥ २९ ॥

### यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून जपानंतर मनगटावर बांधावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध आणि दही.
फलप्राप्ती : रानटी वृत्ती ताब्यात आणणे.

### विवेचन

या श्लोकात एक भावपूर्ण प्रसंग रेखाटला आहे. देवीच्या निवासस्थानी ती सिंहासनावर बसली आहे. सभोवती तिच्या दासी, देवांगना हातांत विविध सामुग्री, उपचारद्रव्ये घेऊन उभ्या आहेत. देवीचे पायरीसमोर त्रिदेव, म्हणजेच ब्रह्मा, विष्णू, रुद्र देवीस साष्टांग नमस्कार घातलेल्या स्थितीत आहेत. अशावेळी अचानक, शंकराचे, देवीच्या पतीचे आगमन या दरबारात होते. अकस्मात घरी आलेल्या पतीच्या स्वागतास, स्त्रीसुलभ अधीरतेने उठणाऱ्या देवीस, तिच्या सेविका इशारा करतात, " जपून, देवी जपून ! तुझ्या या घाईत समोरच्या त्रिदेवाच्या मुगुटास अडखळशील. कसले कठिण मेले ते मुगूट. लागेल तुला ! "

किती भावमधुर शब्दचित्र, कवीने उभे केले आहे ! ॥ २९ ॥

### श्लोक


**स्वदेहोद्भूताभिर्घृणिभिरणिमाऽद्याभिरभितो**
**निषेव्ये नित्ये त्वामहमिति सदा भावयति यः ।**

**किमाश्चर्यं तस्य त्रिनयनसमृद्धिं तृणयतो**
**महासंवर्ताग्निर्विरचयति नीराजनविधिम् ॥ ३० ॥**

### अर्थ

(तुझ्या सायुज्यतेने सर्व इच्छा पूर्ण झाल्यामुळे) शंकराचे वैभव तृणवत् मानणारा उपासक, आद्यन्तरहित, व स्वशरीरोद्भूत तेजलहरी, अणिमादि देवता यांच्याकडून सदैव सेवा करून घेणाऱ्या अशा तुझी, "तू म्हणजेच मी" अशा अद्वैत भावनेने नित्य उपासना करतो, त्याच्यापुढे महाप्रलयाग्नी निरांजनारती करू लागला (अग्नी निरांजनाचे अग्नीप्रमाणे त्यास निरुपद्रवी भासला) तर त्यात आश्चर्य कसले? ॥ ३० ॥

### यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, जपानंतर मनगटावर बांधावे. अनुष्ठानः ९६ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा. नैवेद्य . मध, त्रि-मधुरा व पानसुपारी. फलप्राप्ती : अष्टयोगसिद्धी, आगीतून चालत जाणे.

### विवेचन

या श्लोकात देवीची उपासना करून देवीशी सायुज्यता पावलेल्या उपासकाचे वर्णन केले आहे. देवीशी एकरूप झाल्याने, त्याची मोठ्यात मोठी इच्छा पूर्ण झाल्याने तो पूर्ण तृप्त होतो. मग इतर कोणत्याच वैभवाची इच्छा त्याला राहात नाही. देवीशी, त्या आद्यन्तरहित त्रिपुरसुंदरीशी मिळून गेल्यावर, उपासकाला वेगळे अस्तित्वच नाही; तर मग जन्ममरणाची भीती कोठून असणार? मग प्रलयकाळचा अग्नी त्याला काय करू शकणार? हेच या श्लोकात दर्शविले आहे.

श्लोकाच्या पहिल्याच वाक्यात अणिमादी देवतांचा उल्लेख आहे. स्वशरीर म्हणजे श्रीचक्र व अणिमा इत्यादी देवता म्हणजे श्रीचक्राधिष्ठित ९ चक्राच्या विविध आवरणदेवता, या आहेत. या खाली दिल्याप्रमाणे क्रमाने भूपुर अथवा भूग्रहा-पासून, भूग्रहाच्या तीन रेखा, त्यावर वेगवेगळ्या देवतांची वस्ती असते.

(१) भूग्रहाची :—

पहिली रेषा (बाहेरून आत) यात अष्ट-सिद्धी राहतात. (१) अणिमा, (२) लघिमा, (३) महिमा, (४) वशित्वा, (५) ईशित्वा. (६) प्राकाम्या (७) प्राप्ती व (८) सर्व कामप्रदायिनी.

दुसऱ्या रेषेत अष्ट मातृका. (१) ब्राह्मी, (२) माहेश्वरी, (३) कौमारी, (४) वैष्णवी, (५) वाराही, (६) माहेन्द्री, (७) चामुंडा व (८) महालक्ष्मी

भूग्रहाच्या ३ ऱ्या रेषेत दश-मुद्रा. (१) सर्वसंक्षोभिणी, (२) सर्व, विद्राविणी, (३) सर्वाकर्षिणी, (४) सर्ववशकरी, (५) सर्वोन्मादिनी, (६) सर्वमहाकुशा, (७) सर्वखेचरी, (८) सर्वबीजा, (९) सर्वयोनी व (१०) सर्वत्रिखडा.

येणेप्रमाणे तीन भूग्रहांच्या आवरण देवता झाल्यावर, षोडषदल कमलाच्या दलावरील १६ देवता येणेप्रमाणे, (१) कामाकर्षिणी, (२) बुद्ध्याकर्षिणी, (३) अहकाराकर्षिणी. (४) शब्दाकर्षिणी, (५) स्पर्शाकर्षिणी. (६) रूपाकर्षिणी, (७) रसाकर्षिणी, (८) गधाकर्षिणी, (९) चित्ताकर्षिणी, (१०) धैर्याकार्षिणी, (११) स्मृत्याकर्षिणी, (१२) नामाकर्षिणी, (१३) बीजाकार्षिणी, (१४) आत्माकर्षिणी, (१५) अमृताकार्षिणी, व (१६) शरीराकर्षिणी, षोडषदलाच्या या देवतांनंतर, अष्टदल कमळाच्या, अष्ट देवता, येणेप्रमाणे होत :

(१) अनग–कुसुमा, (२) अनग–मेखला, (३) अनंग–मदना, (४) अनग–मदनातुरा, (५) अनंग–रेखा, (६) अनंग–वेदिनी, (७) अनंगाकुशा व (८) अनग–मालिनी.

अष्ट–दल कमळाच्या या अष्ट देवतानंतर, चतुर्दश कोनाच्या १४ देवता येणेप्रमाणे : (१) सर्वसंक्षोभिणी, (२) सर्व-विद्राविनी, (३) सर्वाकर्षिणी, (४) सर्वाल्हादिनी, (५) सर्व-संमोहिनी, (६) सर्वास्तभिनी, (७) सर्वजृंभिणी, (८)

सर्वत्रशंकरी, ( ९ ) सर्वरंजनी, ( १० ) सर्वोन्मादिनी, ( ११ ) सर्वार्थसाधिनी, ( १२ ) सर्व-संपत्तीपूरणी, ( १३ ) सर्वमत्रमयी व ( १४ ) सर्वद्वद्वक्षयकरी.

येणेप्रमाणे चतुर्भुजकोणाच्या देवतानंतर, बहिर्दशारचक्राच्या दहा देवता येणेप्रमाणे : ( १ ) सर्वसिद्धिप्रदा, ( २ ) सर्वसंपत्प्रदा, ( ३ ) सर्वप्रियकरी, ( ४ ) सर्वमंगलकारिणी, ( ५ ) सर्वकामप्रदा, ( ६ ) सर्वसौभाग्यदायिनी, ( ७ ) सर्व-मृत्युप्रशमनी, ( ८ ) सर्वविघ्ननिवारिणी, ( ९ ) सर्वांगसुंदरी व ( १० ) सर्वदुःख-विमोचिनी.

यानंतर आंतर्दशारचक्राच्या दहा देवता खाली दिल्याप्रमाणे आहेतः ( १ ) सर्वाज्ञा, ( २ ) सर्वशक्ती, ( ३ ) सर्वैश्वर्यप्रदा, ( ४ ) सर्वज्ञानमयी, ( ५ ) सर्वव्याधीविनाशिनी, ( ६ ) सर्वाधारस्वरूपा, ( ७ ) सर्वपापहरा, ( ८ ) सर्वानंद-मयी, ( ९ ) सर्वरक्षास्वरूपिणी, व ( १० ) सर्वेप्सितफलप्रदा.

यानतर अष्टकोणचक्राच्या आठ देवता येणेप्रमाणे : ( १ ) वशिणी, ( २ ) कामेश्वी, ( ३ ) मोदिनी, ( ४ ) विमला, ( ५ ) अरुणा, ( ६ ) जयिनी, ( ७ ) सर्वेशी, व ( ८ ) कौलिनी.

यानंतर आतील त्रिकोणचक्राच्या तीन देवता येणेप्रमाणे. ( १ ) कामेश्वरी, ( २ ) वज्रेशी व ( ३ ) भगमाला.

यानतर आतील बिंदूत श्रीत्रिपुरसुंदरी. वर दिलेल्या सर्व देवता या त्रिपुर सुंदरीच्या दासी होत. ॥ ३० ॥


### श्लोक

**चतुःषष्टया तन्त्रैः सकलमतिसंधाय भुवनं**
**स्थितस्तत्तत्सिद्धिप्रसवपरतन्त्रैः पशुपतिः ।**
**पुनस्त्वन्निर्बन्धादखिलपुरुषार्थैकघटना**
**स्वतन्त्रं ते तन्त्रं क्षितितलमवातीतरदिदम् ॥ ३१ ॥**

### अर्थ

वेगवेगळ्या सिद्धी प्राप्त करून देणाऱ्या अशा चौसष्ट तत्रानी लोकांना भुलवून, शंकरानी, तुझ्या विनवणीवरून, एकाच वेळी अनेक फले देणारे व मानवी-जीवन-साफल्यकारक असे एकच एक, असे तुझे हे तत्र जगात आणले आहे. ॥ ३१ ॥

यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मध आणि दूध. फलप्राप्तीः सर्व जनांत विशेषतः राजे लोकांत प्रियता लाभणे.

### विवेचन

भगवान शंकरांनी मर्त्य मानवाच्या कल्याणासाठी या भूमितलावर श्रीविद्या आणली. या विद्येचे आठ प्रकार हे आध्यात्मिक क्षेत्रात ज्यानी ज्ञान संपादन केले आहे, अशा अधिकारी पुरुषांसाठी, तर सामान्य जनाचे, म्हणजेच अध्यात्मात गती नसलेल्या लोकांसाठी ६४ तंत्रे आणिली. पहिल्या आठ प्रकारांनी केलेल्या उपासनेस सव्य मार्ग अथवा समयाचार म्हणतात. हे आठ मार्ग असे : ( १ ) चन्द्रकला, ( २ ) ज्योतिष्मती, ( ३ ) कलानिधी, ( ४ ) कुलार्णव, ( ५ ) कुलेश्वरी, ( ६ ) भुवनेश्वरी, ( ७ ) बार्हस्पत्य व ( ८ ) दुर्वासमाता. अर्थातच श्रीविद्योपासनेतील हे ८ सव्य-मार्ग, अधिकारी पुरुषांसाठी आहेत.

सामान्य अज्ञानी माणसांसाठी, जो कौलमार्ग सांगितला आहे, त्यांत वेगवेगळ्या सिद्धी देणारी ६४ तंत्रे येतात. ती येणेप्रमाणे : ( १ ) महा-माया संभार, ( २ ) योगिनी-जाल-संभार, ( ३ ) तत्त्व-संभार, ( ४ ) सिद्ध-भैरव, ( ५ ) बटुक-भैरव, ( ६ ) कंकाळ-भैरव, ( ७ ) काल-भैरव, ( ८ ) कालाग्नि-भैरव,

९ ) योगिनी-भैरव, ( १० ) महा-भैरव, ( ११ ) शक्ति-भैरव, ( १२ ) ब्राह्मी, ( १३ ) माहेश्वरी, ( १४ ) कौमारी, ( १५ ) वैष्णवी, ( १६ ) वाराही, (१७) माहेंद्री, ( १८ ) चामुंडा, ( १९ ) शिवदूती, ( २० ) ब्रह्म-यामल, ( २१ ) विष्णु-यामल, ( २२ ) रुद्र-यामल, ( २३ ) लक्ष्मी-यामल, ( २४ ) उमा-यामल, ( २५ ) स्कंद-यामल, ( २६ ) गणेश-यामल, ( २७ ) जयद्रथ-यामल, ( २८ ) चन्द्रज्ञान, ( २९ ) मालिनी-विद्या, ( ३० ) महा-संमोहन, ( ३१ ) वामनुस्त, ( ३२ ) महादेव, ( ३३ ) वातुल, ( ३४ ) वातुलोत्तर, ( ३५ ) कामिका, ( ३६ ) ह्रद्भेदक तंत्र, ( ३७ ) तंत्रभेद, ( ३८ ) गुह्यतंत्र, ( ३९ ) कलावाद, ( ४० ) कलासार, ( ४१ ) कुंडिकामाता, ( ४२ ) मातोत्तरा, ( ४३ ) विनाख्य, ( ४४ ) त्रोतला, ( ४५ ) त्रोतलोत्तर, ( ४६ ) पचामर्त, ( ४७ ) रूपभेद, ( ४८ ) भूतोद्दामर, ( ४९ ) कुलसार, ( ५० ) कुलोद्दिश, ( ५१ ) कुलचूडामणी, ( ५२ ) सर्वज्ञानोत्तर, ( ५३ ) महाकालीमाता, ( ५४ ) अरुणेश, ( ५५ ) मोदीनिश, ( ५६ ) वैकुठेश्वर, ( ५७ ) पूर्वाम्नाय, ( ५८ ) पश्चिमाम्नाय, ( ५९ ) दक्षिणाम्नाय, ( ६० ) उत्तराम्नाय, ( ६१ ) निरुत्तराम्नाय, ( ६२ ) विमल, ( ६३ ) विमलोत्तर, व ( ६४ ) देवी-माता.

अशी ही ६४ तंत्रे, सामान्य जनांसाठी सागितली. पण या तंत्रातून मिळणाऱ्या सिद्धींनी सामान्य लोक भुलून जाऊन, उपायाऐवजी अपायच चालू झाल्याने, पुनरपि भगवान शंकरानी कृपावंत होऊन, अनेक कामना पूर्ण करणारे एकच असे तंत्र सांगितले.

अशा तऱ्हेने पुढील श्लोकात वर्णन केलेल्या तत्राची पूर्वपीठिका, या श्लोकात वर्णिली आहे. ॥ ३१ ॥

## श्लोक

**शिवः शक्तिः कामः क्षितिरथ रविः शीतकिरणः**
**स्मरो हंसः शक्रस्तदनु च परामारहरयः ।**
**अमी हृल्लेखाभिस्तिसृभिरवसानेषु घटिता**
**भजन्ते वर्णास्ते तव जननि नामावयवताम् ॥ ३२ ॥**


## अर्थ

हे माते, शिव, शक्ती, काम, क्षिती, नंतर रवी, शीतकिरण, स्मर, हंस,

शक्र, त्यानंतर परा, मार, आणि हरी, अशी (तीन खंडांत) मूळाक्षरे घेऊन (मूलबीज) घेऊन, प्रत्येक खंडाच्या शेवटी हल्लेखा लावल्याने तुझ्या नावाचे भाग बनतात. ॥ ३२ ॥

(या श्लोकात श्रीविद्येच्या षोडशाक्षरी मंत्राची पंधरा मूलबीजे वर्णन केलेली आहेत. षोडशाक्षरी मत्र पूर्ण होण्याकरिता लागणारे सोळावे बीज गुरुमुखातूनच साधकाने घ्यावे.)

### यंत्र



### उपासना

(१) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : दही-भात. फलप्राप्ती : रसायनशास्त्रात पारंगतता.
(२) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, जपानंतर धंद्याच्या जागी ठेवणे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : गोड पोंगल. फलप्राप्ती : धंद्यात उन्नती, यशप्राप्ती.

### विवेचन

मागल्या श्लोकात पूर्वपीठिका सांगितलेले तत्र (षोडशाक्षरी मंत्र,) या श्लोकात उघड करून सांगितले आहे. या श्लोकात जी नावे घेतलेली आहेत, त्यांच्या मूलबीजानी हा षोडषाक्षरी मंत्र तयार होतो. या षोडशाक्षरी मत्राचे एकूण चार पाद पडतात. प्रत्येक दोन पादात हल्लेखा घालावयाची असते. शेवटचा पाद अगर कांड, फक्त एकाच अक्षराचा आहे. अर्थातच, हा मंत्र गुरुमुखातूनच घ्यावा.

या षोडशाक्षरी मंत्राचे चार पाद अगर कांड पडतात. पहिला पाद अगर कांड हा चार बीजाक्षरांचा असून तो अग्नितत्त्व, क्रियाशक्ती, जागृत अवस्था,

विश्वावर्ती व तमोगुणदर्शक आहे. दुसरा पाद हा पाच बीजाक्षराचा असून, सूर्यतत्त्व, इच्छा-शक्ती, स्वप्नावस्था, तैजसावर्ती व रजोगुणनिदर्शक आहे. तृतीय पाद हा तीन बीजाक्षरांचा असून, चंद्रतत्त्व, ज्ञानशक्ती, सुषुप्ती अवस्था, प्रज्ञावर्ती व सत्त्वगुण निदर्शक आहे.

पहिल्या व दुसऱ्या पादातील हल्लेखा रुद्र-ग्रथी दर्शविते. दुसऱ्या व तिसऱ्या पादातील हल्लेखा विष्णुग्रंथी दर्शविते. तिसऱ्या व चवथ्या पादातील हल्लेखा ब्रह्मग्रथी दर्शविते. चतुर्थ पादात फक्त एकच बीजाक्षर असून, त्याला चन्द्रकला असे म्हणतात. हा चतुर्थ पाद फक्त गुरुमुखातूनच शिष्याने घ्याव-याचा असतो.

पहिली चार अक्षरे + हल्लेखा, या प्रथम विभागास वाग्भवकूट असे नाव असून, हे कूट म्हणजे त्रिपुरसुंदरीचे मुख आहे. दुसऱ्या पाच बीजाक्षरे + हल्लेखा या विभागास "कामराज कूट" असे म्हणतात, व हा कूट म्हणजे देवीच्या कंठापासून कमरेपर्यंत भाग बनतो. तिसरा विभाग हा तीन बीजाक्षरे + हल्लेखा असा बनतो. यास "शक्तिकूट" असे नाव असून, हा देवीच्या कमरे-पासून पायापर्यंतचा भाग बनतो. अशा रीतीने हे देवीचे मंत्ररूप असून, देवी मंत्रमयी आहे, व या मंत्राचे सामर्थ्यही अनन्य साधारण आहे.

हीच षोडशाक्षरी विद्या, यांत वर्णिली आहे. त्याच्या उच्चाराची पद्धत गुरूकडूनच समजावून घेतली पाहिजे. गुरूशिवाय गती नाही.

या पधरा बीजाक्षरानीच कादीविद्या तयार होते. ॥ ३२ ॥

## श्लोक


**स्मरं योनिं लक्ष्मीं त्रितयमिदमादौ तव मनो–**
**र्निधायैके नित्ये निरवधिमहाभोगरसिकाः ।**
**भजन्ति त्वां चिन्तामणिगुणनिबद्धाक्षवलयाः**
**शिवाग्नौ जुह्वन्तः सुरभिघृतधाराऽऽहुतिशतैः ॥ ३३ ॥**

## अर्थ

हे अविनाशी देवी, स्मर (मदन), योनी (भुवनेश्वरी) आणि लक्ष्मी (रमा) यांची (मूळबीजांची) तुझ्या मत्रापुढे स्थापना करून, परमानंद मिळवू

पाहणारा साधक, चिन्तामणी रत्नाच्या माळेने, शिवाग्नीवर कामधेनूच्या तुपाच्या शेकडो आहुती देऊन पूजा करतो.

### यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, अनुष्ठानानंतर हरणाचे शिंगाची पेटी करून त्यात ठेवून जमिनींत पुरावे.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा. जप करताना एखादे नाणे मुठीत धरून जप करावा. फलप्राप्ती : धनप्राप्ती. हातात धरलेल्या नाण्याच्या दहापट रक्कम मिळेल.

### विवेचन

मागील श्लोकात देवीचा पचदशाक्षरी मंत्र ( हादीविद्या ) सांगितल्यावर, त्याची काय व कशी उपासना केल्याने, इतर काहीही न करतानाही सुखसमृद्धी इत्यादी साधकाच्या इच्छा कशा पुऱ्या होतात, ते या श्लोकात दिले आहे.

स्मर ( म्हणजेच मदन बीज क्लीं ) योनी ( भुवनेश्वरी बीज ह्रीं ) आणि लक्ष्मी ( रमा बीज श्रीं ) ही तीन बीजे, हादीविद्येचे आरंभी लावल्याने जो मंत्र तयार होतो, त्याने महाभोगप्राप्ती होते. तसेच क ( स्मर ) इ ( योनी ) व ई ( लक्ष्मी ) ही बीजे हादीविद्येच्या ह, स, क. या बीजाक्षरांच्याऐवजी योजिल्याने कादी विद्या तयार होतें. कादी विद्येच्या उपासनेने, साधकास सर्व प्रकारचे सुखोपभोग मिळतात ॥ ३२ ॥

### श्लोक

**शरीरं त्वं शंभोः शशिमिहिरवक्षोरुहयुगं**
**तवात्मानं मन्ये भगवति नवात्मानमनघम् ।**


मंत्रशास्त्र

**अतः शेषः शेषीत्ययमुभयसाधारणतया**
**स्थितः संबन्धो वां समरसपरानन्दपरयोः ॥३४॥**

### अर्थ

हे देवी, चन्द्रसूर्य स्तनयुग्म असणारे तुझे शरीर म्हणजे प्रत्यक्ष शंकरच. मी तुझ्या निर्दोष शरीराची (श्रीचक्राची) नवात्मन म्हणजे शंकर म्हणूनच पूजा करतो. श्रेष्ठ कल्याण, चेतना प्रदान करण्यात समतुल्य अशा तुम्हा उभयताच्या कार्यात प्रमुख-दुय्यम ही पदे समानच राहतात. ॥ ३४ ॥

### यंत्र




96030

### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य (१) मध. फलप्राप्ती प्रतिभाशक्तीत वृद्धी
(२) काळी मिरीपूड, तुपात मिसळलेली.
फलप्राप्ती साध्यांचे संधिवातापासून मुक्ती.

### विवेचन

शिवशक्ती अभेद्य, एकरूपच आहेत व त्याची कामे एकमेकाना पूरक आहेत, हेच तत्त्व यात वर्णिले आहे.

या श्लोकात चंद्र-सूर्यास, शक्तीचे स्तनयुग्म संबोधिले आहे. पण चंद्र-सूर्य ही कालगणनेत काल वाचक असल्यामुळे, शिवमय आहेत. म्हणजेच शिवशक्ती एकच आहेत. भगवान शंकर नवव्यूहात्मक आहेत. ते नऊ व्यूह असे. १) काल-यांत निमिषापासून आदीअनादी कालाचा समावेश होतो. चंद्र-सूर्य हे सुद्धा कालगणनेत अंतर्भूत होत असल्याने तेही "काल" या शब्दात मोडतात. २) कुल-यात सप्तरंग येतात. ३) नामन—एक नाम. (४) ज्ञान-यात घन, द्रव

व वायू पदार्थांचे ज्ञान मोडते. ५ ) चित—यांत अहकार, बुद्धी इत्यादींचा समावेश होतो. ६ ) नाद—या शब्दात परा, पश्यती, मध्यमा व वैखरी या वाणींचा समावेश होतो. ७ ) बिंदू—यात षट्चक्रे मोडतात. ८ ) कला—या शब्दात ५० अक्षराचा समावेश होतो. व ९ ) जीव-यात जीवात्मे, जगणारे सर्व याचा समावेश होतो. शंकराचे शरीरच यानी बनले आहे.

तसेच देवीचेही नऊ व्यूह असे. १ ) वामा, २ ) ज्येष्ठा, ३ ) रौद्री व ४ ) अंबिका अशा चार योनी, श्रीचक्रात खाली टोके असलेल्या त्रिकोणानी दर्शविलेल्या, व ५ ) इच्छा, ६ ) ज्ञान, ७ ) क्रिया, ८ ) ज्ञाता व ९ ) परा या पाच योनी, श्रीचक्रातील वर टोके असणाऱ्या त्रिकोणांनी दर्शविलेल्या, येणेप्रमाणे नऊ व्यूह आहेत.

परमानद रूपी महाभैरव शिव हा चित्स्वरूपी महाभैरवीनें ( शक्तियुक्त) संयुक्त असतो. या दोघाच्याही क्रिया एकमेकाना पूरकच असल्यामुळे, त्या दोघाच्यात आधार व आधेय ठरविता येत नाही.

विनाशकाली, महाप्रलयात शिवतत्त्व पुढे असते तर उत्पत्ती, स्थितींत देवी-तत्त्व पुढे असते. विनाशाशिवाय उत्पत्ती नाहीं आणि उत्पत्तीच नसेल तर विनाशही शक्य नाही. याचमुळे दोघात श्रेष्ठकनिष्ठ ठरविता येत नाही हे उघड आहे. ॥ ३४ ॥

## श्लोक


**मनस्त्वं व्योम त्वं मरुदसि मरुत्सारथिरसि**
**त्वमापस्त्वं भूमिस्त्वयि परिणतायां न हि परम् ।**
**त्वमेव स्वात्मानं परिणमयितुं विश्ववपुषा**
**चिदानन्दाकारं शिवयुवति भावेन बिभृषे ॥ ३५ ॥**

## अर्थ

हे शिवयुक्ती, ( आज्ञा चक्रातील ) मन तूच आहेस. ( विशुद्धीतील ) अवकाश, ( अनाहतातील ) वायू, ( स्वाधिष्ठानातील ) अग्नी, ( मणिपुरातील ) आप ( पाणी ), आणि ( मूलाधारातील ) पृथ्वी तूच आहेस. अशातऱ्हेने रूपांतर केल्यावर, तुझ्या पलीकडे काही उरतच नाही ( अशा रीतीने ) या अखिल

ब्रह्मांडांत स्वतःला व्यक्त करून आतूनही चित्, आनंद स्वरूप धारण करतेस. ॥ ३५ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून जपानंतर ताईताप्रमाणे बांधणे.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : साखर, मध, दूध आणि दुधाची खीर.

फलप्राप्ती अपचनापासून मुक्तता.

### विवेचन

या श्लोकात देवीचे सर्वव्यापित्व दर्शविले आहे. मन व पंचमहाभूते ही देवीचीच रूपे आहेत. हे विश्व या पंचमहाभूतांनी व त्यांच्या मिश्रणाने बनले आहे. तर मन, प्रज्ञा हीही देवीचीच शक्तिरूपे आहेत. त्यामुळे नावे, व वस्तू वेगवेगळ्या दिसल्या, भासल्या तरी त्यातील मूलद्रव्ये एकच आहेत व ती देवीचीच रूपे आहेत, थोडक्यात या अखिल ब्रह्मांडात जे आहे ते देवीचेच रूप आहे, असे या श्लोकात दर्शविले आहे.

उत्तर कौलमार्गियांचे हेच तत्त्व आहे. देवी हीच सर्व जगाचे उत्पत्तिस्थान असल्यामुळे मुख्य तत्त्व आहे. तिच्यापलीकडे दुसरे तत्त्वच नाही. ॥ ३५ ॥


### श्लोक

**तवाज्ञाचक्रस्थं तपनशशिकोटिद्युतिधरं**
**परं शंभुं वन्दे परिमिलितपार्श्वं परचिता ।**
**यमाराध्यन्भक्त्या रविशशिशुचीनामविषये**
**निरातङ्के लोको निवसति हि भालोकभवने ॥ ३६ ॥**

### अर्थ

तुझ्या आज्ञाचक्रांत वास करणारा, असंख्य चन्द्रसूर्यांच्या प्रकाशाने चकाकणारा, चित्परांम्बा ( देवी स्वतः ) रूपाने डावी बाजू वेढिलेला, ज्याला संपूर्ण भक्तिभावनेने पूजिले असता अग्नी, चन्द्र, सूर्यांच्याही वर ( सहस्रारचक्रात ) स्थान देणारा, (जन्ममरणाच्या) दुःखातून मुक्त करणाऱ्या पराशंभुनाथास (शंकरास) मी वदन करतो. ॥ ३६ ॥

### यंत्र




### उपासना

१ ) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मध. फलप्राप्ती : असाध्य रोगापासून मुक्तता.

२ ) यंत्र पाण्याच्या भांड्यात काढावे.

अनुष्ठान : १५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मिरपूड टाकलेला भात. फलप्राप्ती : वरीलप्रमाणे.

### विवेचन

या व पुढल्या सहा श्लोकात देवी शरीरांतील सहा चक्रांचा उल्लेख करून, साधक या चक्रात शिवशक्तीची उपासना, कोणत्या दैवतास उल्लेखून करतो, हे दिले आहे.

या श्लोकात, साधक देवीच्या आज्ञाचक्राची उपासना करताना शिवशक्ती ही अनुक्रमे " परशंभुनाथ " व " चित्परांम्बा " म्हणून करतो. आज्ञाचक्रात या उभय देवताची आज्ञाचक्राच्या ६४ किरण श्लोकांनी युक्त अशी कल्पना करून उपासना या श्लोकात सांगितली आहे. या उपासनेने साधक जीवन्मुक्त होतो हे सूचित केले आहे. ॥ ३६ ॥


### श्लोक

**विशुद्धौ ते शुद्धस्फटिकविशदं व्योमजनकं**
**शिवं सेवे देवीमपि शिवसमानव्यवसिताम् ।**
**ययोः कान्त्या यान्त्या शशिकिरणसारुप्यसरणिं**
**विधूतान्तर्ध्वान्ता विलसति चकोरीव जगती ॥ ३७ ॥**

### अर्थ

शुद्ध स्फटिकाप्रमाणे शुभ्र, अवकाश निर्माण करणाऱ्या, शंकराची, व तेच ( शिवसमान ) कार्य करणाऱ्या तुझी, विशुद्धीचक्रात पूजा करतो. तुम्हा उभयतांच्या ( अंग ) तेजाने उत्पन्न होणाऱ्या शीतल चांदण्याप्रमाणे समान अशा किरणांनी, हे विश्व, अंधकार नष्ट झाल्याने ( एकाद्या ) चकोरीप्रमाणे आनंदित होते. ॥ ३७ ॥

### यंत्र




### उपासना

१ ) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे, अगर पाण्याच्या भांड्यात काढावे.

जपसंख्या : दररोज ५००० वेळा.

नैवेद्य : फळे, नारळ व गुळाची खीर. फलप्राप्ती : ब्रह्मराक्षसापासून त्रासमुक्ती.

२ ) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे, अगर पाण्याच्या भांड्यात काढावे.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : दुधाची खीर, गोड वड्या
फलप्राप्ती : ब्रह्मराक्षस त्रासापासून, तसेच सर्व असाध्य रोगापासून सुटका.

## विवेचन

या चक्रात देवीच्या विशुद्धी चक्राची उपासना साधक करतो, असे दर्शविले आहे. तो विशुद्धी चक्राची उपासना करीत असल्याने, चन्द्र-सूर्य नाड्या, इडा पिंगला या नाड्यांच्या कार्यात अडथळा येतो. तसेच विशुद्धी चक्राच्या सोळा पाकळ्यांवरील चन्द्रकलाही कार्यहीन होतात. त्यामुळे तेथे वास्तविक अंधार पाहिजे. पण विशुद्धी चक्राची देवता (शिवशक्ती) अनुक्रमे व्योमेश्वर व व्योमेश्वरी याच्या अगाच्या तेजानेच चन्द्रकिरणांचे कार्य होऊन, हा भाग प्रकाशित होतो व अंधार नाहीसा होतो.

या चक्रातील देवता व्योमेश्वर व व्योमेश्वरी या ७२ नाभासमयूक्तांनी युक्त आहेत. ॥ ३८ ॥

## श्लोक


**समुन्मीलत्संवित्कमलमकरन्दैकरसिकं**
**भजे हंसद्वन्द्वं किमपि महतां मानसचरम् ।**
**यदालापादष्टादशगुणितविद्यापरिणति—**
**र्यदादत्ते दोषाद् गुणमखिलमद्भ्यः पय इव ॥ ३८ ॥**

## अर्थ

पाण्यातून दूध वेगळे करावे, त्याप्रमाणे वाईटातून चांगले काढून घेणाऱ्या, आपल्या संयुक्त कलरवातून अठरा विद्यांचे प्रगटीकरण करणाऱ्या, (साधकाचे) मानस (मनरूपी) सरोवरात विहार करणाऱ्या, उमलत्या ज्ञानकमलातील मध शोषून राहणाऱ्या त्या एकमेव हंस-मिथुनाची मी पूजा करतो. ॥ ३८ ॥

(ज्ञानप्राप्तीसाठी साधकाच्या मनात अखंड चालणाऱ्या सोऽहम् मंत्रातील ह हा शिवरूपी हंस, हंसेश्वर व "स" शक्तिरूपी हंसेश्वरी, जपाने साधकास ज्ञानप्राप्ती होते हे या श्लोकात दर्शविले आहे.)

### यंत्र




### उपासना

१ ) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : ११ उडदाच्या वड्या, नारळ व पानसुपारी. फलप्राप्ती : बालरोग-मुक्ती २ ) सोन्याचे पत्र्यावर अगर पाण्याचे भाड्यात यंत्र काढणे.

अनुष्ठान : ४ दिवसाचे. जपसंख्या : दररोज ४००० प्रमाणे.

फलप्राप्ती : वरीलप्रमाणेच बालरोगमुक्ती.

### विवेचन

या श्लोकात साधक शिवशक्ती उपासना हृदकमलचक्रात ( अनाहत चक्रात ) करतो असे दाखविले आहे.

या चक्रातील देवता ( शिवशक्ती ) हंसेश्वर व हसेश्वरी या दर्शविल्या आहेत. त्यांच्या उपासनेने साधकास १८ विद्यांचा लाभ, व हसक्षीर न्यायाने वाईटांतून चागले घेणे अवगत होते.

या १८ विद्या येणेप्रमाणे : १ ) शिक्षा, २ ) कल्प, ३ ) व्याकरण, ४ ) निरुक्त, ५ ) ज्योतिष, ६ ) छंदस, ७ ) ऋग्वेद, ८ ) यजुर्वेद, ९ ) सामवेद, १० ) अथर्ववेद, ११ ) पूर्व-उत्तर मीमासा, १२ ) न्याय, १३ ) पुराण, १४ ) धर्मशास्त्र, १५ ) आयुर्वेद, १६ ) धनुर्वेद, १७ ) गाधर्ववेद, व १८ ) नीतिशास्त्र. ।। ३८ ।।

### श्लोक

**तव स्वाधिष्ठाने हुतवहमधिष्ठाय निरतं**
**तमीडे संवर्तं जननि महतीं तां च समयाम् ।**

**यदालोके लोकान्दहति महति क्रोधकलिते**
**दयार्द्रा या दृष्टिः शिशिरमुपचारं रचयति ॥ ३९ ॥**

### अर्थ

हे माते, अग्नितत्त्वाचा जनक, स्वाधिष्ठान चक्रात राहणारा, आपल्या क्रोधभरित दृष्टीने ( तिसऱ्या डोळ्याने )! सर्व ब्रह्मांडाचे भस्म करणारा, समवर्ते ( म्हणजेच शिव ) आणि आपल्या दयार्द्र दृष्टिक्षेपाने हा अग्निसंहार थंड करणारी समया ( शक्ती ) याची मी स्तुती करतो ॥ ३९ ॥

### यंत्र

| | | |
|---|---|---|
| ठं | पं | पः |
| | पं | सं |

### उपासना

यंत्र सोन्याच्या अगर चांदीच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : १२ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १०८ वेळा.
नैवेद्य : दूध, दुधाची खीर, मध अगर पोंगल.
फलप्राप्ती : वाईट स्वप्ने पडण्यापासून मुक्तता.

### विवेचन

या श्लोकात, देवीच्या स्वाधिष्ठान चक्रांत, "समवर्तेश्वर" व "समयाम्बा" या देवतांची ( शिवशक्तीची ) बासष्ट तेजसमयूखांनी वेढलेली अशा रूपात उपासना करतो, हे दर्शविले आहे. ॥ ३९ ॥


### श्लोक

**तडित्वन्तं शक्त्या तिमिरपरिपन्थिस्फुरणया**
**स्फुरन्नानारत्नाभरणपरिणद्धेन्द्रधनुषम् ।**
**तव श्यामं मेघं कमपि मणिपूरैकशरणं**
**निषेवे वर्षन्तं हरमिहिरतप्तं त्रिभुवनम् ॥ ४० ॥**

## अर्थ

अग्नी व सूर्य यांच्या तेजकिरणांनी होरपळलेल्या जगावर बरसात करणाऱ्या अलंकारातील रंगीबेरंगी खड्यामुळे काळोखाच्या पार्श्वभूमीवर इन्द्रधनुष्याप्रमाणे भासणाऱ्या शक्तिरूपी विद्युल्लतेने युक्त, अशा त्या तुझ्या मणिपूर चक्रातील प्रचंड निळ्याकाळ्या मेघाची ( मेघेश्वर म्हणजे शिव आणि विद्युल्लता म्हणजे " सौदामिनी, " शक्ती ) मी पूजा करतो ॥ ४० ॥

## यंत्र



## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान . ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा. यंत्र जपानंतर उशाखाली ( झोपताना ) ठेवावे. नैवेद्य : मध, दुधाची खीर व पानसुपारी. फलप्राप्ती : स्वप्नात भविष्य समजणे.

## विवेचन

या श्लोकात देवीच्या मणिपूर चक्राची उपासना वर्णन केली आहे. या चक्रात शंकर एका मोठ्या काळ्या ढगाच्या रूपाने व शक्ती विद्युल्लतेच्या रूपाने वास करतात. त्यांची या चक्राच्या उपासनेतील नावे " मेघेश्वर " व "सौदामिनी" अशी असून या दोन्ही देवता बावन्न जल-मयूखांनी ( किरणांनी ) वेष्टित असतात.

हे चक्र अंधारमिश्रित उजेडात आहे, म्हणजे मिश्र लोकात आहे. तेथील प्रकाश हा कुंडलिनी शक्तीपासून उत्पन्न होणारा आहे. पारंपरिक कल्पनेनुसार, या चक्रातील हा काळा ढग, अनाहत चक्रातील सूर्यकिरणांनी व स्वाधिष्ठान-चक्रातील अग्नीने, या मणिपुर चक्रातील पाण्याची वाफ होऊन बनतो व स्वाधिष्ठान चक्रातील अग्नीने सर्व ब्रह्मांड, महाप्रलयात जळत असताना, जलवृष्टी करतो,

असे मानले आहे. "हर-मिहिर-तपन" या शब्दाचा दुसरा अर्थ "वासना सूर्याने होरपळणारा" असाही काही ठिकाणी घेतला जातो. या अर्थानुसार, या चक्रातील मेघेश्वर-सौदामिनीच्या उपासनेने वासनासूर्याने तप्त झालेला उपासक शांत होतो, वासनेपासून मुक्त होतो, असेही म्हणता येईल. ॥ ४० ॥

श्लोक

**तवाधारे मूले सह समयया लास्यपरया**
**नवात्मानं मन्ये नवरसमहाताण्डवनटम् ।**
**उभाभ्यामेताभ्यामुदयविधिमुद्दिश्य दयया**
**सनाथाभ्यां जज्ञे जनकजननीमज्जगदिदम् ॥ ४१ ॥**

अर्थ

हे माते, तुझ्या मूलाधार चक्रात, लास्य नृत्यात तत्पर अशा समया ("लास्येश्वरी")सह, नवरसयुक्त तांडव करणाऱ्या देवाची ("आदिनट," शंकर याची) मी पूजा करतो. उत्पत्तिकार्याच्या या दैवी प्रकटीकरणानेच (या तांडव-लास्य नृत्याने) ते उभयता (आदिनट-लास्येश्वरी) जगाचे माता-पिता बनले. ॥ ४१ ॥

(कौलमार्गियाच्या तत्त्वाप्रमाणे जगाची उत्पत्ती या नृत्याने होते.)

यंत्र




उपासना

सोन्याच्या पत्र्यावर कोरून ताईत म्हणून वापरणे. अगर मिठाने काढून ते मीठ औषध म्हणून उपयोगात आणणे.

अनुष्ठान : ३० दिवसाचे. जपसंख्या : दररोज ४०००.

नैवेद्य : मध. फलप्राप्ती : अजीर्ण, अग्निमांद्य व पोटाच्या इतर विकारांपासून त्रास न होणे.

## विवेचन

या श्लोकात आता शेवटच्या म्हणजे मूलाधार चक्रातील उपासना वर्णिली आहे, या चक्रातील देवता आदिनट ( शंकर ) व लास्येश्वरी ( शक्ती) असून, त्या अनुक्रमे तांडव व लास्य नृत्य करीत असतात. कौलमार्गीयांच्या तत्त्वानुसार, या चक्रात या देवता नृत्य करीत असताना एकमेकाकडे दृष्टिक्षेप करतात, त्यातूनच विश्वाची उत्पत्ती होते. या देवता भूमीचे छप्पन मयूखानी वेष्टित असतात. ज्यावेळी हे नृत्य ( तांडव व लास्य ) थाबते, त्यावेळी विश्व लयास जाते.

स्वाधिष्ठान व मूलाधार ही दोन्ही चक्रे अंधारातील असून, या चक्राची बाह्य उपासना, फक्त कौलमार्गीयच करतात. कौलमार्गीयांच्या तत्त्वप्रणालीनुसार, बिंदू, शिवशक्तीचा निवास हा मूलाधारातील त्रिकोणात आहे. हा त्रिकोण दोन प्रकारचा मानतात. एक श्रीचक्रांतील नऊ योनींचे मधला ( चार वर टोके असलेल्या व पाच खाली टोके असलेल्या त्रिकोणांमध्ये ) व दुसरा स्त्रीचे गुह्यभागी. पूर्व-कौलमार्गीय, पहिल्या प्रकारचा त्रिकोण भूर्जपत्रावर, सोन्याच्या पत्र्यावर वगैरे कोरून त्याची पूजा करतात. तर उत्तर—कौलमार्गीय, स्त्रीचे गुह्य भागाचीच उपासना करतात. या दोन्ही उपासना या बाह्य उपासनाच असून, यात फक्त मूलाधारचक्राचीच उपासना आहे. मूलाधार चक्रांत कुंडलिनी ही कौलिनी म्हणून ओळखली जाते, म्हणूनच खाली टोक असलेल्या या त्रिकोणाची उपासना, ही या त्रिकोणातील बिंदुरूप कौलिनी उपासना मानली जाते. ती ( कौलिनी ) सदैव निद्रावस्थेत असते व तिची पूजाही त्याच अवस्थेत केली जाते. ती ज्यावेळी जागृत होते, त्यावेळी उपासकास मुक्ती मिळते, असे कौलमार्गीय मानतात. तिची पूजा, मद्य, मास, मत्स्यादी पाच मकारानी केली जाते. याच प्रकारे दिगंबर, क्षपणक याचाही आचार असून हे मार्ग वेदबाह्य असल्यामुळे त्याज्य आहेत.

समयाचारात फक्त सहस्रार चक्रात बिंदू कल्पून त्रिकोण हा श्रीक्रमातील पहिला त्रिकोण म्हणजे सहस्रार चक्रातील चंद्राची तबकडी मानली आहे. म्हणूनच समय मार्गातील त्रिकोण-बिंदुस्थानाची उपासना, कौलमार्गीयांच्या बाह्य उपासनेपेक्षा फारच वेगळी आहे. समयाचारानुसार, सर्व षट्चक्राची उपासना अभिप्रेत नसून फक्त सहस्रार चक्राचीच उपासना, ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. ॥ ४१ ॥


श्लोक

**गतैर्माणिक्यत्वं गगनमणिभिः सान्द्रघटितं**
**किरीटं ते हैमं हिमगिरिसुते कीर्तयति यः ।**
**स नीडेयच्छायाच्छुरणशबलं चन्द्रशकलं**
**धनुः शौनासीरं किमिति न निबध्नाति धिषणाम् ।।४२।।**

अर्थ

हे हिमनगराजकन्ये, बारा आदित्यांनी नटलेल्या तुझ्या सुवर्णमुकूटाची प्रशंसा करताना, त्याच्याच शेजारील (मुकुटावरील), विविधरंगी रत्न तेजाने रंगीबेरंगी झालेली चन्द्रकोर, पाहता, ते मदनाचे धनुष्यच आहे असा भास त्याला (तुझ्या उपासकाला) का होणार नाही? ।। ४२ ।।

यंत्र




उपासना

यत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. मत्रजपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : शुद्ध साखर. फलप्राप्ती : जलोदर बरा होतो.

विवेचन

आतापर्यंतच्या ४१ श्लोकात विविध प्रकारांनी करावयाच्या देवीच्या उपासना सांगून, त्यापासून परमानद प्राप्त होतो हे सांगितल्यावर, देवीच्या सौंदर्याची स्तुती करून, देवीचे शब्दचित्र, उपासकाच्या हृदयात कोरण्याचा प्रयत्न, कवीने यापुढील सर्व श्लोकात केला आहे. यापुढील श्लोकात, देवीच्या मुकुटापासून पायाच्या तळव्यापर्यंत, व डोक्यावरील चद्रकोरीपासून ते विविध अलंकारापर्यंतचे वर्णन केले आहे.

या श्लोकात देवीच्या मुकुटाचे वर्णन केले आहे. देवीचा मुकुट सोन्याचा असून त्यावर बारा आदित्य रत्न म्हणून बसविले आहेत. या मुकुटावर जी चंद्रकोर आहे, ती वेगवेगळ्या रत्नांतून परावर्तित होणाऱ्या निरनिराळ्या रंगांनी, मदनाच्या इंद्रधनुष्यासारखी, कवीला वाटते.


### श्लोक

धुनोतु ध्वान्तं नस्तुलितदलितेन्दीवरवनं
घनस्निग्धश्लक्ष्णं चिकुरनिकुरम्बं तव शिवे।
यदीयं सौरभ्यं सहजमुपलब्धुं सुमनसो
वसन्त्यस्मिन्मन्ये वलमथनवाटीविटपिनाम् ।। ४३ ।।

### अर्थ

हे शिवागी, तुझे प्रफुल्लित नीलकमल सागराप्रमाणे भासणारे, दाट चमकदार, मऊ केस आमच्या (मनातील) अंधकार (अज्ञान) दूर करतील काय? बालासुरमर्दक इन्द्राच्या नदनवनातील, कल्पवृक्षाच्या फुलांनी तुझ्या केशबटांचा आश्रय घेतला, तो (तुझ्या केसांच्या मूळच्याच) सुगंधासाठीच, असे मला वाटते. ।। ४३ ।।

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे व त्याची आंगठी करून घालावी.
अनुष्ठान : ४० दिवसांचे. जपसंख्या दररोज २००० वेळा.
नैवेद्य : मध. फलप्राप्ती : सर्वांना वश करण्यासाठी.

### विवेचन

या श्लोकांत देवीच्या कपाळावर येणाऱ्या केसांच्या बटांचे कवीने वर्णन केले आहे. साधकाच्या मनातील अंधार, या बटांच्या दर्शनाने दूर होईल असा

कवीला विश्वास वाटतो. सर्व स्त्रिया केशकलापात फुले माळतात. त्याचप्रमाणे, देवीनेही फुले घातली आहेत. मात्र ही फुले साधीसुधी नव्हेत, तर वालासुराचा नाश करणाऱ्या इंद्राच्या नदनवनातील कल्पवृक्षाची. इतर स्त्रिया केसात फुले घालतात ती त्याच्या शोभेसाठी, सुगंधासाठी. पण देवीच्या बाबतीत मात्र हा क्रम उलटा आहे. देवींचे केसच मूळचे, इतके सुगंधी आहेत, की त्या सुगधासाठीच या फुलांनी देवीच्या केसांचा आश्रय केला, असे कवीस वाटते. ॥ ४३ ॥


### श्लोक

**वहन्ती सिन्दूरं प्रबलकबरीभारतिमिर–**
**द्विषां वृन्दैर्बन्दीकृतमिव नवीनार्ककिरणम् ।**
**तनोतु क्षेमं नस्तव वदनसौन्दर्यलहरी–**
**परीवाहस्रोतःसरणिरिव सीमन्तसरणिः ॥ ४४ ॥**

### अर्थ

तुझ्या मुखसौन्दर्यप्रवाहाचा जणू मार्गच, दाट, काळ्या प्रतिस्पर्ध्यांनी (तुझ्या दाट काळ्या केसांनी) दोन्ही बाजूंनी बंदिस्त केलेली, उगवत्या बालरवींची आरक्त किरणशलाकाच, अशी तुझी सिंदूर (शेंदूर) चर्चित भांगरेखा आमचे कल्याण करो ॥ ४३ ॥

### यंत्र




### उपासना

सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. तसेच केशराने अगर हळदीने काढून नतर त्याचा टिळा, कपाळावर लावावा.

अनुष्ठान : १२ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : गुळाची खीर आणि मध.

फलप्राप्ती : सर्वमोहन, दुःख, हिस्टेरिया कमी होतो.

### विवेचन

या श्लोकात देवीच्या केसाचा जो भांग पाडला आहे, त्याचे सौंदर्यवर्णन कवीने केले आहे.

देवीचा भांग सरळ कपाळापर्यंत आला आहे. त्यात शेंदूर भरला आहे. ती आरक्त रेखा पाहून, काळ्या ढगांच्या गर्दीतून बालरवीचा एखादा कोवळा किरणच येत असल्याचा कवीस भास होतो. ॥ ४४ ॥


### श्लोक

**अरालैः स्वाभाव्यादलिकुलहसश्रीभिरलकैः**
**परीतं ते वक्त्रं परिहसति पङ्केरुहरुचिम् ।**
**दरस्मेरे यस्मिन्दशनरुचिकिञ्जल्करुचिरे**
**सुगन्धौ माद्यन्ति स्मरमथनचक्षुर्मधुलिहः ॥ ४५ ॥**

### अर्थ

लहान भुंग्यांच्या थव्याप्रमाणे शोभणाऱ्या कुरळ्या केशकलापांनी वेढलेले मधुहास्य करणाऱ्या दंतपक्तीनी कमलतंतूप्रमाणे शोभविलेले, दग्धकाम शंकराचे ( काळे ) नेत्र ( त्यावरील ) भुंग्याप्रमाणे भासणारे तुझे सुस्मित वदनकमल, चिखलात उगवलेल्या कमळाकडे पाहून उपहास करते. ॥ ४५ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : त्रिमधुरा व मध. फलप्राप्ती : भविष्यकथन करता येते.

### विवेचन

या श्लोकात कवीने देवीच्या चेहेऱ्याचे मार्मिक वर्णन केले आहे. देवीचा चेहरा हा त्याला एखाद्या कमळाप्रमाणे भासतो. चेहेऱ्याभोवतालच्या केशबटा, त्याला कमळाभोवती फिरणाऱ्या भुंग्याची आठवण करून देतात. देवीचे काळे डोळे त्याला त्या कमळात मधुपान करणाऱ्या भुंग्याप्रमाणे भासतात, तर दतपंक्तीनी कमलतंतूची आठवण होते. ॥ ४५ ॥


### श्लोक

**ललाटं लावण्यद्युतिविमलमाभाति तव यद्—**
**द्वितीयं तन्मन्ये मुकुटघटितं चन्द्रशकलम् ।**
**विपर्यासन्यासादुभयमपि संभूय च मिथः**
**सुधालेपस्यूतिः परिणमति राकाहिमकरः ॥ ४६ ॥**

### अर्थ

तुझ्या सौंदर्याच्या तेजात चमकणारे कपाळ पाहून, ही तुझ्या मुकुटावरील दुसरी चन्द्रकोरच, असा मला भास होतो. या कोरी एकमेकांवर ठेवल्याने त्यातून वाहणाऱ्या अमृताने त्या जुळून, पूर्ण चन्द्राचा भास होतो. ॥ ४६ ॥

### यंत्र




### उपासना

सोन्याच्या पत्र्यावर यंत्र कोरून घ्यावे. जपानतर ताईत म्हणून वापरावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : दुधाची खीर आणि मध.

फलप्राप्ती : पति स्वगृही परत येणे; वंशवृद्धी होणे.

या श्लोकात देवीच्या कपाळाचे वर्णन केले आहे. कपाळाची चन्द्रकोर व मुगुटावरील उलटी चंद्रकोर एकमेकांना मिळून, पूर्ण चंद्राकार झाल्याचा कवीस भास होतो. हा पूर्ण गोलाकार होण्यास, चन्द्राच्या कोरीतून वाहणाऱ्या अमृताने मदत केली आहे. त्या सुधालेपानेच हा गोलाकार पूर्ण झाला हे त्याने "सुधालेप" या शब्दाने सूचित केले आहे. ॥ ४६ ॥

### श्लोक

**भ्रुवौ भुग्ने किंचिद्भुवनभयभङ्गव्यसनिनि**
**त्वदीये नेत्राभ्यां मधुकररुचिभ्यां धृतगुणम् ।**
**धनुर्मन्ये सव्येतरकरगृहीतं रतिपतेः**
**प्रकोष्ठे मुष्टौ च स्थगयति निगूढान्तरमुमे ॥ ४७ ॥**

### अर्थ

जगाच्या भयनाशासाठी तत्पर असणाऱ्या ( देवी ) उमे, तुझ्या एकमेकांस गुंतलेल्या ( भिडलेल्या ) वक्र ( धनुष्याकृती ) भुवया पाहून, मदनानेच आपले धनुष्य, मधला भाग, उजव्या मनगटाने घट्ट मुठीत झाकून, तुझे भुंग्यासारखे काळे डोळे ( बाणासारखे ) चढवून सज्ज केल्यासारखे मला वाटते. ॥४७॥

### यंत्र

ह्रीं
ह्रीं
ह्रीं

### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. जपानंतर शिरोभागी धारण करावे.
अनुष्ठान : २५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज ७००० वेळा.
नैवेद्य : नारळ, फळे व मध. फलप्राप्ती : देवतांची कृपा.

### विवेचन

या श्लोकात देवीच्या भुवयांचे वर्णन केले आहे. नेत्राने भक्तास अभयदान देणारी देवी, या कामी इतकी तत्पर आहे की, भक्ताचे दुःख हरण करण्यासाठी तिने आपल्या वक्राकार भुंवयांचे धनुष्य सदैव सज्जच ठेवले आहे, असे कवीस वाटते. ॥ ४७ ॥

### श्लोक

**अहः सूते सव्यं तव नयनमर्कात्मकतया**
**त्रियामां वामं ते सृजति रजनीनायकतया ।**
**तृतीया ते दृष्टिर्दरदलितहेमाम्बुजरुचिः**
**समाधत्ते संध्यां दिवसनिशयोरन्तरचरीम् ॥ ४८ ॥**

### अर्थ

(हे देवी,) तुझा उजवा डोळा दिवसास जन्म देतो, डावा (डोळा) रात्रीस जन्म देतो, तर किंचित उमललेल्या सुवर्णकमळाप्रमाणे असणारा तिसरा (मधला) डोळा, (दिवस-रात्र यांच्या संधिकालातील) संधिप्रकाशास जन्म देतो. ॥ ४८ ॥

### यंत्र

| | | |
|---|---|---|
| बु | शु | प |
| गु | र | कु |
| रा | श | के |

### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : तऱ्हेतऱ्हेचे मसाला-भात, फळे व मध.
फलप्राप्ती : दुष्टग्रहबाधानिवारण.

## विवेचन

या श्लोकात देवीच्या तीन डोळ्यांचे वर्णन केले आहे. देवीचे हे त्रिनेत्र कालदर्शक आहेत. म्हणजेच देवी कालातीत आहे, हे कर्त्याने सूचित केले आहे. तसेच शंकरास त्रिनेत्र आहेत व देवी ही शंकरमय आहे, संयुक्त आहे म्हणूनच की काय देवीलाही तीन डोळे आहेत. यावरून शिवशक्तीचे अभिन्नत्वही लक्षात येते. ॥ ४८ ॥


## श्लोक

**विशाला कल्याणी स्फुटरुचिरयोध्या कुवलयैः**
**कृपाधाराधारा किमपि मधुरा भोगवतिका ।**
**अवन्ती दृष्टिस्ते बहुनगरविस्तारविजया**
**ध्रुवं तत्तन्नामव्यवहरणयोग्या विजयते ॥ ४९ ॥**

## अर्थ

हे माते, तुझे डोळे सर्वसंग्राहक ( विशाला ), वैभवदायक ( कल्याणी ), अति तेजस्वी म्हणूनच नीलकमलास हरविणारे ( अयोध्या ), दयेचे मूर्तिमत कारंजेच ( धारा ), अतिशय गोड ( मधुरा ), सुखाचा उपभोग घेणारे (भोगवति), भक्तजनाचे रक्षक, आधार ( अवन्ती ), अनेक नगरींना हरविणारे ( विजया ), यामुळेच त्यांना दिलेल्या नावांना सार्थच आहेत. ॥ ४९ ॥

## यंत्र



## उपासना

यंत्र हळदीने काढून, अनुष्ठानानंतर हळद जाळून, तेलात खलून निळ्या डोळ्यांच्या, पंचविशीतील ( २५ चे आतील ) माणसाने अंजन म्हणून घालावे.

अनुष्ठान : १० दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : पोंगल व मध. फलप्राप्ती : गुप्तधन दिसते.

## विवेचन

या श्लोकात देवीच्या दृष्टिकटाक्षाचे वर्णन कवीने केले आहे. हे दृष्टिक्षेप आठ प्रकारचे आहेत. त्या प्रत्येक प्रकारास एका नगरीचे नाव कवीने दिले आहे. (१) विशाला. हे नगरीचे नाव आहे. तसेच अंतर्मुख होऊन केलेल्या दृष्टिक्षेपाला हे नाव आहे. (२) कल्याणी. हा दृष्टिक्षेप आश्चर्यदर्शक आहे. (३) अयोध्या. हा दृष्टिक्षेप बाहुल्या मोठ्या केल्याने होणारा, इशारादर्शक. (४) धारा. हा दृष्टिक्षेप दयार्द्र होऊन केलेला. (५) मधुरा हा दृष्टिक्षेप प्रसन्न होऊन केलेला. (६) भोगवती. सुख भोगताना होणारा दृष्टिक्षेप. (७) अवन्ती. हा दृष्टिक्षेप अभयदान देणारा तर (८) विजया. हा दृष्टिक्षेप विजयदर्शक. असे आठ प्रकारचे दृष्टिक्षेप कोणत्याही स्त्रियास येतातच. त्यानाच एकेका नगराचे नाव देऊन, कवीने त्यांचा उपयोग सौंदर्यवर्णनाकडे केला आहे. ॥ ४९ ॥


## श्लोक

**कवीनां संदर्भस्तबकमकरन्दैकरसिकं**
**कटाक्षव्याक्षेपभ्रमरकलभौ कर्णयुगलम् ।**
**अमुञ्चन्तौ दृष्ट्वा तव नवरसास्वादतरला–**
**वसूयासंसर्गादलिकनयनं किंचिदरुणम् ॥ ५० ॥**

## अर्थ

काव्यपुष्पगुच्छातील मधाचा ( काव्य रसाचा ) आस्वाद घेण्यात आनंदित होणाऱ्या तुझ्या कर्णयुग्मास, तुझे भुंग्यासारखे भासणारे ( डावा-उजवा ) डोळे त्या नवरसाचा आस्वाद घेण्यासाठी अधीर होऊन, आपल्या तिरप्या नजरेने सोडीत नाहीत. हे पाहूनच ( तसे करण्यास असमर्थ असणारा ) कपाळावरील तिसरा डोळा मत्सराने काहीसा आरक्त झाला आहे. ॥ ५० ॥

यंत्र



## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. अगर पाण्याच्या भांड्यात किंवा लोण्याने काढून, पाणी किंवा लोणी, औषध म्हणून जपानंतर घ्यावे.

अनुष्ठान : ४ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : साखर, साखरेचे पदार्थ, गूळ, मध, फळे व नारळ.

फलप्राप्ती : देवी रोगापासून मुक्तता.

## विवेचन

देवीचा मधला डोळा हा इतर दोन्ही डोळ्यापेक्षा किंचित आरक्त आहे. या गोष्टीवर कवीने ही सौंदर्यरचना केली आहे.

स्वर्गीय भाट, चारण देवीची स्तुती गातात. आपल्या स्वरचित स्तुति-काव्याच्या मधुर रसाने ते भाट, देवीचे कान सतत भरत असतात. बाकीचे दोन डोळे हे कानांना जवळ असल्यामुळे, त्यांना या मधुर रसापर्यंत पोहोचता येते व त्यांत भाग घेता येतो. पण बिचारा मधला डोळा. त्याला मात्र ही सवलत नाही. मग तो मत्सराने आरक्त का होऊ नये ? ॥ ५० ॥

## श्लोक

**शिवे शृङ्गारार्द्रा तदितरजने कुत्सनपरा**
**सरोषा गङ्गायां गिरिशनयने विस्मयवती ।**
**हराहिभ्यो भीता सरसिरुहसौभाग्यजयिनी**
**सखीषु स्मेरा ते मयि जननि दृष्टिः सकरुणा ॥ ५१ ॥**

## अर्थ

हे माते, तुझी दृष्टी शंकराकडे (पाहताना) प्रेमळ, इतरेजनाकडे (पाहताना) तिरस्कारयुक्त, (शंकरांचे डोक्यावरच ठाण मांडून बसणाऱ्या) गंगेकडे (पाहताना सवतीमत्सराने) खुनशी, शंकराच्या चरित्राकडे (पाहताना) साश्चर्य, शंकराच्या (गळ्यातील अलंकारातील) सर्पाकडे (पाहून) घाबरी, सुंदर कमळाकडे (त्याचे सौंदर्य) ग्रस्त करणारी, तुझ्या सख्यांकडे (पाहून) हसरी, आणि माझ्याकडे (तुझ्या भक्तांकडे पाहताना) करुणार्द्र असते. ॥ ५१ ॥

## यंत्र

क्लीं

क्लीं

क्लीं

## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे, अगर गंधाने काढावे व गंधाचा टिळा कपाळावर लावावा.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : उडदाच्या वड्या व मध. फलप्राप्ती : सर्वमोहन, व सर्व इच्छापूर्ती.

## विवेचन

या श्लोकात, देवीच्या दृष्टीत नवरसानी आश्रय घेतला आहे, हे कर्त्याने सूचित केले असून, उदाहरणादाखल वेगवेगळे प्रसंग घेऊन, त्या रसांचा आविष्कार दाखविला आहे. नवरस असे : (१) शृंगार, (२) बीभत्स, (३) रौद्र, (४) अद्भुत, (५) भयानक, (६) वीर. (७) हास्य, (८) करुणा व (९) शांत. या श्लोकात शेवटचा सोडता बाकी सर्व रसांचे आविष्कार दर्शविले आहेत. ॥ ५१ ॥

## श्लोक


**गते कर्णाभ्यर्णं गरुत इव पक्ष्माणि दधती**
**पुरां भेत्तुश्चित्तप्रशमरसविद्रावणफले ।**

**इमे नेत्रे गोत्राधरपतिकुलोत्तंसकलिके**
**तवाकर्णाकृष्टस्मरशरविलासं कलयतः ।। ५२ ।।**

### अर्थ

हे नगराजवंशकलिके, कानापर्यंत पोचणाऱ्या, पिसासारख्या भुवयानी कडेने वेष्टिलेले, त्रिपुरांचा नाश करणाऱ्या शंकराची खोल गंभीर शांती खळबळून सोडणारे तुझे हे डोळे, मदनाने आकर्ण ओढलेल्या बाणाचे कार्य करतात. ॥५२॥

### यंत्र




### उपासना

यत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे, अगर भस्माने काढावे.
अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य दुधाची खीर. फलप्राप्ती : कर्णदोष, नेत्रदोष निवारण.

### विवेचन

या श्लोकात देवीच्या डोळ्यांचे सौंदर्य वर्णन केले आहे. उपमेसाठी मदनाच्या धनुष्यबाणाचा उपयोग केला आहे. मदन आपल्या पुष्पधनूवर, पुष्पचाप जोडून त्यांनी तपस्वी लोकांचीही हृदये गंभीर करतो. त्याच्या मनात कामजागृती करतो. शंकर हा तर विरक्ताचा अग्रणी. त्यांच्यावर मदनशरांचा काहीही उपयोग होत नाही. उलट, आपल्या बाणांनी सगळ्याना विद्ध करणाऱ्या व जग जिंकणाऱ्या मदनालाच शंकरानी, आपल्या तिसऱ्या डोळ्याने भस्म केले.

पण देवीच्या डोळ्यांचे सौंदर्यच इतके अपूर्व, की त्या डोळ्यांच्या नजरेनेच शंकर विद्ध झाले, चलित झाले. जे मदनाला जमले नाही, ते अशक्य देवीच्या डोळ्यानी शक्य केले, हाच भावार्थ या श्लोकात सांगितला आहे. ॥ ५२ ॥


### श्लोक

विभक्तत्रैवर्ण्यं व्यतिकरितलीलाञ्जनतया
विभाति त्वन्नेत्रत्रितयमिदमीशानदयिते ।
पुनः स्रष्टुं देवान्द्रुहिणहरिरुद्रानुपरता-
रजः सत्त्वं बिभ्रत्तम इति गुणानां त्रयमिव ।। ५३ ।।

### अर्थ

हे ईशानप्रिये, जणू काही महाप्रलयात नाश पावलेल्या त्रिदेवांची (ब्रह्मा-विष्णू-रुद्र) पुनर्निर्मिती करण्यासाठीच, तुझे हे प्रसादनयुक्त त्रिनेत्र, (त्रिगुणात्मक) राजस, सत्त्व व तामस दर्शक तीन वेगवेगळे (तांबडा, पांढरा, काळा) रंग दर्शवितात. ॥ ५३ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे, अगर पिठाने काढावे. यंत्राशेजारी दिवा लावून ठेवावा.

जपसंख्या : दररोज २००० वेळा. नैवेद्य : गोड वड्या, उडदाचे वडे, दुधाची खीर. फलप्राप्ती : दीप जास्त प्रखर झाल्यास शुभशकुन, मंद झाल्यास अपशकुन समजावा.

### विवेचन

याही श्लोकात देवीच्या डोळ्याचीच स्तुती केली आहे. महाप्रलयात अमर समजले जाणारे देवही, सर्व विश्वाबरोबर नाश पावतात. त्यांत सृष्टी निर्माण करणारा ब्रह्मदेव, पालनकर्ता विष्णू व संहारकर्ता रुद्र, हे त्रिदेवही नाश पावतात. उरतात ते फक्त शिवशक्ती. या महासंहारानंतर, नवी सृष्टी निर्माण करण्याचे

कार्य शंकर, शक्तीच्या मदतीने सुरू करतात. प्रथम निर्मिती होते, ती त्रिदेवांची. हे त्रिदेव देवीच्या तीन डोळ्यातून निर्माण होतात, ही कविकल्पना. देवी आपल्या त्रिगुणातून, ( म्हणजेच राजस, सत्त्व व तामस, ) त्रिदेव ब्रह्मा, विष्णू, रुद्र निर्माण करते. या त्रिगुणाचे पारंपरिक कल्पनेप्रमाणे आरक्त, शुभ्र व काळा असे तीन रंग मानले जातात. देवीचे तीन डोळे या रंगाचे असल्यामुळे, कवी ही कल्पना करतो. ब्रह्मा, विष्णू व रुद्र हे अनुक्रमे राजस, सत्त्व व तामस गुणाचे निदर्शक म्हणून ओळखले जातात. ॥ ५३ ॥


## श्लोक

**पवित्रीकर्तुं नः पशुपतिपराधीनहृदये**
**दयामित्रैर्नेत्रैररुणधवलश्यामरुचिभिः ।**
**नदः शोणो गङ्गा तपनतनयेति ध्रुवममुं**
**त्रयाणां तीर्थानामुपनयसि संभेदमनघम् ॥ ५४ ॥**

## अर्थ

हे पशुपतिसमर्पित हृदये, आरक्त, शुभ्र व काळ्या ( त्रिनेत्राच्या ) दयार्द्र, पापनाशिनी अशा ( त्रिनेत्र ) संगमाने ( जणू काय ) गंगा, यमुना ( सूर्यकन्या ) सरस्वति यांचा जगाच्या पापनाशार्थ खरोखर त्रिवेणीसंगमच घडवून आणतेस. ॥ ५४ ॥

## यंत्र




## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर, पाण्याच्या भांड्यांत अगर औषधी मुळीवर काढावे. अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा. नैवेद्य : गुळाची खीर. फलप्राप्ती : गुप्तरोगनिवारण.

### विवेचन

या श्लोकात, देवीचे तीन रंगांचे डोळे एका जागी पाहून, कवीला त्रिवेणी संगमाची आठवण होते. प्रयागशेजारी गंगा, यमुना, सरस्वती नद्यांचा संगम होतो, व ते ठिकाण क्षेत्र बनते. देवीदर्शन हे पापविमुक्ती करणारे असल्याने, देवी म्हणजे पापविनाशी क्षेत्र असून, देवीचे त्रिनेत्र म्हणजे जणू तीन नद्या, असे कवीस वाटते. त्रिवेणी संगमावर तीन नद्यांचे प्रवाह हे रंगवैचित्र्यामुळे, वेगळे दिसतात. देवीचे तीन डोळेही वेगवेगळे रंग दर्शवीत असल्यामुळे, कवीने दिलेली ही त्रिवेणी संगमाची उपमा सार्थच वाटते. ॥ ५४ ॥


### श्लोक

**निमेषोन्मेषाभ्यां प्रलयमुदयं याति जगती**
**तवेत्याहुः सन्तो धरणिधरराजन्यतनये ।**
**त्वदुन्मेषाज्जातं जगदिदमशेषं प्रलयतः**
**परित्रातुं शङ्के परिहृतनिमेषास्तव दृशः ॥ ५५ ॥**

### अर्थ

हे नगराजकन्ये, जगाची उत्पत्ती आणि नाश, तुझ्या डोळ्याच्या उघडण्या-मिटण्याने होतो असे संत म्हणतात. तुझ्या डोळे उघडण्यामुळेच उत्पन्न झालेले हे जग ( नाशापासून ) वाचविण्यासाठीच जणू काय तुझे नेत्र सदैव उघडे आणि अचल असतात असे मला वाटते. ॥ ५५ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज २५०० वेळा.

नैवेद्य : फळे, दुधाची खीर, मध व पानसुपारी.

फलप्राप्ती अंडवृद्धी नाहीशी करण्यासाठी.

## विवेचन

देवदेवतांचे डोळे हे मर्त्य मानवाप्रमाणे उघडझाप न करता, सदैव उघडेच असतात. तसेच देवीचे सदैव उघडे असणारे डोळे पाहून, कवीला ही कल्पना स्फुरली. मागे एका श्लोकात देवीचे त्रिनेत्र हे दिवस, रात्र व संध्याप्रकाशास जन्म देणारे आहेत हे विदित केले आहे. म्हणजेच देवीचे डोळे हे कालदर्शक, कालच आहेत. अर्थातच कालचक्र बंद पडणे म्हणजे जगाचा विनाशच होय. याच कारणासाठी, जगाचा विनाश होऊ नये म्हणूनच देवीचे डोळे सदैव उघडे असतात, असे कवीस वाटते. ॥ ५५ ॥


## श्लोक

**तवापर्णे कर्णेजपनयनपैशुन्यचकिता**
**निलीयन्ते तोये नियतमनिमेषाः शफरिकाः ।**
**इयं च श्रीर्बद्धच्छदपुटकवाटं कुवलयं**
**जहाति प्रत्यूषे निशि च विघटय्य प्रविशति ॥ ५६ ॥**

## अर्थ

हे अपर्णे, तुझे अचल ( सदैव जागृत मत्स्याकार ) डोळे तुझ्या कानांत आपल्याविषयी चहाडी करतील या भयाने, चमकणारे साफारिक मत्स्य सदैव डोळे उघडे ठेवून पाण्यात दडून राहतात. तर नीलकमलाची सौंदर्यदेवता ( तुझ्या दिवसा उघड्या असणाऱ्या नेत्रकमलातील सौंदर्यापुढे आपला निभाव लागणार नाही या भयाने ) दिवस उजाडताच, मिटणाऱ्या पाकळ्यातून निघून जाते, आणि फक्त रात्रीच ( झोपेने तुझे नेत्रकमल मिटल्यावर ) त्यांच्या पाकळ्या उघडून त्यात पुन. प्रवेश करते. ॥ ५६ ॥

## यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून ध्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे, जपसंख्या : दररोज २०,००० वेळा.

नैवेद्य : मध. फलप्राप्ती : शृंखला, कुलपे गळून पडतील. पहारेकरी पळून जातील. मुक्तता होईल.

### विवेचन

देवीचे डोळे सदैव उघडेच असतात. देवी मीनलोचना आहे, या वस्तुस्थितीवर आधारून, कवीने अति रम्य अशा काव्यभाषेत त्यावर गोड कल्पना रचली आहे.

पाण्यात माशांचे डोळे सदैव उघडेच असतात. माशाना डोळे मिटता येत नाहीत. याचे कारण म्हणून कवी सागतो, की या माशांशी स्पर्धा करणारे मीनलोचन देवीच्या कानांत आपणाविषयी चहाडी करतील. या भीतीनेच पाण्यातले हे मत्स्य डोळे न मिटता सदैव जागृत असतात.

श्लोकाच्या उत्तरार्धात देवीच्या मुखकमल-सौंदर्याविषयी कवीने अशीच सुंदर कल्पना रचली आहे. कमळाची फुले सौंदर्याविषयी प्रसिद्ध आहेत. त्याची तुलना स्त्रीच्या मुखकमलाशीच करण्याचा कवीचा प्रघात आहे. ही सुंदर निळी कमळे दिवसा मिटून राहतात व रात्री चंद्रदर्शनाने उमलतात. याचे कारण काय ? कवी आपल्या कल्पनेने जे कारण सांगतो ते असे : देवीचे मुखसौंदर्य इतके बिनतोड आहे, की या सौंदर्यापुढे आपला निभाव लागणार नाही, हे निळ्या कमळांची सौंदर्यदेवता समजून आहे. म्हणूनच ती देवीशी या सामन्यास उभीच राहात नाही. रात्री देवीचे नेत्रकमल निद्रेने मिटले की ही सौंदर्यदेवता या निळ्या कमळांच्या पाकळ्या उलगडून त्यात राहते. पहाटे सूर्यनारायणाची चाहूल लागून देवीची नेत्रकमळे उघडतात, ही सौंदर्यदेवता, निळ्या कमळाच्या पाकळ्या मिटवून त्वरेने पळ काढते. किती रम्य आहे ही कल्पना ! ॥ ५६ ॥

### श्लोक

**दृशा द्राघीयस्या दरदलितनीलोत्पलरुचा**
**दवीयांसं दीनं स्नपय कृपया मामपि शिवे ।**

**अनेनायं धन्यो भवति न च ते हानिरियता**
**वने वा हर्म्ये वा समकरनिपातो हिमकरः ॥ ५७ ॥**

### अर्थ

हे शिवप्रिये, फार दूरवर (सहज) पोचणाऱ्या, नवोन्मीलित कमलपुष्पाप्रमाणे सुदर भासणाऱ्या तुझ्या नेत्रकटाक्षाने, तुझ्यापासून फार लांब जागी उभ्या असणाऱ्या या पामरास स्नान घालशील काय ? ( कारण ) तुझ्या ह्या नेत्रकटाक्षानेच हा मर्त्यजीव अमर होणार आहे. यात तुझे नुकसान काहीच नाही. हिमधवल चन्द्रप्रकाश जसा राजप्रासादास उजळा देतो तसाच जंगलासही देतो. ॥ ५७ ॥

### यंत्र

| |
|---|
| श्रीं<br>श्रीं |

### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य . दुधाची खीर व मध. फलप्राप्ती : सर्व अभिवृद्धी.

### विवेचन

या श्लोकात कवीने देवीस, आपणावर कृपाकटाक्ष टाकण्याविषयी विनविले आहे. देवीचा हा भक्त देवीपासून फार लांब उभा आहे. साहजिकच आहे. देवीच्या भोवतालची गर्दी म्हणजे देवदेवताची. त्यानंतर तिच्या परमश्रेष्ठ भक्ताची. एवढ्या मातबराच्या गर्दीत, एखादा अनायास स्थान मिळालेच तर ते सर्वात दूर जागी असणार हे उघडच आहे. म्हणूनच हा कवी देवीस सागतो, माते, मी तुझ्यापासून फार दूर आहे. तरीसुद्धा तुला माझ्याकडे एकवार नजर टाकण्यास काय हरकत आहे ? त्यात तुझे नुकसान तर काही नाही ना ? चन्द्र नाही का आपले शीतल किरण जसे राजप्रासादावर टाकतो तसेच जंगलावरही टाकत ? तसाच तू माझ्यावरही एक कटाक्ष टाक ! ”

यात कवीने आपणाकडे कमीपणाची भूमिका घेऊन देवींची विनवणी केली आहे, व त्यास चंद्रकिरणाचा दाखला दिला आहे. ॥ ५७ ॥


## श्लोक

**अरालं ते पालीयुगुलमगराजन्यतनये**
**न केषामाधत्ते कुसुमशरकोदण्डकुतुकम् ।**
**तिरश्चीनो यत्र श्रवणपथमुल्लङ्घ्य विलस–**
**न्नापाङ्गव्यासङ्गो दिशति शरसंधानधिषणाम् ॥ ५८ ॥**

## अर्थ

हे नगराजकन्ये, तुझे हे कानशिलाचे उचवटे ( पाहून ) हे ( कामदेवाचे ) पुष्पधनुच आहे, हे कोणाला बरे सुचविणार नाहीत ? ( कारण ) कानशिलावरून तिरपे कानाकडून जाणारे तुझे नेत्रकटाक्ष हे ( धनुष्याच्या दोरीवर ) चढविलेले बाणच वाटतात. ॥ ५८ ॥

## यंत्र




## अनुष्ठान

( १ ) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, कर्णभूषण म्हणून कानात वापरावे.
अनुष्ठान : ५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध, फलप्राप्ती : पुरुष मोहित होतात.

( २ ) यंत्र कुंकवाने काढावे व जपानंतर कपाळावर त्याचा टिळा लावावा.
अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध. फलप्राप्ती : राजकृपा.

## विवेचन

देवीच्या कानशिलाचे उंचवटे पाहून कवीला मदनधनूचा भास होतो. म्हणूनच श्लोकाच्या प्रथमार्धात तो विचारतो, " हे देवी, तुझे कानशिलावरील उंचवटे, हे मदनाचे पुष्पधनुच आहे का ? " त्यानंतर त्या प्रश्नाचे होकारार्थी उत्तरही, श्लोकाच्या उत्तरार्धात देऊन टाकतो होय, हे कामदेवाचे धनुष्यच आहे. त्यावर चढविलेले हे कामशर, नेत्रशर पाहा, म्हणजे उत्तर मिळेल.

यात देवीच्या तिरप्या नेत्रकटाक्षास बाणाची उपमा देऊन, ते शर, कानशिलावरून तिरपे जातात, म्हणून हे कानशिलाचे उंचवटे म्हणजे मदनाचे धनुष्यच आहे, अशी गोड कल्पना कवीने या श्लोकात सांगितली आहे. ॥ ५८ ॥

## श्लोक

**स्फुरद्गण्डाभोगप्रतिफलितताटङ्कयुगलं**
**चतुश्चक्रं मन्ये तवमुखमिदं मन्मथरथम् ।**
**यमारुह्य द्रुह्यत्यवनिरथमर्केन्दुचरणं**
**महावीरो मारः प्रमथपतये सज्जितवते ॥ ५९ ॥**

## अर्थ

चन्द्रसूर्यांची चाके असलेल्या पृथ्वीरथावर आरूढ होऊन आपल्या प्रमथगणांसह युद्धास सज्ज असणाऱ्या भगवान शंकराशी, सामना देण्यासाठी, वीर मदनाने, तुझ्या चक्राकार कुंडलांनी व तुझ्या तेजस्वी गालावरील त्यांच्या प्रतिबिंबानी ( चार चाकांचे ) रथाप्रमाणे भासणाऱ्या, तुझ्या वदनरथाचा आश्रय घेतला आहे, असे तुझे मुख पाहून वाटते. ॥ ५९ ॥

## यंत्र

| |
|---|
| ऐं<br>क्लीं<br>सौः |

## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. अगर हळदीने काढून, प्रसादन म्हणून, त्या हळदीचा उपयोग करावा.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : साखर, पोंगल व मध. फलप्राप्ती : सर्वमोहन.

## विवेचन

कवीच्या प्रतिभाशक्तीचे तेज दिग्दर्शित करणाराच हा श्लोक आहे. यात देवीच्या मुखास रथाची उपमा दिली आहे. तिच्या दोन कानांतील वर्तुळाकार ताटंके ( कर्णभूषण, रिंगसारखे ) व त्याच्या तिच्या गालावर उमटणाऱ्या प्रतिबिंबांनी या रथाची चार चाके होतात.

भगवान शंकर युद्धात नेहेमी ज्या रथावर आरूढ होऊन युद्ध करतात, तो रथ असतो पृथ्वीचा. आणि चंद्र व सूर्य बनतात त्या रथाची चाके. अशा रथावर आरूढ होऊन आपल्या प्रमथगणासह युद्धास सज्ज असणाऱ्या शंकराशी सामना द्यायचा तर प्रतिस्पर्ध्याची तयारीही त्याच तोलाची हवी. यासाठीच शंकराशी सामना देण्यासाठी सजलेल्या वीर मदनाने देवीच्या या वदनरथाचा आश्रय घेतला आहे व देवीच्या मुखसौंदर्याचा आपल्या बाजूने असा फायदा घेऊन, शंकरास पराभूत केले. ( विचलित केले हा भावार्थ. ) असे कवीस वाटते. ॥५९॥


## श्लोक

**सरस्वत्याः सूक्तीरमृतलहरीकौशलहरीः**
**पिबन्त्याः शर्वाणि श्रवणचुलुकाभ्यामविरतम् ।**
**चमत्कारश्लाघाचलितशिरसः कुण्डलगणो**
**झणत्कारैस्तारैः प्रतिवचनमाचष्ट इव ते ॥ ६० ॥**

## अर्थ

हे देवी, अमृतालाही गोडीत पार मागे टाकणाऱ्या अशा सरस्वतीविरचित तुझ्या स्तुतिपर काव्यामृताचा तुझ्या विशाल कर्णरन्ध्रांनी सतत आस्वाद घेताना, ( तन्मय होऊन अभावितपणे पसंतिदर्शक ) डोक्याची हालचाल घडून, तुझी तऱ्हेतऱ्हेची कर्णभूषणेही ( आपली पसंती व्यक्त करताना ) एका सुरात पसंतिदर्शक निनाद करतात.

### यंत्र




### उपासना

यत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य . मध व दुधाची खीर. फलप्राप्ती : ज्ञानप्राप्ती.

### विवेचन

देवी सरस्वती ही त्रिपुरसुदरीची आश्रिता. आपल्या मालकिणीची कृपा-दृष्टी राहावी यासाठी, आपले कवित्व पणास लावून, देवीच्या स्तुतिपर, अलौकिक अशी काव्यरचना तिने तयार केली. ती काव्यरचना ऐकताना व तिचा मधुर आशय ग्रहण करण्यात देवी तल्लीन झाली. नकळतच तिने पसंतिनिदर्शक हालचाल केली ती रचना केवळ तिलाच पसंत पडली असे नाही, तर तिच्या कर्णभूषणा-नाही, ते अचेतन असूनही इतकी पसंत पडली की, संधी मिळताच आपला अभि-प्राय त्यानी तत्काळ एकसुरात निनाद करून प्रगट केला.

एखादे संगीत ऐकताना आपण नकळत त्याच्याशी समरस होऊन ताल धरतो. त्यावेळी आपल्या डोक्याच्या हालचालीने, आभूषणांचीही हालचाल होते. या साध्यासुध्या गोष्टीवर कवीने आपल्या प्रतिभेने केवढी सुंदर कल्पना रचली आहे ? ।। ६० ।।

### श्लोक


**असौ नासावंशस्तुहिनगिरिवंशध्वजपटि**
**त्वदीयो नेदीयः फलतु फलमास्माकमुचितम् ।**

वहत्यन्तर्मुक्ताः शिशिरकरनिश्वासगलितं
समृद्ध्या यस्तासां बहिरपि च मुक्तामणिधरः ॥ ६१ ॥

## अर्थ

हे हिमनगराजवंशध्वजे, तुझे बांबूसारखे सरळ नाक आम्हास त्याची आतील बहुमोल फळे देवो. बाहेर ओघळलेल्या एका ( तुझ्या नाकपुडीवर विराजमान झालेल्या ) मोत्यावरून, आतील पोकळीत मोत्याचा बराच मोठा साठा तुझ्या शीतल श्वासाने जतन करून ठेवलासे वाटते ॥ ६१ ॥

## यंत्र




## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. किंवा गळ्याच्या नेकलेसवर कोरून घ्यावे व जपानंतर गळ्यात घालावे.

अनुष्ठान : ८ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १२००० वेळा.

नैवेद्य : नारळ, फळे व मध. फलप्राप्ती : पुरुष-मोहन व इच्छापूर्ती.

## विवेचन

या श्लोकात देवीच्या नाकाचे सौंदर्य वर्णन केले आहे. देवीचे नाक बांबूप्रमाणे सरळ आहे व देवीने त्यावर एक मोती धारण केला आहे. मोती ज्या वस्तूत मिळतात, त्या वस्तूत बांबूचाही समावेश होतो. या पारंपरिक कल्पनेवर आधारूनच कवीने या श्लोकाची रचना केली आहे. देवीच्या बांबूप्रमाणे सरळ असणाऱ्या नाकात अनेक मोती आहेत. त्यातलाच एक जागा न मिळाल्याने बाहेर ओघळून आला आहे व तो नाकाबाहेर, ( नाकपुडीवर ) विराजमान झाला आहे. त्याकडे पाहून कवी देवीला या पोकळ बांबूत असलेल्या शीतल वाऱ्याने जतन करून ठेवलेल्या मोत्यातील मोती आम्हास मिळोत, अशी प्रार्थना करतो.

नाकपुड्यातील एक नाकपुडी सूर्यतत्त्व व दुसरी चंद्रतत्त्व दर्शविते. चन्द्रकिरण शीतल असतात, म्हणूनच या नाकपुडीतून वाहणाऱ्या श्वासोच्छ्वासाचा प्रवाह शीतलच असणार, म्हणूनच श्लोकात "शिशिरतरनिश्वास" हा शब्द कवीने योजला आहे. तसेच वंश हा शब्दसुद्धा द्व्यर्थी वापरला आहे. वंश म्हणजे राजवंश व बांबू.

पारंपरिक कल्पनेनुसार मोती (१) शिंपल्यात, (२) हत्तीच्या गंडस्थळात, (३) नागाच्या डोक्यावर, (४) बांबूच्या पोकळ भागात, (५) ढगात, व (६) उसात सापडतात. नाकपुडीवर भूषण म्हणून घातलेल्या एका मोत्यावरून, कवीने आपल्या प्रतिभाविलासाने हा श्लोक रचला. ॥ ६१ ॥


### श्लोक

**प्रकृत्यारक्तायास्तव सुदति दन्तच्छदरुचेः**
**प्रवक्ष्ये सादृश्यं जनयतु फलं विद्रुमलता ।**
**न बिम्बं त्वद्बिम्बप्रतिफलनरागादरुणितं**
**तुलामध्यारोढुं कथमिव न लज्जेत कलया ॥ ६२ ॥**

### अर्थ

हे सुदन्ते, आता मी तुझ्या नैसर्गिक लाल तेजस्वी ओठाशी तुलना करणारी वस्तु सुचवितो. ( कोणती बरे ? ) प्रवाळ. ( पण छे. ) प्रवाळाला फळ धरू दे. ( नुसत्या प्रवाळाच्या मूळ, खोड, पानात ) इतका तेजस्वी आरक्तपणा नाही. कदाचित प्रवाळाला फळ धरलेच तरच ते कदाचित तुलनेला योग्य वाटेल. मग आता कोणते बरे ? तोंडले ? छे ते नव्हे. ( कारण ) तुझ्या आरक्त कांतीनेच ते आरक्तबिंबित झाले आहे. ( मग ) तुझ्याशी दुरूनही तुलना करण्याच्या या कल्पनेनेच ते शमणार नाही का ? ॥ ६२ ॥

### यंत्र



## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, जपानंतर उशीखाली ठेवावे.
अनुष्ठान : ८ दिवसांचे. जपसंख्या : दररोज ८००० वेळा.
नैवेद्य : उडदाचे वडे व मध. फलप्राप्ती : गाढ झोप.

## विवेचन

मागील श्लोकात देवीच्या नाकाचे सौंदर्य वर्णन केल्यावर, आता कवी तिच्या ओठाकडे वळतो. तिच्या ओठाचा आरक्तपणा पाहून तिच्या ओठाशी तुलना करणारा कोणता पदार्थ आहे या विचारात पडतो. प्रथम तुलनेसाठी तो पोवळ्याकडे वळतो. पण पोवळ्याच्या झाडाचा, मुळाचा, खोडाचा रंग त्याला ओठासारखा हुबेहूब वाटत नाही. मग तो पोवळ्याचे फळ कदाचित रंगात समतुल्य भरेल या विचाराने पोवळ्याचे फळ शोधू लागतो. पण लगेच त्याला आठवते, पोवळ्याला फळ नसते. मग पोवळ्याला प्रथम फळ धरू दे. त्यानंतरच त्याची तुलना करता येईल या विचाराने ही तुलना तेथेच थांबवून, कवी दुसऱ्या वस्तूकडे तुलनेसाठी वळतो. तोंडले ? त्याची कल्पनाशक्ती तोंडल्याच्या लाल पक्व फळाकडे वळते. तो रंग ताडून पाहतो. दुसरे हिरवे तोंडले पाहताच त्याच्या लक्षात येते. अरे ! हा लाल रंग तर सूर्यकिरणांमुळेच (सूर्यकिरणांनी पिकल्यामुळे) आला. म्हणजे खुद्द देवीमुळेच आला. कारण सूर्य हा देवीचा डोळा मानतात. मग देवीमुळेच या तोंडल्याला लाभलेल्या लाल रंगाची तुलना तिच्याच ओठाशी करावयाची आपण ठरविले तरी या दूरान्वयानेही हे तोंडल्याचे फळ खजिल नाही का होणार ? या विचाराने कुंठित होऊन कवी ओठाची तुलना तेथेच थांबवितो.

ही कल्पना या श्लोकात उत्तम रीतीने कवीने मांडली आहे. ॥ ६२ ॥


## श्लोक

**स्मितज्योत्स्नाजालं तव वदनचंद्रस्य पिबतां**
**चकोराणामासीदतिरसतया चञ्चुजडिमा ।**
**अतस्ते शीतांशोरमृतलहरीमम्लरुचयः**
**पिबन्ति स्वच्छन्दं निशि निशिभृशं काञ्जिकधिया ॥६३॥**

## अर्थ

तुझ्या वदनचन्द्रावरील मधुर हास्यरूपी चादणे पिऊन, चकोराच्या चोची त्या गोडीने ( चिटण्याइतक्या ) तृप्त झाल्या. सबब, रुचिपालट करण्यासाठी काही-तरी आबट म्हणून, प्रत्येक रात्री, चन्द्राच्या चादण्यातील अमृत, ताक समजून ते निःसंकोचपणे पीत असतात. ।। ६३ ।।

## यंत्र




## उपासना

श्लोक सोन्याच्या पत्र्यावर यत्रात कोरून, जधानंतर यत्र कमरेस बाधावे.
अनुष्ठान : ३० दिवसाचे. जपसंख्या : दररोज ३०,००० वेळा.
नैवेद्य : नारळ. फलप्राप्ती : आज्ञापालन.

## विवेचन

चकोर पक्षी चादण्यातले अमृत पिऊन राहतात, या पारंपरिक कल्पनेचा कवीने या श्लोकात, देवींच्या मुखचन्द्राचे सौंदर्य विशद करण्यासाठी उपयोग केला आहे.

देवींच्या वदनचन्द्राच्या हास्यरूपी चादण्यातील मधुरतम रसाने, चकोराच्या चोची त्या गोडीने विटून जातात. बदल म्हणून, रुचिपालट म्हणून त्याना काहीतरी वेगळे खावेसे वाटते. याचसाठी हे चकोर चन्द्राचे चादण्यातील अमृत पीत असतात.

यात चद्राचे किरणातील अमृत रुचिपालट म्हणून चकोर पितात, या वाक्यातच देवीच्या वदनचन्द्राचा महिमा वाढविला आहे. तिच्या वदनचन्द्राच्या चांदण्यापुढे नेहमीच्या चन्द्राचे चांदणे म्हणजे साक्षात अमृतापुढे ताकच, असे कवी मानतो.

पारंपरिक कल्पनेचा खुबिरदारपणे उपयोग करून, कवीने आपल्या प्रतिभेचा विलासच या श्लोकात दर्शविला आहे ।। ६३ ।।

### श्लोक

अविश्रान्तं पत्युर्गुणगणकथाम्रेडनजपा
जपापुष्पच्छाया तव जननि जिव्हा जयति सा ।
यदग्रासीनायाः स्फटिकदृषदच्छच्छविमयी
सरस्वत्या मूर्तिः परिणमति माणिक्यवपुषा ॥ ६४ ॥

### अर्थ

हे माते, तुझ्या पतीच्या चरित्राचे अखड गुणगान करणारी, सरस्वती मूळची स्फटिकधवल पण जिच्या शेंड्यावर बसल्यामुळे माणिक ( सदृश ) दिसते त्या तुझ्या जास्वंदीच्या फुलाप्रमाणे लालचुटुक जिभेचा जय असो. ॥ ६४ ॥

### यंत्र

| |
|---|
| ह्रीं |

### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, त्याची चमकी बनवून नाकात घालावी. अगर यंत्र कुंकवाने काढावे.

अनुष्ठान : १८ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १०००० वेळा.

नैवेद्य : गुळाची खीर व मध.

फलप्राप्ती : लोकांना मोहित करते. गुप्तरोगनिवारक.

### विवेचन

साध्यासुध्या गोष्टींवर, पारंपरिक कल्पनेवर कवींची प्रतिभा स्वैर विहार करीत असते. अशा प्रतिभाविलासाच्या खुणा या सौंदर्यलहरीत सर्वत्र आढळतात.

एखादा माणूस वाक्चतुर असेल, विद्वान असेल प्रतिभाशाली असेल तर त्याचा गौरव करताना, वाङ्मयात आपण त्याचा उल्लेख " त्याच्या जिव्हाग्री साक्षात् सरस्वतीचं वस्ती आहे " असा करतो. याच म्हणीची योजना मोठ्या चतुराईने, या

श्लोकात देवीच्या जिभेची स्तुती करताना केला आहे. मागल्या श्लोकात देवीच्या ओठांची, चेहेऱ्याची सौंदर्यस्तुती केल्यावर, कवी आता जिभेकडे वळला आहे.

जिभेचा रंग जितका लाल तितका चांगला. ही तर नैसर्गिक आरोग्याची खूण. मग देवीच्या जिभेचा रंग लाल असणारच. पण किती लाल? तर त्या जिभेवर बसणारी सरस्वती त्या जिभेच्या रंगाने माणकासारखी दिसते. एकच म्हण वापरून, कवीने त्यात दोन हेतू साधले. ( १ ) जिभेचे सौंदर्यवर्णन. व ( २ ) देवीची थोरवी.

एका बाजूने स्फटिकासमान सरस्वतीचा रंग माणकासारखा झाला असे सागून जिच्या अग्रावर स्फटिक ठेवला तर तो माणकासारखा दिसतो असे सागून, मूळ जीभ किती लाललाल असेल याची कल्पना तो वाचकास करावयास सांगतो तर दुसऱ्या बाजूने, देवीच्या जिभेवरील टोकावर बसलेल्या सरस्वतीचा उल्लेख करून देवी, ही सर्वश्रेष्ठ विद्वान, ज्ञानी कशी हेही पटवून देतो. ।। ६४ ।।


श्लोक

**रणे जित्वा दैत्यानपहृतशिरस्त्रैः कवचिभि-**
**र्निवृत्तैश्चण्डांशत्रिपुरहरनिर्माल्यविमुखैः ।**
**विशाखेन्द्रोपेन्द्रैः शशिविषदकर्पूरशकला**
**वियलीन्ते मातस्तव वदनताम्बूलकवलाः ।। ६५ ।।**

अर्थ

हे माते, स्कंद ( देवांचा सेनापती ). इन्द्र व विष्णू समरांगणांत दैत्यांचा पराभव करून ( तुझ्या दर्शनासाठी ) परतल्यावर, चिलखत अंगावर ठेवून पण शिरस्त्राणे ( आदरार्थी ) दूर करून, कंधाचा जो हिस्सा " शिवनिर्माल्य " तो त्याला बद्ध ठेवून, तुझ्या मुखातून थुंकलेल्या, चन्द्रसदृश शुद्ध कर्पूरयुक्त ( उच्छिष्ट ) ताम्बूलाची, ( रणविजयाचा बक्षिस ) प्रसाद म्हणून आतुरतेने विभागणी करू लागले. ।। ६५ ।।

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. श्रीचक्राची पूजा तांबड्या फुलांनी धूपाने करावी.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य . मध. फलप्राप्ती : लोकांना वश करणे.

### विवेचन

साधुसंताचे उच्छिष्ट प्रसाद म्हणून पूज्य भावनेने, शिष्य ग्रहण करतात, हे संतवाङ्मयात आपण वाचतोच. अधिकारी व्यक्तीचे उच्छिष्ट ग्रहण करणे हे त्याच्या गौरवाचे लक्षणच समजतात. त्याच कल्पनेवर, हा श्लोक कवीने आधारला आहे.

दानवाशी झालेल्या युद्धात, दानवाचा पराभव करून, विजयी होऊन सुरसेनापती स्कंद, विष्णू, सम्राट इंद्र परतून देवीच्या दर्शनासाठी येतात. देवीच्या दर्शनासाठी यावयाचे म्हणजे योग्य त्या आदबीनेच यावयास पाहिजे. यासाठीच आपली शिरोभूषणे काढून ते देवीसमोर येतात. अशा विजयी वीराचा बहुमान देवी करणार हे स्वाभाविकच आहे. म्हणूनच देवी आपला उष्टा विडा त्याना देते. या बहुमानाने आनंदित होऊन लोच त्याची वाटणी करू लागतात. हीच कल्पना या श्लोकात मांडली असून, इन्द्रादी देव, देवीच्या उच्छिष्टाचे अधिकारी हे दाखवून, देवीच्या मोठेपणाची कल्पना, वाचकासमोर उभी केली आहे.

चंध हा शंकराचा एक गण. त्याने युद्धात शंकराना बहुमोल मदत केल्यामुळे शंकरानी त्याला वर देऊन, आपला निर्माल्य कायमचा वहाल केला आहे. शिवशक्ती एकच असल्यामुळे शक्तीने जे पारितोषिक, विजयी देवश्रेष्ठाना दिले त्यातला चंधाचा हक्कानुसार वाटा त्याच्या नावे वेगळा काढून, मगच हे सुरवर आपली वाटणी घेऊ लागले हे योग्यच आहे. ।। ६५ ।।

श्लोक

विपञ्च्या गायन्ती विविधमपदानं पशुपते-
स्त्वयारब्धे वक्तुं चलितशिरसा साधुवचने ।
तदीयैर्माधुर्यैरपलपिततन्त्रीकलरवां
निजां वीणां वाणी निचुलयति चोलेन निभृतम् ॥ ६६ ॥

अर्थ

( मान वेळावून, तान घेऊन ) शंकराचे गुणगान गाणाऱ्या तुझ्या मधुरतम स्वरांपुढे, वीणेचा मधुर स्वर फारच फिका पडल्यामुळेच ( की काय ) वीणेच्या सुस्वर सुरानी शंकराचे पूर्वपराक्रम आळवणारी सरस्वती, मुकाट्याने आपल्या हत्यारास गवसणी घालू लागली. ॥ ६६ ॥

यंत्र




उपासना

( १ ) यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : गुळाची खीर व मध. फलप्राप्ती : वीणा व इतर ततुवाद्यात प्रावीण्य.
( २ ) यंत्र विभूतीने काढावे.
अनुष्ठान : ३ दिवसाचे. जपसंख्या : दररोज ५००० वेळा.
नैवेद्य : वरीलप्रमाणेच. फलप्राप्ती : सर्व रोगनिवारक.

विवेचन

मागल्या श्लोकात देवीच्या जिभेचे वर्णन केल्यावर, कवी आता तिच्या आवाजाकडे वळला आहे. देवीचा आवाज नितांतमधुर आहे. इतका मधुर, की वीणा वाजविण्यात वाकबगार गणली गेलेली सरस्वती, आपल्या वीणेवर सुद्धा

इतका मधुर स्वर काढू शकत नाही. म्हणूनच देवी शंकराचे गुणगान आपल्या मधुरतम सुरात करू लागल्याबरोबर सरस्वतीने, आता आपल्या वीणेचा निभाव नाही हे उमगून आपले वीणावादन बंद करून वीणेस गवसणी घालण्यास सुरवात केली.

श्लोकातील हे शब्दचित्र कवीने इतके हुबेहूब उमे केले आहे, की त्यातून वाचकाला, देवीच्या सुस्वरांची कल्पना लगेच यावी. ।। ६६ ।।


### श्लोक

**करा‍ग्रेण स्पृष्टं तुहिनगिरिणा वत्सलतया**
**गिरीशेनोदस्तं मुहुरधरपानाकुलतया ।**
**करग्राह्यं शंभोर्मुखमुकुरवृन्तं गिरिसुते**
**कथंकारं ब्रूमस्तव चिबुकमौपम्यरहितम् ।। ६७ ।।**

### अर्थ

हे गिरिकन्ये, तुझ्या आरशासारख्या अप्रतिम चेहऱ्याचा जणू पायाच, कैलासपतीने ( शंकराने ) वारंवार चुंबनाच्या शिक्कामोर्तबासाठी प्रेमाने कुरवाळून. कराग्राने वर केलेल्या, हिमवताने ( हिमालयाने ) पितृवात्सल्याने बोटानी स्पर्शिलेल्या तुझ्या हनुवटीचे मी कशा प्रकारे वर्णन करू ? ।। ६७ ।।

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. उपासना नवरा-बायकोनी जोडप्याने करावयाची.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मध, दुधाची खीर, व पान-सुपारी. फलप्राप्ती : राजकृपा.

## विवेचन

मागल्या श्लोकात देवीच्या आवाजाची कल्पना, वाचकांस दिल्यावर या श्लोकात देवीच्या हनुवटीचे वर्णन कवीने केले आहे. हनुवटीचे वर्णन, देवीच्या मुखाचा पाया अशा शब्दांत केले आहे. तसेच पती शंकर व पिता हिमालय यानी याच हनुवटीस स्पर्श केला हे दाखवून, वाचकांच्या मनात शृंगार व पितृ-वात्सल्य या दोन्ही भावनाना स्पर्श केला आहे. ॥ ६७ ॥


## श्लोक

**भुजाश्लेषान्नित्यं पुरदमयितुः कण्टकवती**
**तव ग्रीवा धत्ते मुखकमलनालश्रियमियम् ।**
**स्वतः श्वेता कालागुरुबहुलजम्बालमलिना**
**मृणालीलालित्यं वहति यदधो हारलतिका ॥ ६८ ॥**

## अर्थ

त्रिपुराचा नाश करणाऱ्या शंकरानी वारंवार आलिंगिल्यामुळे रोमांचित झालेली तुझी मान, तुझ्या मुखकमलाला तोलून धरणाऱ्या (कमल) देठाप्रमाणे वाटते, कारण त्याच्याच खालील, मूळच्या शुभ्र पण कस्तुरीलेपनामुळे काळ्या झालेल्या तुझ्या गळ्यातील मौक्तिकमालेने ती (चिखलावरील) देठाच्या नाजुक भागाप्रमाणे भासते. ॥ ६८ ॥

## यंत्र




## उपासना

यंत्र कुंकवाने काढावे. श्रीचक्राची पूजा करावी. यंत्रात श्लोक कोरून काढावा.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध व पानसुपारी. फलप्राप्ती : राजकृपा.

## विवेचन

मागल्या श्लोकात देवीच्या मुखकमलाचे सांगोपांग वर्णन करून झाल्यावर, आता त्या ओघातच देवीच्या मानेचे वर्णन, या श्लोकात आले आहे.

देवीचे मुखकमल धारण करणारी मान, म्हणजे मुखकमळाचा देठच, कमळाचा देठ चिखलातून वर आलेला नाजूक भासणारा, चित्रविचित्र ठिबक्यामुळे काटेरी असल्यासारखा भासणारा. देवीची मानही तशीच भासते. कंठभूषण म्हणून घातलेल्या शुभ्र मौक्तिक माळा, कस्तुरीच्या लेपनामुळे काळ्या झालेल्या आहेत. त्यामुळे कवीला चिखलातून वर आलेल्या देठाचा भास होणे स्वाभाविकच आहे. त्यातच देवीच्या सर्वांगाबरोबर मानही रोमांकित् झालेली आहे. म्हणजे हीही गोष्ट देठाशी जुळणारीच. त्यामुळे कवीने देवीच्या मानेला कमळदेठाची दिलेली उपमा योग्यच वाटते. ॥ ६८ ॥


## श्लोक

गले रेखास्तिस्रो गतिगमकगीतैकनिपुणे
विवाहव्यानद्धत्रिगुणगुणसंख्याप्रतिभुवः ।
विराजन्ते नानाविधमधुररागाकरभुवां
त्रयाणां ग्रामाणां स्थितिनियमसीमान इव ते ॥ ६९ ॥

## अर्थ

( संगीत ) शास्त्र, ( त्यातील ) आरोह-अवरोह व संगीत ( गायन ) यांचे एकमेव प्रतीक अशा देवी, तुझ्या विवाहकाली गळ्यात बांधलेल्या मंगलसूत्रातील सूत्राची संख्यादर्शक, संगीतशास्त्राच्या खाणीतील मधुर चिजांनी परिपूर्ण अशा तीन स्वरांची ( षड्ज, मध्यम, गांधार । पचम ) सीमादर्शक, अशा तीन कंठरेखा, तुझ्या गळ्यावर दिसतात. ॥ ६९ ॥

## यंत्र



## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून काढावे. जप करताना चाफ्याचे फूल हातात ठेवावे व जप झाल्यावर त्या स्त्रीस द्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवस. जपसंख्या दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मध. फलप्राप्ती : त्या स्त्रीस वश करणे.

## विवेचन

देवीमुळेच सर्व विश्वाची उत्पत्ती झाली. अर्थातच या विश्वात जे आहे त्यांची ती जननी, माता बनते. मग सर्व शास्त्राची, (त्यातच संगीतशास्त्र आले, ) जननी ती आहे, हे उघडच समजून येते. म्हणूनच या श्लोकात देवीचा गौरव, संगीतशास्त्राची जननी म्हणून केला आहे. जननी या शब्दातच सर्व काही असा अर्थ ओघानेच येतो.

देवीच्या कंठाभोवती असणाऱ्या तीन रेषा पाहून कवीला कल्पना स्फुरतात. मंगळसूत्रातील दोरा हा तीनपदरी असतो. या रेखा, मंगळसूत्रातील दोऱ्याच्या पदरातील संख्येच्या निदर्शक, या तीन कंठरेखा असाव्यात, असे कवीला वाटते. ते त्याने श्लोकाच्या पूर्वार्धात मांडले आहे. तर उत्तरार्धात, या तीन रेखा म्हणजे संगीतशास्त्रातील त्रिस्वराच्या सीमादर्शक, असाव्यात, असे वाटते.

संगीतशास्त्राच्या म्हणण्याच्या पद्धतीनुसार, मार्ग व देशी असे दोन भाग पडतात. उच्चनीच स्वरावर षड्ज, मध्यम व गांधार असे विभाग पडतात. तेच विभाग या कंठरेखा दाखवितात, असे कवी, श्लोकाच्या उत्तरार्धात सूचित करतो. ॥ ६९ ॥

## श्लोक


**मृणालीमृद्वीनां तव भुजलतानां चतसृणां**
**चतुर्भिः सौन्दर्यं सरसिजभवः स्तौति वदनैः ।**
**नखेभ्यः संत्रस्यन्प्रथममथनादन्धकरिपो–**
**श्चतुर्णां शीर्षाणां सममभयहस्तार्पणधिया ॥ ७० ॥**

## अर्थ

तुझ्या हातांमुळे, अंधकमर्दन शंकराच्या नखांपासून ( एक वेळी शंकरानी ब्रह्मदेवाचे पांच तोंडांतील एक नखांनी तोडल्यामुळे उरलेली ) चार तोंडे सुरक्षित

राहतील या ( खात्री ) मुळे, कमलोद्भव ( ब्रह्मदेव ) आपल्या चार तोंडांनी, तुझ्या चार, कमलदलसदृश, हाताच्या सौंदर्याची स्तुती करतो. ॥ ७० ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : नारळ व मध. फलप्राप्ती : पुरुषांना मोहित करणे.

### विवेचन

या श्लोकात देवीचे चार हात हे अभयदायक कसे आहेत हे सांगून, देवीच्या हाताचे वर्णन कवीने केले आहे.

फार पूर्वी, ब्रह्मदेवालाही शंकरांप्रमाणेच पाच मुखे होती. पण या साम्यामुळे फुगून, ब्रह्मदेवाने बढाई मारण्यास सुरवात केल्याने, त्याची ही घमेंड उतरविण्यासाठी, शंकरानी आपल्या नखानी त्याचे एक मस्तक छाटून टाकून चारच शिल्लक ठेवली. तेव्हापासून ब्रह्मदेव, शंकराच्या नखाना इतका घाबरून आहे, की एखादे मूल बाप रागवला की आईकडे जाऊन लाडीगोडी करते, तसाच घाबरून तो देवीची स्तुती करीत असतो देवीचे हातच आपल्या चार तोंडांचे शंकराच्या नखांपासून रक्षण करू शकतील, याची त्याला खात्री आहे. म्हणूनच तो आपल्या उरलेल्या चारी तोंडानी देवीच्या चार हाताची स्तुती करत असतो.

या पुराण कल्पनेवरच हा श्लोक आधारित आहे. ॥ ७० ॥

### श्लोक


**नखानामुद्योतैर्नवनलिनरागं विहसतां**
**कराणां ते कान्ति कथय कथयामः कथमुमे ।**

कयाचिद्वा साम्यं भजतु कलया हन्त कमलं
यदि क्रीडल्लक्ष्मीचरणतललाक्षाऽरूणदलम् ॥ ७१ ॥

### अर्थ

हे उमे, नखाच्या तेजाने, नवोन्मीलित वहरलेल्या कमलपंक्तीना मागे टाकणाऱ्या तुझ्या करकमलांचे वैशिष्ट्य कशा तऱ्हेने वर्णू ते कृपा करून सांग. कदाचित् लक्ष्मीने आपल्या अळित्याने रंगविलेल्या तळपायांनी कमलदलांना स्पर्श केला तरच या कमळांना थोडेफार साधर्म्य येऊ शकेल. ॥ ७१ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. वडाच्या झाडाखाली जप करावा.
अनुष्ठान : ९० दिवसांचे. जपसंख्या : दररोज १२००० वेळा.
नैवेद्य : मध. फलप्राप्ती : यक्षिणीवशीकरण.

### विवेचन

मागल्या श्लोकात देवीच्या हाताचा अभयदायक असा गौरव केल्यावर, या श्लोकात कवी त्याच हातांच्या अनुपमेय रंगविण्याविषयी स्तुती करतो.

या हातांशी तुलना करणारी कोणतीच वस्तू कवीच्या मनात भरत नाही. हे हात कांतीने अनुपमेयच आहेत. आता थोडेसे साधर्म्य पाहावयाचे तर त्याला फक्त कमळच योग्य आहे. पण ते कमळ नुसते चालणार नाही. लक्ष्मीने आपल्या अळित्याने रंगविलेल्या पायांनी ज्यांच्या पाकळ्यांना स्पर्श केला आहे, अशीच कमळे, देवीच्या करकमलांशी, तुलनेला, थोडीफार योग्य आहेत, असे कवीला वाटते. ॥ ७१ ॥

### श्लोक

समं देवि स्कन्दद्विपवदनपीतं स्तनयुगं
तवेदं नः खेदं हरतु सततं प्रस्नुतमुखम् ।
यदालोक्याशङ्काकुलितहृदयो हासजनकः
स्वकुम्भौ हेरम्बः परिमृशति हस्तेन झटिति ॥ ७२ ॥

### अर्थ

हे देवी, दुधाने भरून वाहणारे तुझे स्तनद्वय, (तुझे पुत्र) स्कंद व गजमुख (कार्तिकेय व गणेश) एकाच वेळी पीत असताना, गजमुख शंकित होऊन (आपण तोंडात खरोखर काय धरले आहे? आपलेच फुगीर गण्डस्थळ तर नव्हे ना? या शंकेने) आपल्याच गण्डस्थळावर हात फिरवितो, त्यावेळी निर्माण होणाऱ्या हास्याने, आमची दुःखे दूर होवोत. ॥ ७२ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. अगर हातातील काठीवर कोरावे.
अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध. फलप्राप्ती : रात्री प्रवासात कसलेही भय राहात नाही.

### विवेचन

देवीच्या हाताची सौंदर्यस्तुती आटोपून, कवी आता देवीच्या वक्ष भागाकडे वळतो. देवी ही जगज्जननी. त्यामुळे तिचे स्तन मातृवात्सल्याने सदैव ओसंडून वाहतात. देवीचे पुत्र कार्तिकेय व गणेश हे एकाच वेळी स्तनपान करताना, गणेशाला शंका येते. आपण खरोखर स्तनपानच करीत आहोत ना? का आपल्याच कपाळावरील उंचवट्याला आपण मातेचे वक्ष समजलो? या शंकेने आकुल झालेला गणेश ज्यावेळी आपल्या गण्डस्थळाच्या उंचवट्यावरून हात

फिरवून खात्री करून घेतो, त्यावेळी ते पाहून या त्याच्या शिशुसुलभ भावनेमुळे निर्माण झालेल्या चेष्टितामुळे मातेच्या–देवीच्या चेहऱ्यावर हास्य विलसते

या ठिकाणी, गणेश हा गजवदन असल्यामुळे व तोही साधर्म्यामुळे शंकित झाला, हे पाहून देवीचे स्तन व हत्तीचे गंडस्थळावरील उंचवटे यांतील सारखेपणा वाचकाच्या सहजच लक्षात येतो. त्याचे वेगळ्या शब्दांत वर्णन करण्याची जरूरीच पडत नाही.

श्लोकाच्या शेवटी कवी प्रार्थना करतो. हे माते, तुझ्या या मातृवत्सल हास्याने आम्हा शिशूच्याही अंतःकरणातील दुःखे नाहीशी होवोत. आईचे हास्य-वदन बालकाच्या मनात कसा आनद निर्माण करते. हे वेगळे सांगावयास नकोच. देवीच्या वक्षाचे वर्णन करताना, या पहिल्याच श्लोकात, वाचकाच्या मनात भाव उमटतात ते वात्सल्याचेच. हाच कवीचा प्रतिभाविलास होय. ॥ ७२ ॥

श्लोक

**अमू ते वक्षोजावमृतरसमाणिक्यकुतुपौ**
**न संदेहस्पन्दो नगपतिपताके मनसि नः ।**
**पिबन्तौ तौ यस्मादविदितवधूसंगरसिकौ**
**कुमारावद्यापि द्विरदवदनक्रौञ्चदलनौ ॥ ७३ ॥**

अर्थ

हे नगराजप्रतिके, तुझे स्तनयुग्म माणकातून कोरलेले आणि अमृताने भरलेले आहेत, याबद्दल आमच्या मनात थोडीशीही शंका नाही. पत्नीप्रेमाची ओळखही नसल्याने, क्रौञ्चाद्री ( स्कंद ) व गजमुख ( गणेश ) ते पितात, म्हणूनच ते अद्यापही शिशुसमान ( निरागस ) आहेत. ॥ ७३ ॥

यंत्र




उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरावे. अगर पाण्याच्या भांड्यात काढून ते पाणी जपानंतर प्यावे अगर शिंपडावे.

अनुष्ठान : ७ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध व दूध. फलप्राप्ती : स्त्रियांची व गाईंची दुग्धवृद्धी.

### विवेचन

याही श्लोकात देवीच्या वक्षाचेच वर्णन कवीने पुढे चालू ठेवले आहे. जरी कौमार्यावस्था उलटली असली तरी सुद्धा गणेश व कार्तिकेय, हे देवीचे शिशूच आहेत. ते अद्यापही स्तनपान करतात. यावरूनच ते अद्यापि शिशूच आहेत ही गोष्ट उघड दिसते. मातृवात्सल्यप्रेमाचा हा अनुभव ते अद्यापही त्याच निरागसपणाने उपभोगू शकतात.

मातृप्रेम हवे असेल तर गणेश, कार्तिकेयाप्रमाणेच देवीचे शिशू बना. मगच तुम्हाला परमानंदाचा लाभ होईल, हा संदेशच जणू काही या श्लोकात कवीने दिला आहे. ॥ ७३ ॥


### श्लोक

**वहत्यम्ब स्तम्बेरमदनुकुम्भप्रकृतिभिः**
**समारब्धां मुक्तामणिभिरमलां हारलतिकाम् ।**
**कुचाभोगो बिम्बाधररुचिभिरन्तः शबलितां**
**प्रतापव्यामिश्रां पुरविजयिनः कीर्तिमिव ते ॥ ७४ ॥**

### अर्थ

हे माते, तुझ्या आरक्त ओठांच्या प्रतिबिंबामुळे आरक्त दिसणारी, त्रिपुरमर्दन शंकराचे शौर्य ( दर्शक आरक्तवर्णी ), कीर्ती ( दर्शक धवलवर्णी ) ची जणू पताकाच, गजासुराचे गंडस्थळातील विविधरंगी मोत्यांनी बनवलेली अशी, ही पुष्पमाला तुझ्या वक्षस्थळाने धारण केली आहे ॥ ७४ ॥

### यंत्र



अनुक्रम ...८८८७... वि: ...विषय...
क्रमांक ...२२६... बॉ: वि: ...मंत्रशास्त्र... ५-३-७१



१८७३०

### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, देवीपुढे ठेवावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १०८ वेळा.
नैवेद्य : दुधाची खीर व मध. फलप्राप्ती कीर्तीत वाढ होणे.

### विवेचन

या श्लोकात देवीच्या वक्षभागावर रुळणाऱ्या मौक्तिक मालेकडे पाहून कवीला काय वाटते, ते विशद केले आहे.

गजासुर नामक एका गजमुखी असुराचा भगवान शंकरानी वध केला या विजयाच्या प्रदर्शनासाठी त्यानी गजासुराच्या कातड्याचे वस्त्र परिधान केले, तर पतीच्या विजयाची खूण म्हणून, देवीने त्या गजासुराच्या गण्डस्थळात सापडलेल्या मोत्याची माळ धारण केली. मौक्तिकांचा मूळ रंग शुभ्र. पण देवीच्या आरक्त ओष्ठद्वयानी त्या मोत्यांना तांबूस छटा प्राप्त झाली, व ही मौक्तिकमाला, प्रतिबिंबानुसार, पांढरी व तांबूस दिसू लागली. जणू काही ती शंकरांच्या कीर्तीची धवलता व विजयाची, शौर्याची आरक्तता एकाच वेळी दाखवू लागली.

उज्ज्वल कीर्ती धवलवर्णी, तर शौर्य हे रक्तवर्णीय असे मानण्याची आपल्या वाङ्मयात प्रथाच आहे. यामुळेच कवीला ही मौक्तिकमाला कीर्तीची, शौर्याची निशाणीच वाटू लागली. ।। ७४ ।।


### श्लोक

**तव स्तन्यं मन्ये धरणिधरकन्ये हृदयतः**
**पयः पारावारः परिवहति सारस्वत इव ।**
**दयावत्या दत्तं द्रविडशिशुरास्वाद्य तव य–**
**त्कवीनां प्रौढानामजनि कमनीयः कवयिता ।। ७५ ।।**

### अर्थ

हे पर्वतकन्ये, तुझ्या हृदयात उत्पन्न झालेला काव्यसागर उचंबळल्यामुळेच तुझ्या वक्षातून वाहणारे दूध, तुझ्या कृपाप्रसादाने सेवन केल्यामुळेच हा द्रविडशिशु, कविश्रेष्ठात अग्रगण्य ठरला. ।। ७५ ।।

### यंत्र




### उपासना

यत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : २ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १२००० वेळा.

नैवेद्य : फळे व मध. फलप्राप्ती : कवित्व. स्त्रियांना दुग्धवृद्धी.

### विवेचन

या श्लोकात कवीने, शंकर भगवत्पाद, आद्य शंकराचार्य यांनी देवीचे स्तनपान केल्यामुळेच आपणास कवित्वशक्ती प्राप्त झाली असे दिले आहे. कारण ते जे दूध प्यायले ते दूध म्हणजे देवीच्या हृदयातील काव्यसागर उचंबळून स्तनावाटे बाहेर आलेले काव्यच होते.

शंकर भगवत्पादाचे वडील द्रविड हे देवीचे परमउपासक होते. रोज देवीची पूजा करताना देवीस दुधाचा नैवेद्य दाखवून, उरलेले दूध ते शंकर भगवत्पाद याना पिण्यासाठी देत. एक वेळ त्याना काही कामासाठी बाहेरगावी जावे लागल्यामुळे आपल्या गैरहजेरीत रोजची पूजा, त्यानी पत्नीस करावयास सांगितली. मासिक अडचण प्राप्त झाल्यामुळे पत्नीने या बालकास पूजेसाठी पाठविले. या बालकाने सगळ्याच दुधाचा नैवेद्य देवीस दाखवून, तो देवी दूध पिण्याची वाट पाहू लागला. देवी तर दूध प्रत्यक्ष पिईना. शेवटी बालकाच्या या बालहट्टापुढे देवीने प्रत्यक्ष रूपात प्रगट होऊन नैवेद्य ग्रहण केला. मग आपल्याला दूध उरले नसल्याचे पाहून, व भुकेने व्याकूळ होऊन बालकाने देवीला थोडेसे दूध परत देण्याचा हट्ट धरला. तेव्हा देवीने पुन्हा प्रगट होऊन या शिशूस स्तनपान देऊन त्याची भूक शांत केली. या अनुग्रहामुळेच ते बालक म्हणजेच शंकर भगवत्पाद थोर कवी झाले.

या श्लोकात द्रविड-शिशू म्हणून स्वतःचा उल्लेख, कवीने केला आहे. || ७५ ||


### श्लोक

**हरक्रोधज्वालावलिभिरवलीढेन वपुषा**
**गभीरे ते नाभीसरसि कृतसङ्गो मनसिजः ।**
**समुत्तस्थौ तस्मादचलतनये धूमलतिका**
**जनस्तां जानीते तव जननि रोमावलिरिति ।। ७६ ।।**

### अर्थ

हे गिरिकन्ये, शंकराच्या क्रोधामुळे जळणाऱ्या मदनाने ( जळत्या अंगाने ) तुझ्या नाभिकुंडात ( बेंबीच्या खोलगट भागात ) बुडी मारली. ( त्यामुळे ) त्यातून निघालेली ही धुराची रेषा, जगाला ( तुझ्या नाभीवरली ) लवरेषाच वाटते. ।।७६।।

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : १२ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : नारळ, फळे, मध व दही-भात.
फलप्राप्ती : सर्व जनमोहन व सर्वाधिकारप्राप्ती.

### विवेचन

देवीच्या वक्षस्थळांचे वर्णन करून झाल्यावर, कवी या श्लोकात देवीच्या नाभीचे वर्णन करतो.

देवीच्या नाभीवर असणाऱ्या लवरेषेकडे बघून कवीची कल्पनाशक्ती जागृत होते.

पूर्वी शंकरानी मदनाला जाळले होते. त्यावेळी जळत असणाऱ्या मदनाने देवीच्या नाभिकुंडाचा आश्रय घेतला त्यातील जलाने आपले पेटणारे अंग शांत होईल असे त्याला वाटले म्हणूनच त्याने या कुंडात उडी मारली. त्यामुळे जी

धुराची, वाफेची रेषा त्या कुंडाबाहेर पडली तीच ही लवरेषा असावी असे कवीस वाटले. हीच कल्पना त्याने या श्लोकात मांडली आहे. ॥ ७६ ॥


### श्लोक

**यदेतत्कालिन्दीतनुतरतरङ्गाकृति शिवे**
**कृशे मध्ये किंचिज्जननि तव यद्भाति सुधियाम् ।**
**विमर्दादन्योऽन्यं कुचकलशयोरन्तरगतं**
**तनूभूतं व्योमप्रविशदिव नाभिं कुहरिणीम् ।। ७७ ।।**

### अर्थ

हे शिवप्रिये, माते तुझ्या 'कृशकटीवरील, कालिन्दीच्या जलतरंगाप्रमाणे भासणारी रोमावली पाहून, (तुझ्या कृपेने) आनंदित झालेल्या मला, तुझ्या कुंभाकार वक्षातून प्रवेश करताना दाबल्यामुळे बारीक झालेले अवकाश, तुझ्या नाभिकुंडात प्रवेश करीत आहे असे वाटते. ||७७ ||

### यंत्र




### उपासना

तांबड्या कमळाने कोळश्यावर यंत्र व श्लोक कोरून, धूम्रवर्ण गाईच्या तुपात मिसळून त्याचा टिळा, जपानंतर कपाळावर लावावा.

अनुष्ठान : १५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज २००० वेळा.

नैवेद्य : मध व फळे. फलप्राप्ती : राजकृपा.

### विवेचन

याही श्लोकात कवीने देवीचे नाभीवरील रोमावली पाहून, आपली दुसरी कल्पना मांडली आहे.

देवीच्या वक्षामधून प्रवेश करताना दाबल्यामुळे आकुंचित झालेले अवकाशच देवीच्या नाभिकुंडात प्रवेश करीत आहे, असे कवीस वाटते. देवीचे कमरे-भोवतालची रोमावली पाहून कवीस कालिंदी नदीच्या जलतरंगांची आठवण होते.

अवकाशाचा ( ईथरचा ) रंग काळा मानला आहे. अति सूक्ष्म वायुरूप पदार्थही मोठ्या दाबाखाली द्रवरूप, घनरूप बनतात. देवीच्या वक्षाच्या दाबाने हे अवकाश जणू घनीभूत होऊन रोमावली रूपाने नाभिकुंडात प्रवेश करीत आहे. अशी कवीची कल्पना होते, ती या शास्त्राधारावरच.

तसेच कालिंदीचे जलही काळसर असल्याचे मानण्यात येते. त्यामुळे देवीच्या कमरेवरील, श्वासोच्छ्वासाने वरखाली होणारी काळसर रोमावली, कवीला कालिंदीच्या जललहरींची आठवण करून देते, ती या साधर्म्यामुळेच होय. ॥ ७७ ॥


श्लोक

**स्थिरो गङ्गावर्तः स्तनमुकुलरोमावलिलता**
**कजावालं कुण्डं कुसुमशरतेजोहुतभुजः ।**
**रतेर्लीलागारं किमपि तव नाभिर्गिरिसुते**
**बिलद्वारं सिद्धेर्गिरिशनयनानां विजयते ॥७८॥**

अर्थ

हे गिरिकन्ये, गंगेच्या प्रवाहातील भोवऱ्याप्रमाणे स्थिर दिसणाऱ्या, स्तन-युग्मरूपी कळ्या लागलेल्या वेलीची ( रोमावली ) कुंडीच, रतीच्या प्रिय पुष्पधनु मदनाच्या शौर्यप्राप्ति–होमाचे यज्ञकुंडच, तर शंकराच्या दृष्टीने योगीजनांच्या तप-साधनेस योग्य अशा तपोगुंफेचे मुख, अशा [ ] ह्या नाभीचा ( बेंबीचा ) जय असो ॥ ७८ ॥

यंत्र



## उपासना

यत्र रक्तचंदनाच्या गंधात गुलाबपाणी मिसळून काढावे. त्याचा टिळा कपाळास लावावा.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १०८ वेळा.

नैवेद्य : मध व उडिदाचे वडे. फलप्राप्ती : राजकृपा व सर्व उपक्रमांत यश.

## विवेचन

याही श्लोकात, कवीने देवीच्या नाभि-भागाचेच वर्णन केले आहे. देवीचा खोल वर्तुळाकार नाभिभाग पाहून कवीस अनेक उपमा सुचतात. प्रथम त्याला हा नाभिभाग गंगेच्या प्रवाहातील भोवऱ्याप्रमाणे वाटतो. नतर नाभिभागावरली थेट स्तनयुग्मापर्यंत जाणारी रोमावली पाहून, ती रोमावली म्हणजे जणू एखादी वेलच या कुंडीतून बाहेर आली आहे व त्या वेलीस त्या स्तनयुग्मरूपी दोन कळ्या लागल्या आहेत, असे त्यास वाटते. नंतर ती नाभी म्हणजे मदनाने विजयप्राप्तीचा यज्ञ करण्यासाठी यज्ञकुडच तयार केले आहे, असे त्यास वाटते. शंकराना देवीच्या नाभीकडे पाहून आनंद वाटतो त्यावरून योगी लोक परमानदप्राप्तीसाठी ज्या गुहेत, तपास बसतात, त्या गुहेचे हे तोंडच आहे, असेही कवीस वाटते.

कवीच्या या विविध कल्पना पाहिल्या की कवीच्या प्रतिभाशक्तीची वाचकास चांगली ओळख पटते. ॥ ७८ ॥


## श्लोक

**निसर्गक्षीणस्य स्तनतटभरेण क्लमजुषो**
**नमन्मूर्तेर्नाभौ वलिषु शकनैस्त्रुटयत इव ।**
**चिरं ते मध्यस्य त्रुटिततटिनीतीरतरुणा**
**समावस्थास्थेम्नो भवतु कुशलं शैलतनये ॥७९॥**

## अर्थ

हे गिरिकन्ये, जात्याच ( मूळचीच ) बारीक, कृश जागी ( वरील स्तनभाराने ) अगदी मोडून पडण्यास आलेली, गंगेच्या धुपणाऱ्या ( मऊ मातीच्या ) काठावरील उभ्या वृक्षाइतकी बळकट ! अशा तुझ्या कमरेस सुरक्षितता लाभो. ॥७९॥

यंत्र




उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मध व दुधाची खीर. फलप्राप्ती : हातचलाखीत प्रावीण्य.

विवेचन

मागल्या श्लोकात देवीच्या नाभीचे वर्णन करून झाल्यावर, आता या श्लोकात, कवी देवीच्या कमरेचें वर्णन करतो.

कृशकटी ही स्त्रियाच्या सौंदर्याचे लक्षण आपण समजतो. मग लावण्यलतिका देवी कृशकटी असणारच. तिच्या कृशकटीची कल्पना वाचकास देण्यासाठी, तो " गंगेच्या मऊ मातीच्या धुपणाऱ्या भागावर उभ्या असलेल्या वृक्षाइतका बळकट, देवीचा कटिभाग आहे, " असे म्हणतो. आता धुपणाऱ्या मऊ काठावर उभा असणारा वृक्ष किती बळकट असणार, हे वाचकास कल्पनेत सहज जाणता येते. असा वृक्ष कोणत्या क्षणी उन्मळून पडेल हे सागता येत नाही. त्याची स्थिती चिंताजनक असते हे वाचक लगेच ओळखू शकतो. मऊ काठावरील वृक्षाची स्थिती आणि स्तनभाराने खचून बारीक झालेल्या कटीची स्थिती एकच आहे. ही कृशकटी या भाराखाली केव्हाही मोडून पडेल असे कवीस वाटते. "

यासाठीच या कमरेस बळकटी येवो, ती मोडून पडू नये ही सदिच्छा तो व्यक्त करतो. ॥ ७९ ॥


श्लोक

**कुचौ सद्यःस्विद्यत्तटघटितकूर्पासभिदुरौ**
**कषन्तौ दोर्मूले कनककलशाभौ कलयता ।**
**तव त्रातुं भङ्गादलमिति वलग्नं तनुभुवा**
**त्रिधा नद्धं देवि त्रिवलि लवलीवल्लिभिरिव ॥८०॥**

### अर्थ

हे देवी, श्वासोच्छ्वासाने वरखाली होऊन तुझ्या काखाशी घासणाऱ्या, उद्दीपित भावनेने आवरण वस्त्र तोडण्याच्या स्थितीत असलेल्या, सुवर्णघटांसारख्या स्तनद्वयाच्या भारापासून (मोडण्यापासून) रक्षण करण्यासाठीच, मदनाने, लव्हाळ्याप्रमाणे दिसणाऱ्या तीन वळ्यांनी तुझी कंबर बांधली आहे. ।। ८० ।।

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, पहिल्याच ऋतुस्रावात गुह्यभागी ठेवावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध. फलप्राप्ती : हातचलाखीत प्रावीण्य.

### विवेचन

देवीच्या कमरेभोवती ज्या तीन वळ्या आहेत त्या देवीच्या कमरेस मोडून पडण्यापासून वाचविण्यासाठीच आहेत. त्यासाठीच, मदनानेच या लव्हाळ्याच्या तीन शखासमान या वळ्यांनी देवीची कंबर बांधली आहे, असे कवीस वाटते.

देवीचे स्तनयुग्म नैसर्गिकच मोठे, अगदी काखेशी घासण्याइतके विशाल, त्यात प्रणयोन्मादाने जास्तीच वृद्धिंगत होऊन, आवरणवस्त्र तोडून मुक्त होण्याच्या स्थितीत आलेले, अशा परिस्थितीत ही बिचारी सिंहकटी किती तग धरणार? तिला बळकटी न आणल्यास या भाराने ती मोडणार नाही का? म्हणूनच मदनानेच ही उपाययोजना केली. वेळ आली की आपणही एखाद्या कार्यास कंबर बांधून उभे राहतोच. तसेच मदनानेच देवीची कंबर लव्हाळ्याच्या तीन शंखच भासणाऱ्या या तीन वळ्यांनी, बांधून टाकली आहे. म्हणूनच देवीची कंबर हे ओझे पेलून ताठ उभी आहे ।। ८० ।।

### श्लोक

**गुरुत्वं विस्तारं क्षितिधरपतिः पार्वति निजा-**
**न्नितम्बादाच्छिद्य त्वयि हरणरूपेण निदधे ।**


**अतस्ते विस्तीर्णो गुरुरयमशेषां वसुमतीं**
**नितम्बप्राग्भारं स्थगयति लघुत्वं नयति च ॥८१॥**

**अर्थ**

हे पार्वती, हिमालयाने, तुझ्या पित्याने आपल्या कुशीतील भव्यता आणि जडपणा ( तुझ्या लग्नात ) तुला जणू आंदणच दिली आहेत. ( त्यामुळेच ) तुझे प्रविशाल आणि कठिण ( भासणारे ) नितंब, दृश्यमान जग हल्के आणि नजरेआड करतात. ॥ ८१ ॥

( तुझ्या हिमालय-भव्य नितंबासमोर हे दृश्यमान जग, नजरेत न भरण्याइतके क्षुद्र बनते. )

**यंत्र**




**उपासना**

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, नैर्ऋत्य दिशेस तोंड करून उपासना करावी.

अनुष्ठान १६ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मध, गुळाची खीर, आणि उडदाचे वडे. फलप्राप्ती : अग्नीवर तरंगणे.

**विवेचन**

मागल्या श्लोकात देवीच्या सिंहकटीचे वर्णन करून झाल्यावर, कवी आता या श्लोकात नितंबवर्णनाकडे वळतो. कृश कटीप्रमाणेच विशाल नितंब हेही स्त्रियांच्या सौंदर्याचे लक्षणच मानतात.

देवी तर प्रत्यक्ष हिमालयाचीच मुलगी. मग तिच्या नितंबात दिसून येणारी भव्यता ही तिला पित्याकडूनच मिळाली हे उघड आहे. आपण जेव्हा

काहीही भव्य दिव्य अशी गोष्ट पाहतो तेव्हा बाकीचे सारे जग ठेंगणे संकुचित वाटू लागते. देवीचे नितंब कवीलाही इतके भव्य, दिव्य वाटतात, की कवीच्या दृष्टीसमोरून बाकी जगाचा पसारा अगदी दृष्टीआड होतो. या उल्लेखाने देवीचे नितंब, हिमालयासमान भव्य, दिव्य आहेत हेच कवीने या श्लोकात सुचविले आहे. ॥ ८१ ॥


श्लोक

**करीद्राणां शुण्डान् कनककदलीकाण्डपटली-**
**मुभाभ्यामूरुभ्यामुभयमपि निर्जित्य भवति ।**
**सुवृत्ताभ्यां पत्युः प्रणतिकठिनाभ्यां गिरिसुते**
**विजिग्ये जानुभ्यां विबुधकरिकुम्भद्वयमपि ॥८२॥**

अर्थ

हे गिरिकन्ये, तुझ्या दोन्ही माड्यानी तू, ऐरावताच्या सोंडेला, स्वर्गातील केळीच्या खुंटाना तुलनेने ( सौंदर्यात ) मागे टाकले आहेसच, पण, पतीपुढे ( शंकरापुढे ) वारंवार टेकण्याने कठिण बनलेल्या तुझ्या वर्तुळाकार गुडघ्यांनी सुद्धा ऐरावताच्या गण्डस्थळावरील, सदृश उंचवट्यानाही ( सौंदर्यात ) मागे टाकले आहेस. ॥ ८२ ॥

यंत्र



उपासना

यंत्र भूर्जपत्रावर काढावे. किंवा लाकडी खडावांवर काढावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : नारळ, फळे व मध. फलप्राप्ती : पाण्यावर चालणे, तरंगणे.

### विवेचन

मागल्या श्लोकात देवीच्या नितंबाचे वर्णन करून झाल्यावर, या श्लोकात कवी देवीच्या माड्याचे वर्णन करतो. सुंदर स्त्रीच्या घाटदार, सुडौल मांड्यांची, केळीच्या खुंटाशी, हत्तीच्या शुंडेशी तुलना करण्याची वाङ्मयात फार पूर्वीपासून प्रथा आहे.

कवीने या श्लोकातही त्याच उपमा, देवीच्या माड्याची स्तुती करण्यासाठी घेतल्या आहेत. यात ज्या हत्तीच्या सोंडेपेक्षाही सुदर म्हणून वर्णन केले आहे, तो आहे देवेन्द्रगज ऐरावत. असा हा गजश्रेष्ठ हत्ती, म्हणूनच तो देवेन्द्राचा, इन्द्राचा लाडका हत्ती हा राजगुणानी युक्तच असणार. पण या हत्तीच्या सोंडेपेक्षाही, देवीच्या माड्या सुडौल आहेत. एवढेच नव्हे तर त्या स्वर्गातील केळीच्या खुंटापेक्षाही जास्त पुष्ट, तेजस्वी आहेत.

देवीच्या नुसत्या माड्याच अलौकिक सौंदर्यात भर घालतात असे नाही. तर तिचे गुडघेही तितकेच सुदर आहेत. देवीचे गुडघे, पतीपुढे नमस्कारासाठी वसताना वारंवार जमिनीवर टेकण्यामुळे कठिण झाले आहेत. तरीसुद्धा ते वर्तुळाकार व सुडौल आहेत. डौलदारपणांत तर ते हत्तीच्या गंडस्थळावरील उचवट्यांनाही मागे टाकतात, असे कवीस वाटते. ॥ ८२ ॥


### श्लोक

**पराजेतुं रुद्रं द्विगुणशरगर्भौ गिरिसुते**
**निषङ्गौ जङ्घे ते विषमविशिखो बाढमकृत ।**
**यदग्रे दृश्यन्ते दश शरफलाः पादयुगली**
**नखाग्रच्छद्मानः सुरमकुटशाणैकनिशिताः ॥८३॥**

### अर्थ

नमस्कारासाठी तुझ्यापुढे वाकलेल्या देवांच्या किरीटरूपी सहाणेवर उगाळल्यामुळे तीक्ष्ण झालेल्या नखांची जणू काय बाणांची अग्रेच बाहेर डोकावतात असे भासणारे, दुप्पट संख्या असलेले बाण धारण केलेल्या उलट्या भात्याचे जोडीसारखे वाटणाऱ्या, तुझ्या पोटऱ्या, भगवान शंकराना युद्धात जिंकण्यासाठीच, मदनानेच खास बनवल्या आहेत. ॥ ८३ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, त्याची पूजा जास्वंदीच्या फुलांनी करावी.
अनुष्ठान . १२ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : गुळाची खीर व मध. फलप्राप्ती : सैन्य लाब राहणे.

### विवेचन

देवीच्या माडयांचे व गुडघ्याचे मागल्या श्लोकात वर्णन केल्यानतर, कवी आता या श्लोकात देवीच्या सुडौल पोटऱ्यांकडे वळतो. उपमेसाठी त्याने वस्तू घेतली आहे बाणाचे भाते. पण हे बाणाचे भाते आहेत मदनाचे. सौंदर्यासाठी जगविख्यात असलेल्या मदनाचा पुष्पशराचा भाताही तितकाच सुदर असणार. अशा ह्या भात्यात बाण असतात पाचच. म्हणूनच तर मदन, नेहेमी विषमसंख्या इतके बाण असणारा म्हणून, " विषमविशिखी " या नावाने प्रसिद्ध आहे.

मदनाच्या, ज्यातून पांच बाणाची तेजस्वी अग्रे बाहेर डोकावत असतात, अशा या भात्यासारख्याच देवीच्या पोटऱ्या आहेत असे कवीला वाटते. देवाच्या किरिटाचा सदा स्पर्श झाल्याने तेजस्वी तीक्ष्ण भासणारी नखे, पाउले या पोटऱ्यांस लागून आहेत. ती नखे पाहून, ही भात्यातून डोकावणारी, पच शराग्रेच तर नाहीत ना या विचाराने त्याची कल्पना त्याला योग्य वाटते. शंकराला प्रेम-युद्धात जिंकण्यासाठीच मदनानेच देवीच्या पोटऱ्या, आपल्या भात्याप्रमाणे बनविल्या असाव्यात ही शंका कवीला येते ती यामुळेच. एखादा पराभूत, अपमानित वीर, आपल्याला जिंकणाऱ्या व्यक्तीचा पाडाव करण्यासाठी, त्या विजयी वीराच्या सामनेदारास, सर्वतोपरी मदत करण्यास, त्याचे बळ वाढविण्यास झटेल यात नवल नाही. ॥ ८२ ॥


### श्लोक

**श्रुतीनां मूर्धानो दधति तव यौ शेखरतया**
**ममाप्येतौ मातः शिरसि दयया धेहि चरणौ ।**
**ययोः पाद्यं पाथः पशुपतिजटाजूटतटिनी**
**ययोर्लाक्षालक्ष्मीररुणहरिचूडामणिरुचिः ॥८४॥**

### अर्थ

हे माते, वेदानी शिरोभागावर अग्रपुष्पाप्रमाणे मानलेले, जटाधारी शंकराच्या डोक्यावरून वाहणारी गंगा जी धुतलेल्या पाण्याने बनते, ज्यांच्या अळित्याच्या रंगाने श्री विष्णूंच्या मुकुटावरील माणकाला तेज लाभते, ते तुझे पाय माझ्या डोक्यावर दयार्द्र होऊन ठेव, हीच प्रार्थना ॥ ८४ ॥

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : पूर्ण वर्ष, ३६५ दिवस. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : दुधाची खीर, वेगवेगळे मसाला भात, व मध.
फलप्राप्ती : परकायाप्रवेश.

### विवेचन

मागल्या श्लोकात देवीच्या पोटऱ्यांचे, मदनाच्या उलट्या ठेवलेल्या भात्यांसारखे असे वर्णन करून, कवी आता देवीच्या पावलांकडे वळतो, व भक्तांनी, देवांनी वंदन करण्यासाठी आपले मस्तक ज्यावर ठेवले अशी ही पावले. वेदांनी शिरोधार्य मानलेली, अशी ही सर्ववंद्य पावले, हे माते, तू माझ्या मस्तकावर ठेव या भाषेत पावलांचे वर्णन करते, या पावलांचा महिमा काय वर्णावा ? ही पावले

धुताना जे पाणी बाहेर पडते ते तीर्थ, तीच गंगा, भगवान शंकरांनी शिरोधार्य मानून आपल्या जटेत धारण केली. हीच ती पावले, की ज्यांच्या अळित्याने रंगविलेल्या स्पर्शाने, स्नानाच्या पाण्यात, रक्तिमा येतो तोच विष्णूंच्या मुगुटावरील माणकांना रक्तिमा चढवितो, तेज देतो. अशी ही जगवंद्य पावले देवींने दयार्द्र होऊन आपल्या मस्तकावर ठेवावीत, व आपलाही उद्धार करावा, असे कवी या श्लोकात म्हणतो. ॥८४॥


### श्लोक

**नमोवाकं ब्रूमो नयनरमणीयाय पदयो—**
**स्तवास्मै द्वंद्वाय स्फुटरुचिरसालक्तकवते ।**
**असूयत्यत्यन्तं यदभिहननाय स्पृहयते**
**पशूनामीशानः प्रमदवनकङ्केलितरवे ॥ ८५ ॥**

### अर्थ

अळित्याच्या रंगाने नुकत्याच रंगविलेल्या तुझ्या अप्रतिम सुंदर व तेजस्वी चरणांना आमचा आदरपूर्वक नमस्कार. तुझ्या आनंदवनातील, तुझ्या लत्ताप्रहाराची आतुरतेने वाट पाहणाऱ्या (शुष्क) अशोक वृक्षाचा, पशूंचा पति जो शंकर, तो (अशोक वृक्षास लाभणाऱ्या या नाजुक लत्ताप्रहार सोसण्यासाठी) मत्सर करतो. ॥ ८५ ॥

### यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, वेगवेगळ्या ८ रंगाच्या फुलांनी पूजा करणे.

अनुष्ठान : १२ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : दुधाची खीर, गुळाचे पेय व फळे.
फलप्राप्ती : दुष्ट योनीची बाधा न होणे.

## विवेचन

मागल्या श्लोकात देवीचे पदवदन करून, आता या श्लोकात देवीच्या त्या पावलांचे वर्णन कवी करतो.

ही पावले अळित्याने रंगविल्याने अप्रतिम सुंदर व तेजस्वी झाली आहेत. ही पावले इतकी सुदर आहेत, की या पावलाचा प्रहारही शंकरांना गोड वाटतो. याच कारणासाठी, ते अशोक वृक्षाला लाभणाऱ्या ह्या सुखाचा हेवा करतात. सुंदर स्त्रीच्या लत्ताप्रहाराने शुष्क अशोक वृक्षात नवचैतन्य बहरते. तो पालवीने नखशिखान्त बहरतो. पानाफुलांनी तत्काळ बहरण्याइतका, रोमाञ्चित करणारा, नवचैतन्य उत्पन्न करणारा हा देवीचा सुंदर लत्ताप्रहार आपल्याला न लाभता, एखाद्या शुष्क अशोकवृक्षाला लाभावा, याबद्दल शंकराना मत्सर वाटला तर त्यात नवल कसले ? ॥ ८५ ॥

## श्लोक

मृषा कृत्वा गोत्रस्खलनमथ वैलक्ष्यनमितं
ललाटे भर्तारं चरणकमले ताडयति ते ।
चिरादन्तःशल्यं दहनकृतमुन्मीलितवता
तुलाकोटिक्वाणैः किलिकिलितमीशानरिपुणा ॥८६॥

## अर्थ

तुझे नाव घेताना केलेल्या चुकीमुळे ( भलतेच नाव घेतल्यामुळे बेइमानीपणाच्या शकेमुळे क्रोधाविष्ट होऊन ) तुझ्या चरणकमलांनी कपाळावर केलेल्या प्रहाराने, तुझे पती शकर अपमानित झाले त्यावेळी ( सूडाची वाट पाहणाऱ्या ) दग्ध, उद्ध्वस्त झालेल्या शिवशत्रु मदनाने, तुझ्या नूपुराच्या किणकिणाटाने ( जणू ) विजयघोषच व्यक्त केला. ॥ ८६ ॥

## यंत्र

| | |
|---|---|
| रं | रं |
| रं | रं |
| रं | र |

## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून, जपकाली यंत्राशेजारी पाण्याचे भांडे ठेवावे. जपानंतर त्या पाण्याने स्नान करावे.

अनुष्ठान २१ दिवसांचे. जपसंख्या दररोज १००० वेळा.

नैवेद्य दुधाची खीर, नारळ व मध. फलप्राप्ती . वाईट योनींच्या बाधेपासून मुक्तता.

## विवेचन

अशोक वृक्षाला आपल्या लत्ताप्रहाराचे सुख दिल्याने, तेच सुख आपल्याला लाभावे, याचसाठी तळमळणाऱ्या शंकरांनी, देवीला दुसऱ्याच नावाने हाक मारून, तिचा मत्सर जागृत करून तिच्या लत्ताप्रहाराचे सौख्य मिळवावे, हा शंकराचा कामयुद्धातील बिनतोड डावच, या श्लोकात कवीने विशद करून सांगितला आहे.

शंकरांनी देवीस दुसऱ्याच स्त्रीच्या नावे संबोधताच, असूयेने क्रोधाविष्ट होऊन देवीने शंकरास लत्ताप्रहार केला. मनात ह्या लत्ताप्रहाराने आनंदून पण वरकरणी आपल्या चुकीबद्दल खजिल झालेसे दाखवून शंकरांनी मान खाली घातली. त्यांचा असा अवमान पाहून, त्याचा सूड घेण्यासाठी टपलेल्या, शंकरांच्या वैऱ्यास, त्या मदनास मग आनंदाची उकळी का फुटू नये ? आपल्या सूडाचा हा बदला पाहून, देवीच्या पायातल्या नूपुरांच्या निनादात त्याने आपला विजयघोष साजरा करावा, हे त्याच्या सूडभावनेला धरूनच आहे.

हेच शब्दचित्र, कवीने या श्लोकात, वाचकांपुढे तंतोतंत उभे केले आहे. ॥ ८६ ॥

### श्लोक

हिमानीहन्तव्यं हिमगिरिनिवासैकचतुरौ
निशायां निद्राणं निशि च परभागे च विशदौ ।
परं लक्ष्मीपात्रं श्रियमतिसृजन्तौ समयिनां
सरोजं त्वत्पादौ जननि जयतश्चित्रमिह किम् ।।८७।।

### अर्थ

हे माते, हिमवृष्टीमुळे लगेच कोमेजणाऱ्या, रात्री झोपणाऱ्या (मिटणाऱ्या) व लक्ष्मीची थोडीशी कृपा संपादन करणाऱ्या कमळांना, हिमगिरीत वास्तव्य करणाऱ्या, रात्रंदिवस सतेज असणाऱ्या (कधीही न कोमेजणाऱ्या), भक्तांना कृपाप्रसाद देणाऱ्या तुझ्या (चरण) कमळानी हरविले तर त्यात आश्चर्य कसले ? ।। ८७ ।।

### यंत्र

य
व
यं

### उपासना

यंत्र चंदनाच्या गंधाने काढावे, अगर स्मशानातील राखेवर कोरावे.
अनुष्ठान : १६ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : दुधाची खीर, मध, फळे व नारळ. फलप्राप्ती : सर्पांपासून रक्षण.

### विवेचन

सुंदर पावलाचे वर्णन करताना त्यांना चरणकमल म्हणून त्यांची कमलांशी बरोबरी करण्याची वाङ्मयात प्रथाच आहे. पण देवीचे चरणकमल इतके गुणी, इतके सुंदर आहेत, की त्यांची बरोबरी कमळे करूच शकणार नाहीत. देवीची चरणकमले ही अद्वितीय आहेत, हेच या श्लोकात कवीने सूचित केले आहे.

बरोबरच आहे ते. कमळ हिमवर्षावाने लगेच कोमेजते. ते रात्री मिटून राहते. नाही म्हणायला त्यांनी लक्ष्मीची थोडी कृपा संपादन केली आहे खरी. पण एवढ्याच गोष्टीवरून प्रत्यक्ष देवीच्या चरणांशी त्यांची कशी तुलना करता येईल ?

देवी हिमकन्या, त्यामुळे तिचे वास्तव्य हिमालयात. सदैव बर्फातच पावले असणार. पुन्हा ती पावले सदैव, अगदी दिवसरात्र सतेज राहणारी व भक्तांना आपला कृपासौरभ सदैव देणारी आहेत. मग अशा प्रत्यक्ष बर्फात राहून सदैव सतेज, गंधयुक्त राहणाऱ्या या चरणकमळाची, बर्फवृष्टीने लगेच कोमेजणाऱ्या, रात्री मिटणाऱ्या कमळांशी तुलना करणे, चुकीचेच आहे, यात शंकाच नाही. म्हणूनच अशा चरणकमळांनी कमळांना हरविले यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. ।। ८७ ।।


### श्लोक

**पदं ते कीर्तीनां प्रपदमपदं देवि विपदां**
**कथं नीतं सद्भिः कठिनकमठीकर्परतुलाम् ।**
**कथं वा बाहुभ्यामुपयमनकाले पुरभिदा**
**यदादायन्यस्तं दृषदि दयमानेन मनसा ।।८८।।**

### अर्थ

हे देवी, तुझी पावले म्हणजे सर्व कीर्तीचे आश्रयस्थान, संकटांनी कधीही न स्पर्शिलेली ( संकटमुक्त करणारी ), ( असे असताना ) विवाहकाली शंकरानी उचलून दगडी पायरीवर ठेवलेली, ( एवढ्यानेच ) हे सूक्ष्म दृष्टीने पाहणारे कवी त्याची तुलना यःकश्चित दगडाशी कशी काय करतात ? ।। ८८ ।।

### यंत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर अगर चांदीच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : १०८ दिवस. जपसंख्या : दररोज १००८ वेळा.
नैवेद्य : गुळाची खीर, फळे व नारळ. फलप्राप्ती : जनावरांपासून रक्षण.

## विवेचन

काही कवी देवीच्या पायाची तुलना, कासवाच्या पाठीशी करतात. देवीचे पाय हे साक्षात् सर्व कीर्तीच्या अग्रस्थानी असताना, व भक्तांची सर्व संकटे दूर करण्यास समर्थ असताना, अशा पायांची तुलना यःकश्चित दगडी तुकड्यासारख्या पदार्थांशी करताना पाहून कवीला हे चमत्कारिक वाटते. म्हणूनच तो कवी अशी तुलना करण्यास का धजावतात, असे म्हणतो.

त्याची उपपत्ती कवी अशी लावतो. विवाहकाली शंकरांनी देवीस अविचारी-पणाने दगडावर उभी केली होती. म्हणूनच कदाचित् हे मूर्ख लोक देवीच्या चरणाची तुलना, दगडासारख्या पदार्थांशी करण्यास धजत असावेत. एरवी ही अनुचित गोष्ट करण्याची त्यांना हिंमत झाली नसती. ॥ ८८ ॥


## श्लोक

नखैर्नाकस्त्रीणां करकमलसंकोचशशिभि-
स्तरूणां दिव्यानां हसत इव ते चण्डि चरणौ ।
फलानि स्वःस्थेभ्यः किसलयकराग्रेण ददतां
दरिद्रेभ्यो भद्रां श्रियमनिशमह्नाय ददतौ ॥ ८९ ॥

## अर्थ

हे चण्डी, आपल्या बोटांसारख्या धुमाऱ्यानी स्वर्गातील ( इच्छातृप्त ) जीवांना मनोवांछित फळे देणाऱ्या कल्पवृक्षाकडे पाहून, ज्याच्या दर्शनाने देवांगनांचे करकमल मिटतात ( जोडले जातात ) अशी चन्द्रासम ( तेजस्वी ) नखे असणारे, गरीब ( व म्हणूनच गरजू ) लोकांना केव्हाही व तत्काल ( इच्छिलेल्यापेक्षा जास्तच ) द्रव्यदान करणारे तुझे पाय, हसतात. ॥ ८९ ॥

## यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर अगर विभूतीने काढावे.

अनुष्ठान : ३० दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : गुळाची खीर, व मध. फलप्राप्ती : रोगहरण.

### विवेचन

या श्लोकातील गर्भित उपहास खरोखर वाखाणण्यासारखा मननीय आहे. कल्पवृक्ष हा स्वर्गातील वृक्ष आहे. जो या झाडाखाली जे जे मागेल ते ते त्याला हा कल्पवृक्ष तत्काळ देत असतो. पण हा कल्पवृक्ष असतो स्वर्गात. तेव्हा याच्या जवळ जाणारे लोक म्हणजे स्वर्गलोकातील देवच. अता या सदा तुष्ट लोकांना या कल्पवृक्षापाशी मागण्यासारखे असे स्वर्गांत उपलब्ध नसलेले काहीच नाही. म्हणजे ज्या ठिकाणी दैन्यच नाही, तेथे हा कल्पवृक्ष असला काय आणि नसला काय सारखेच. ज्या मर्त्य मानवाना दैन्य, विवचना ग्रासतात, त्यांना या वृक्षाजवळ जाता येत नाही. त्या मानवांना मात्र खरोखर गरजू असूनही या वृक्षाचा उपयोग शून्यच. पण देवीच्या चरणाचे मात्र तसे नाही. देवीच्या चरणांजवळ जो जे मागेल, त्याला देवीचे चरण तत्काळ इच्छित वस्तू प्राप्त करून देतात. या त्याच्या गुणविशेषामुळेच, चन्द्राचे देदीप्यमान कांतियुक्त नखे असलेले देवीचे चरण, या कल्पवृक्षाकडे पाहून हसतात. मर्त्य मानवाच्या दृष्टीने देवीच्या चरणकमलाना, इच्छित प्राप्त करून देणारे म्हणून गौरवाचे स्थान आहे. पण कल्पवृक्ष इच्छित देणारा असूनही मर्त्य मानवाला त्याचा उपयोग काहीच होत नसल्यामुळे, काडीचेही स्थान नाही.

### श्लोक


**ददाने दीनेभ्यः श्रियमनिशमाशानुसदृशी-**
**ममन्दं सौन्दर्यप्रकरमकरन्दं विकिरति ।**
**तवास्मिन्मन्दारस्तबकसुभगे यातु चरणे**
**निमज्जन्मज्जीवः करणचरणः षट्चरणताम् ॥ ९० ॥**

### अर्थ

सर्वत्र विपुल मधाप्रमाणे सौंदर्यतेज पसरणाऱ्या मंगलदायक मांदार पुष्पगुच्छाप्रमाणे गरजू जनांस इच्छेनुसार ऐश्वर्य देणाऱ्या अशा तुझ्या चरणपुष्पात,

सहा इन्द्रिये पायाप्रमाणे धारण केलेला ( षडेंद्रिययुक्त ) माझा आत्मा, एखाद्या ( षट्पद ) मधमाशीप्रमाणे, ( मधमाशी जशी फुलात गुंतून पडते तशी ) त्यात ( तुझ्या चरणात ) गुंतून पडू दे ॥ ९० ॥

### यंत्र



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ३० दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : दुधाची खीर व मध.

फलप्राप्ती : जादूटोणा उलटविणे, सर्व इच्छा पूर्ण होणे.

### विवेचन

या श्लोकात कवी देवीला काकुळतीने विनंती करतो:: " हे माते, माझे चित्त तुझ्या पायी सदैव रमू दे. तुझ्या चरणभक्तीशिवाय दुसरा कोणताही विषय माझ्या मनात न येऊ दे.

या विनतीसाठी, कवीने देवीस मांदारपुष्पाची व स्वतःस मधमाशीची उपमा घेतली आहे. मादाराची फुले ही मंगलदायक मानली जातात. त्यांच्या सुगधामुळे मधमाशी ज्याप्रमाणे त्या फुलांत गुतून राहते, तसाच हा तुझा भक्त या तुझ्या चरणपुष्पात सदैव राहू दे ॥ ९० ॥

### श्लोक

**पदन्यासक्रीडापरिचयमिवारब्धुमनस-**
**श्चरन्तस्ते खेलं भवनकलहंसा न जहति ।**
**स्वविक्षेपे शिक्षां सुभगमणिमञ्जीररणित-**
**च्छलादाचक्षाणं चरणकमलं चारुचरिते ॥ ९१ ॥**

## अर्थ

हे राजरथारूढ देवी, रत्नखचित नूपुरांच्या किणकिणाटाच्या तालावर पदन्यासाचे धडे देणाऱ्या तुझ्या चरणयुग्मांना, तुझ्या पदन्यासाचा हस्तखेळता जणू अभ्यासच करणारी तुझी ( पाळीव ) हंसांची जोडी, क्षणभरही सोडीत नाही ॥ ९१ ॥

## यंत्र



## उपासना

यंत्र व श्लोक सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या दररोज १००० वेळा.

नैवेद्य : दुधाची खीर. फलप्राप्ती : जमीन, संपत्तिप्राप्ती.

## विवेचन

या श्लोकात देवीचे पाय, चालताना किती डौलदारपणे पडतात, हे कवीने सांगितले आहे. हंस पक्षी हे त्याच्या डौलदार, लयबद्ध चालीविषयी प्रसिद्ध आहेत. पण ते देखील देवीच्या पदन्यासाचा अभ्यास करून, धडे गिरवितात. ॥ ९१ ॥


## श्लोक

**गतास्ते मञ्चत्वं द्रुहिणहरिरुद्रेश्वरभृतः**
**शिवः स्वच्छच्छायाघटितकपटप्रच्छदपटः ।**
**त्वदीयानां भासां प्रतिफलनरागारुणतया**
**शरीरी शृङ्गारो रस इव दृशां दोग्धि कुतुकम् ॥ ९२ ॥**

## अर्थ

द्रुहिण, विष्णू, रुद्र, आणि ईश्वर, तुझे चाकर, मचक झालेले बनून, त्यावरील तुझ्या ( आरक्त ) तेजाने आरक्त बनलेला शिवरूपी पलंगपोस पाहून, ( हा शृंगाराचाच एक खेळ आहे ह्या कल्पनेने ) शृंगारिक भावोत्पत्तीमुळे, हे दृश्य तुझ्या डोळ्यांचे सुखच बनले आहे. ॥ ९२ ॥

### यत्र




### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे, अगर विभूतीने काढावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज २००० वेळा.
नैवेद्य : तऱ्हेतऱ्हेचे मसाला—भात. दूध, दुधाची खीर व पान-सुपारी.
फलप्राप्ती : राज्यप्राप्ती, दुष्ट योनींपासून रक्षण.

### विवेचन

या श्लोकात, सदाशिव तत्त्वात समाविष्ट असणारे चार देव मंचक बनतात. त्यावर पलंगपोसरूपाने शिव आच्छादन तयार करतो. त्यावर शक्तीचे स्थान आहे, असे कवींने म्हटले आहे.

यातील गर्भित अर्थ, शिवशक्ती संयुक्त होऊन श्रीचक्राचे बिंदव-स्थानात राहतात हा आहे. भूपुरांच्या चार दरवाजावर माया, शुद्धविद्या, महेश्वर व सदाशिव ही चार तत्त्वे असतात. याच मचकावर केन्द्रस्थानी शिवशक्ती असते, हे सूचित केले आहे. ॥ ९२ ॥

### श्लोक


**अराला केशेषु प्रकृतिसरला मन्दहसिते**
**शिरीषाभा गात्रे दृषदिव कठोरा कुचतटे ।**
**भृशं तन्वी मध्ये पृथुरपि वरारोहविषये**
**जगत्त्रातुं शंभोर्जयति करुणा काचिदरुणा ॥ ९३ ॥**

### अर्थ

कुरळ्या केसाची, निर्व्याज मधु हास्य करणारी, शिरिष वृक्षासारखी ( कोमल ) शरीरयष्टीची, दगडासारखी टणक वक्षस्थळे असणारी, कमरेत अति

कृशांगी, पण ( कृश कमरेखाली ) विशालनितंबिनी, जणू शिवाची प्रियप्रतिमाच अशी ही सर्वश्रेष्ठ अरुणा ( कामेश्वरी ), जगाच्या कल्याणासाठीच शंकरावर विजय मिळविते. ॥ ९३ ॥

**यंत्र**




**उपासना**

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.
अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.
नैवेद्य : मध. फलप्राप्ती : सर्व इच्छा पूर्ण होणे.

**विवेचन**

या श्लोकात देवीला अरुणा ( कामेश्वरी ) असे संबोधून देवीच्या विविध अवयवांची सौंदर्यस्तुती करून, अशी देवी या जगदुत्पत्तीसाठी शंकरावर विजय मिळविते, शंकराला मोहात पाडून कार्यरत करते, म्हणूनच हे जग चालले आहे असे कवीने सूचित केले आहे. ॥ ९३ ॥

**श्लोक**


**समानीतः पद्भ्यां मणिमुकुरतामम्बरमणि–**
**र्भयादास्यादन्तः स्तिमितकिरणश्रेणिमसृणः ।**
**दधाति त्वद्वक्त्रप्रतिफलनमश्रान्तविकचं**
**निरातङ्कं चन्द्रान्निजहृदयपङ्केरुहमिव ॥९४॥**

**अर्थ**

तुझ्या पायांशी स्थान असलेला, जणू स्फटिकातून कोरलेला आरसाच असा सूर्य, तुझे मुखकमल म्हणजे चंद्राच्या साहचर्याचाही ( तुझ्या कृपेमुळे ) परिणाम न झालेले सदैव विकसित असे आपले हृदयकमलच, असे मानून,

(जळण्याच्या भीतीने ) आपले प्रखर किरण सौम्य करून, ( तुझे मुख ) प्रतिबिंबित करतो. ॥ ९४ ॥

**यंत्र**




**उपासना**

**विवेचन**

सूर्य हा देवीचा उपासक आहे. त्याच्या आरशासारख्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झालेला देवीचा चेहरा, त्याच्या हृदयकमळात आपला ठसा उमटवितो, हेच या श्लोकात, कवीने सूचित केले आहे. ॥ ९४ ॥


**श्लोक**

**कलङ्कः कस्तूरी रजनिकरबिम्बं जलमयं**
**कलाभिः कर्पूरैर्मरकतकरण्डं निबिडितम् ।**
**अतस्त्वद्भोगेन प्रतिदिनमिदं रिक्तकुहरं**
**विधिर्भूयो भूयो निबिडयति नूनं तव कृते ॥ ९५ ॥**

**अर्थ**

हे देवी, ( तुझ्या प्रसादनसाहित्यातील ) कस्तुरी म्हणजे चन्द्रावरील काळा डाग. चन्द्राभोवतालचे जलसदृश तेजोवलय म्हणजे पाचूचा करंडक त्यांत असलेल्या चन्द्रकला म्हणजे शुद्ध कापराचा तुकडा. तुझ्या वापरामुळे रिकामा झालेला करंडक विधाता ( ब्रह्मदेव ) रोजच्या रोज ( देवीचा दिवस म्हणजे एक चान्द्रमास ) पुन्हा भरून ठेवत असतो. ॥ ९५ ॥

**यंत्र**



### उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून ध्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज २००० वेळा.

नैवेद्य : पोंगल, नारळ व फळे. फलप्राप्ती : इच्छापूर्ती.

### विवेचन

आतापर्यंतच्या श्लोकांत देवीच्या सौंदर्याचे वर्णन केल्यावर, कवी आता देवीच्या सौंदर्यप्रसादनाबद्दल लिहितो.

देवी रोज प्रसादनासाठी कस्तुरीचा व कापराचा उपयोग करते. चंद्रावरचा काळा डाग हीच देवीची कस्तुरी, तर चन्द्र म्हणजेच देवीचा कापूर देवी हे प्रसादनसाहित्य ज्यात ठेवते तो करडक आहे पाचूसारख्या, चन्द्राभोवताळच्या तेजस्वी प्रकाशवलयाचा. देवी हे प्रसादनसाहित्य रोजच वापरते. त्यामुळे ते संपत चालले, की देवीचा नोकर ब्रह्मदेव तो करडक पुन्हा भरून ठेवतो.

चन्द्राच्या कला दर तिथीला कमी होत, शेवटी अमावस्येला चद्र पूर्ण अदृश्य होतो. त्यानंतर प्रत्येक दिवशी चन्द्र कलेकलेने वाढत पौर्णिमेला पूर्ण होतो. या गोष्टीवरच, हा श्लोक आधारित आहे. देवीचा दिवस पौर्णिमेपर्यंत असा चान्द्रमास येथे धरला आहे. ॥ ९५ ॥


### श्लोक

**पुरारातेरन्तःपुरमसि ततस्त्वच्चरणयोः**
**सपर्यामर्यादा तरलकरणानामसुलभा ।**
**तथा ह्येते नीताः शतमखमुखाः सिद्धिमतुलां**
**तव द्वारोपान्तस्थितिभिरणिमाद्याभिरमराः ॥९६॥**

### अर्थ

हे देवी, त्रिपुरांचा नाश करणाऱ्या ( महापराक्रमी ) शंकराची तू पत्नी. म्हणूनच, ( शंकराचा एकान्तभंग होण्याच्या भीतीने ) दुर्बळ मनाच्या जनास तुझी चरणभक्ती करणे अवघड. यासाठीच हे देव शतमखास ( इन्द्रास ) आपला नेता करून, अणिमा, लघिमादि योगविद्येच्या पक्तीत तुझ्या दाराशी तिष्ठत असतात. ॥ ९६ ॥

## यंत्र




## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ३ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १०८ वेळा.

नैवेद्य : गूळ. फलप्राप्ती  जखमा भरून येणे.

## विवेचन

देवीच्या सान्निध्याने देवांना सर्व सिद्धी प्राप्त होतात, हे मोठ्या मजेशीरपणे या श्लोकात कवीने सांगितले आहे.

शंकरांच्या एकान्ताचा भंग करून, देवीच्या प्रासादात देवीदर्शनासाठी शिरायला खुद्द देवही घाबरतात. मग हे कृत्य करायला यःकश्चित मानव कसा धजू शकणार. देवीच्या दर्शनाऐवजी एकान्तभंग झाल्यास क्रुद्ध झालेल्या शंकराना तोंड देण्याची वेळ यायची. त्यामुळेच इन्द्राला पुढे करून त्याच्यासहित सर्व देव, देवीचे प्रासादाबाहेर दर्शनासाठी तिष्ठत उभे राहतात. आणि त्याचे फळ म्हणूनच की काय, त्यांना सिद्धी ( देवीच्या दासी ) प्राप्त होतात. ॥९६॥

## श्लोक


**कलत्रं वैधात्रं कतिकति भजन्ते न कवयः**
**श्रियो देव्याः को वा न भवति पतिः कैरपि धनैः ।**
**महादेवं हित्वा तव सति सतीनामचरमे**
**कुचाभ्यामासङ्गः कुरवकतरोरप्यसुलभः ॥९७॥**

## अर्थ

कोणत्या व किती कवींनी विधातापत्नी ( सरस्वती ) शी सलगी केली नाही ? थोडेसेही धन, संपदा असणारा लक्ष्मीपती बनतो. ( पण ) हे पतिव्रते,

एकट्या शंकराशिवाय, दुसऱ्या कोणालाही, अगदी कुरवक वृक्षालासुद्धा तुझे प्रेमालिंगन मिळणार नाही. ॥ ९७ ॥

### यंत्र




### उपासना

पाढऱ्या आरकाच्या फळीवर, हळदीने काढणे व त्याचा टिळा कपाळावर लावणे.

अनुष्ठान : १० दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : मध व दुधाची खीर. फलप्राप्ती : ज्ञानप्राप्ती.

### विवेचन

या श्लोकात लक्ष्मी सरस्वतींना चंचल बुद्धीच्या ठरविण्यात, कवीचा हेतू देवीची महती वाढविण्याचाच आहे. ॥ ९७ ॥

### श्लोक


**गिरामाहुर्देवीं द्रुहिणगृहिणीमागमविदो**
**हरेः पत्नीं पद्मां हरसहचरीमद्रितनयाम् ।**
**तुरीया कापि त्वं दुरधिगमनिःसीममहिमा**
**महामाया विश्वं भ्रमयसि परब्रह्ममहिषि ॥९८॥**

### अर्थ

हे परब्रह्माच्या पट्टराणी, आगम तंत्रोपासक, वर्णदेवता सरस्वती, विधातापत्नी, म्हणून तुझीच पूजा करतात. विष्णुपत्नी पद्मा म्हणून, हिमगिरिकन्या, शंकराची सहचरी 'पार्वती' म्हणूनही तुलाच संबोधतात. दुष्प्राप्य तुरिय अवस्थारूप होऊन तूच जगाला संभ्रमित करतेस, तर आपल्या अमर्याद वैभवाने

तूच जगाची सर्वश्रेष्ठ अधिष्ठात्री, मांगल्याचे जणू कारंजेच, (अशी तूच) बनतेस. ॥ ९८ ॥

## यंत्र




## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर, अगर तांब्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे. अगर पाण्याच्या भाड्यात काढावे.

अनुष्ठान : ८ दिवसांचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : शिजविलेला भात व मध.

फलप्राप्ती : शारीरिक ताकद व पौरुषत्ववृद्धी.

## विवेचन

या श्लोकात देवीचे सर्वव्यापित्वच कवीने वर्णिले आहे. उपासकाच्या कल्पनेप्रमाणे ती वेगवेगळी रूपे घेत असली, तरी या सर्व रूपांत देवी एकच. सर्व चराचरात देवीचे अस्तित्व रूपातरित स्थितीत आहे; हेच तत्त्व या श्लोकात दाखविले आहे. ॥ ९८ ॥

## श्लोक


**समद्भूतस्थूलस्तनभरमुरश्चारु हसितं**
**कटाक्षे कंदर्पाः कतिचन कदम्बद्युति वपुः ।**
**हरस्य त्वद्भ्रान्ति मनसि जनयन्ति स्म विमला**
**भवत्या ये भक्ताः परिणतिरमीषामियमुमे ॥ ९९ ॥**

## अर्थ

हे उमा, भरदार उरोज, मंत्रमुग्ध करणारे हास्य, रतिसम तिरपा कटाक्ष, कदंब वृक्षासारखी शरीरयष्टी, अशा (गुण) समुच्चयाने, शंकराच्या मनात तुझी

मूर्ती उभी राहते. कोणीही तुझा भक्त असो, त्याची पूर्तता (अशा तुझ्या सगुण रूपांतच) यातच आहे. ॥ ९९ ॥

### यंत्र




### विवेचन


देवीचे अवयवांचे वैशिष्ट्य वर्णन करून, अशा वर्णनाची देवीची मूर्ती मनात कल्पून उपासना करणारा साधक शेवटी कशा स्वरूपाचा बनतो, हेच या श्लोकात सांगितले आहे. देवीची सगुण उपासना करणारा साधक अखेर तिच्या रूपातच मिळून जातो. ॥ ९९ ॥

### श्लोक

**कदा काले मातः कथय कलितालक्तकरसं**
**पिबेयं विद्यार्थी तव चरणनिर्णेजनजलम् ।**
**प्रकृत्या मूकानामपि च कविताकारणतया**
**यदाधत्ते वाणीमुखकमल ताम्बूलरसताम् ॥ १०० ॥**

### अर्थ

हे माते सांग, तुझ्या अळित्याने रंगविलेल्या पायांना स्नान घालण्याने, मुक्याबहिऱ्यांनीही सेवन केल्याने त्यांना कवी बनविणाऱ्या सरस्वतीच्या मुखातील तांबूल रसाप्रमाणे, आरक्त बनणारे (पादोदक) तीर्थ, ज्ञानेच्छू असा मी (तुझा भक्त) कधी बरे प्राशन करीन ? ॥ १०० ॥



## उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे, अगर विभूतीने काढावे.
अनुष्ठान : ४५ दिवसाचे. जपसंख्या : दररोज २००० वेळा. नैवेद्य : मध.
फलप्राप्ती : रोगमुक्ती, पौरुषत्ववृद्धी व सुपीकता येणे. ( फलधारणक्षमता ).

## विवेचन

" हे देवी, तुझा कृपाप्रसाद मला केव्हा लाभेल ते सांग " अशी आर्त विनवणी, कवीने या श्लोकात केली आहे. सरस्वतीच्या मुखातील उच्छिष्ट तांबूलरस सेवन केल्याने, मुके लोकसुद्धा श्रेष्ठ कवी बनतात, अशी पुराणात कल्पना आहे. देवीच्या पायाचे तीर्थ, अळित्याच्या रंगाने, ताबूल रसाप्रमाणेच लाल बनते. सरस्वतीच्या मुखातील असाच लाल रस ग्रहण करण्याने मुके सुद्धा कवी होऊ शकतात, तर हे ताबूलसदृश पादोदक पिण्याने मी ज्ञानी होईनच होईन. म्हणूनच देवी, तुझ्या पादोदकाने मी त्वकर ज्ञानी होऊ दे, मला आत्मज्ञान प्राप्त होऊ दे व त्यायोगे मी जीवन्मुक्त होऊ दे अशी विनवणी कवी देवीपाशी करतो. ॥ १०० ॥


## श्लोक

**सरस्वत्या लक्ष्म्या विधिहरिसपत्नो विहरते**
**रतेः पातिव्रत्यं शिथिलयति रम्येणवपुषा ।**
**चिरं जीवन्नेव क्षपितपशुपाशव्यतिकरः**
**परानन्दाभिख्यं रसयति रसं त्वद्भजनवान् ॥ १०१ ॥**

## अर्थ

हे देवी, ( तुझ्या कृपाप्रसादानें ) तुझे भक्त, ब्रह्माविष्णूच्या अर्धांगी सरस्वती-लक्ष्मीसह प्रेमक्रीडा करतात. ( ज्ञानी, धनवान बनतात. ) आपल्या सुंदर शरीरयष्टीने रतीचे मन विचलित करतात. ( तुझ्या कृपेने ) चिरंजीव, अमर बनून ( सामान्य, मर्त्य मानवाला अज्ञात असा ) परमानंदाचा चिरकाल उपभोग घेतात. ॥ १०१ ॥

यंत्र



उपासना

यंत्र सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : १६ दिवसाचे. जपसंख्या : दररोज १००० वेळा.

नैवेद्य : त्रि-मधुरा, उडदाचे वडे व फळे. फलप्राप्ती : शौर्यलाभ.

विवेचन

या श्लोकात देवीची कृपा संपादन करण्याने, साधक ज्ञानी, धनवान, रूपवान बनतो, हे सूचित केले आहे.

या श्लोकात साधक समयामार्गे उपासनेने सहस्त्रार चक्रांत देवीची उपासना करून कैवल्याची प्राप्ती करतो हे दर्शविले आहे. ही गुप्त विद्या साधकाने गुरु-मुखातूनच घ्यावयाची असते. ॥ १०१ ॥

श्लोक

**निधे नित्यस्मेरे निरवधिगुणे नीतिनिपुणे**
**निराघाटज्ञाने नियमपरचित्तैकनिलये ।**
**नियत्या निर्मुक्ते निखिलनिगमान्तस्तुतपदे**
**निरातङ्के नित्ये निगमय ममापि स्तुतिमिमाम् ॥१०२॥**

अर्थ

हे रत्नांच्या खाणी, सदैव हास्ययुक्त, अमर्याद गुणी, न्यायनीतिनिपुण, ज्ञानाचे अखंड कारंजेच, शांत-स्थिर चित्तात वास करणारी, निसर्गनियमातीत, उपनिषदांनी चरण भूषविलेली, उपाधिरहित, नित्या अशी तू, माझेही ( तुझ्या या भक्ताचे ) हे स्तुतिकाव्य ( पुष्प ) पवित्र ( स्वीकारणीय ) मानून घे. ॥१०२॥

विवेचन

या श्लोकात देवीला रत्नाच्या खाणीची उपमा दिली आहे व तिच्या अंगी

कोणत्या प्रकारची रत्ने आहेत, याची कवीने या श्लोकात कल्पना दिली असून, ही सेवा, हे स्तुतिकाव्य गोड मानून घेण्याबद्दल विनविले आहे. ॥ १०२ ॥


### श्लोक

**प्रदीपज्वालाभिर्दिवसकरनीराजनविधिः**
**सुधासूतेश्चन्द्रोपलजललवैरर्घ्यरचना ।**
**स्वकीयैरम्भोभिः सलिलनिधिसौहित्यकरणं**
**त्वदीयाभिर्वाग्भिस्तव जननि वाचां स्तुतिरियम् ॥ १०३**

### अर्थ

हे शब्दवैभवाच्या जननी, तुझ्याचपासून उत्पन्न झालेल्या शब्दांनी तुझेच हे स्तुतिकाव्य रचणे, म्हणजे सूर्याला निरांजनाने ओवाळणे, चन्द्राला द्रवलेल्या चन्द्रकांत मण्यातील पाण्याचा (किंवा) जलनिधी सागराला पाण्याचा अर्घ्य देण्यासारखेच आहे. ॥ १०३ ॥

### यंत्र



### उपासना

सोन्याच्या पत्र्यावर कोरून घ्यावे.

अनुष्ठान : ४५ दिवसांचे. जपसंख्या : एकूण १ लाख.

नैवेद्य : फळे, व नारळ. फलप्राप्ती : इच्छित वस्तू प्राप्त होणे.

### विवेचन

साधक, उपासना कर्म केल्यावर ते परब्रह्माला अर्पण करतो. त्याचप्रमाणे देवीच्या इच्छेने, देवीनेच तयार करवून घेतलेली ही उपासना, ही सेवा, कवी देवीला अर्पण करतो. ॥ १०३ ॥

—०—

## ज्योतिर्महर्षी अ. ल. भागवतांचे लोकप्रिय ग्रंथ

### ( १ ) हस्तरेषादर्पण

हर्षेल व नेपच्यून या ग्रहाची हातावरील स्थाने जगात प्रथम या ग्रंथातुन निश्चित केली गेली. बॉम्बे ॲरिस्टॉलाजिकल सोसायटीने Most original contribution to the science of Palmistry असा खास गौरव करून पहिले बक्षिस दिले. **किंमत ५ रु.**

### ( २ ) मोहिनीविद्या साधना व सिद्धी

मोहिनीविद्या म्हणजे नुसते झोप आणण्याचे शास्त्र नसून, मानवी जीवनात अन्य व्यक्तीला वश कसे करून घ्यावे, सर्व जगाला आपले गुलाम कसे बनवावे वगैरे आश्चर्यकारक सिद्धी प्राप्त कशा करून घ्याव्यात. आपल्या मनात असलेले सकल्प कसे सिद्ध करावेत, दुःखावर संकटावर मात कशी करावी व जीवन कसे सुखी करावे वगैरे गोष्टींचा पूर्ण प्रपच करण्यात आला आहे. या ग्रथात इच्छाशक्ती वाढविण्याच्या अनेक गुप्त क्रिया, प्राणायाम, त्राटक, न्यास, मानसपूजा इत्यादींचा समावेश केला आहे. यातील काही अतिशय गुप्त साधना गुरुकृपेने प्राप्त झाल्या असून त्यांच्या आज्ञेनेच त्या प्रथम प्रकट केल्या आहेत.

( दुसरी आवृत्ती ) **किंमत १५ रु.**

### ( ३ ) तुमचा आजचा दिवस कसा जाईल ?

मुबई, सांगली बाजारभावाचे शुभांक ततोतत खरे ठरतात असा अनेक वाचकाचा अनुभव. **किंमत १० रु.**

* * *

## मंत्रशास्त्रज्ञ द. शं. केळकरांचे गाजलेले ग्रंथ.

### ( १ ) ज्योतिषशास्त्र आणि तुमचे भाग्य

या ग्रथात तुमच्या जन्मतारखेवरून तुमच्या सर्वायुष्याचे भविष्य दिले असून, अत्यत उपयुक्त मार्गदर्शन केले आहे. **किंमत ३ रुपये.**

### ( २ ) तीळ अन् तुमचे भाग्य.

तुमच्या शरीरावरील तिळावरून आपण आपले भाग्य पडताळू शकाल.

**किंमत २ रुपये.**

### ( ३ ) श्रीगणेश-उपासना.

सामान्य स्त्री-पुरुषाना देवाची सहज पूजा करता यावी तसेच मंत्रजपाने देवाला प्रसन्न करून घेऊन इच्छित साध्य करता यावे हा या ग्रंथाचा मूळ उद्देश

आहे. आर्त भक्ताच्या तक्रारी व दुःखे दूर व्हावी म्हणून पाच हजार वर्षांपूर्वी दक्षिण भारतात ताडपत्रावर लिहिलेले दुर्मिळ मंत्र या ग्रंथात दिलेले आहेत.

**किंमत १ रुपाया**

## ( ४ ) श्रीगणेश सहस्रनामस्तोत्रम्

सकाळी ब्राह्ममुहूर्ताला याचे वाचन केल्यास व्यक्तीला सुख, आरोग्य, आयुष्य, बळ यश प्राप्त होते त्याची बुद्धी तीव्र होते. शाकिनी डाकिनी ग्रह यांचे भय नाहीसे होते. काहींना त्रिकाल ज्ञान होते. मनोरथ पूर्ण होतात.

**किंमत ५० पैसे**

## ( ५ ) तुमचे रोग बरे करणारी बारा औषधे.

या ग्रंथात ज्योतिषशास्त्रीय दृष्टिकोनातून तुम्हाला होणाऱ्या संभाव्य रोगाचे निदान व त्यावर अचूक औषधी उपचार सुचविले आहेत. **किं. २ रु. ५० पैसे**

## ( ६ ) तुमचे बाळ अन् त्याची निगा

तुमच्या बाळाची निगा कशी राखाल याची सर्वांगीण चर्चा केली आहे.

**किंमत १ रु. ५० पैसे**

## लवकरच प्रसिद्ध होत आहेत,

## ज्योतिषाचार्य, मंत्रशास्त्रज्ञ द. शं. केळकरांचे दोन नवे ग्रंथ.

## ( १ ) श्रीउपासना

ऋग्वेदापासून आर्थिक व सांसारिक जीवन सुखाचे व समृद्धीचे कसे करावे याविषयी सांगोपांग चर्चा या ग्रंथात केली आहे.

## ( २ ) दुर्गासप्तशती

### ( मराठी भाषांतरासहित )

या ग्रंथात ( १ ) सप्तश्लोकीदुर्गा ( २ ) श्रीदुर्गाष्टोत्तरनामस्तोत्रम् ( ३ ) पाठविधी ( ४ ) देव्याकवचम् ( ५ ) अर्गलास्तोत्रम् ( ६ ) कीलकम् ( ७ ) वेदोक्त रात्रीसूक्तम् ( ८ ) तन्त्रोक्तं रात्रीसूक्तम् (९) श्रीदेव्यथर्वशीर्षम् (१०) नवार्णविधी. ( ११ ) श्रीदुर्गासप्तशती. ( १२ ) ऋग्वेदोक्तं देवीसूक्तम् ( १३ ) तन्त्रोक्तं देवीसूक्तम् ( १४ ) प्राधानिक रहस्यम् ( १५ ) मूर्तिरहस्यम् ( १६ ) क्षमाप्रार्थना. ( १७ ) श्रीदुर्गा-मानसपूजा. ( १८ ) दुर्गाद्वात्रिंशन्नाममाला. ( १९ ) देव्यापराधक्षमापनस्तोत्रम् ( २० ) सिद्धकुञ्जिकास्तोत्रम् ( २१ ) सप्तशतींचे काही सिद्ध सम्पुटमंत्र इत्यादि गोष्टींचा समावेश केला आहे.

## श्रीगजानन बुक डेपो प्रकाशन,

## दादर, मुंबई २८.

१८८३०


# श्रीभविष्यदर्शन

डिसेंबर १९७१ पासून **श्रीभविष्य दर्शन** हे मासिक आता नव्या स्वरूपात निघत आहे. आता या मासिकाचे संपादक, निवेदक ज्योतिषमहर्षी अ. ल. **भागवत** ( बी कॉम. सी. ए. ) हे आहेत. उमेदीतील ४० वर्षे ज्योतिषशास्त्र, सामुद्रिकशास्त्र, ब्रह्मविद्या, गूढविद्या व मंत्रतंत्र याचे अनेक साधुसंताकडून कणाकणाने ज्ञान मिळवून स्वतः साधना करून आता वयाच्या बासष्ठाव्या वर्षी ज्योतिषमहर्षी **अ. ल. भागवत** दरमहा सोप्या भाषेत आपणास मार्गदर्शन करीत आहेत. दिवसेंदिवस अस्थिर होत चाललेल्या जीवनाकडे पाहून प्रत्येक व्यक्ती भीतिग्रस्त व अस्वस्थ झालेली दिसून येते शरीरव्याधी, मृत्यूची भीती, दारिद्र्य व चिंता यावर मात करून जीवन सुखी कसे करावे; मानवी जीवनात यश कसे मिळवावे, अन्य व्यक्तीला वश कसे करून घ्यावे; सर्व जगाला आपले गुलाम कसे बनवावे वगैरे आश्चर्यकारक सिद्धी प्राप्त कशा करून घ्याव्यात; आपल्या मनात असलेले संकल्प सिद्ध कसे करावे; दुःखावर, संकटावर मात कशी करावी वगैरे गोष्टींचा पूर्ण प्रपंच या मासिकातून केला जाईल. या मासिकातून अपूर्व योगसाधना दिल्या जातील. श्री **भागवत** गुरुमुखाने प्राप्त झालेल्या अतिशय गुप्त साधना, मंत्रतंत्र, तोडगे व उपासना या मासिकातून नियमितपणे देणार आहेत.

धनलाभासाठी अचूक मार्गदर्शक सूचना, दरमहाचे उपासनेसह राशीभविष्य, इतर उपयुक्त माहितीसह उपासनेद्वारा प्रयत्नांना यशप्राप्तीसाठी सहाय्य करणारे संसारात राहून संकटावर मात करण्यास उपयोगी पडणारे, जीवनात झुंजार वृत्ती निर्माण करण्यास मदत करणारे या मासिकाचे स्वरूप राहील, महाराष्ट्राचे प्रख्यात ज्योतिषी श्री. श्री. के. केळकर, श्री. शांताराम आठवले, या व इतर नामवंत व्यक्तींचे लिखाण पण नियमितपणे या मासिकातून प्रसिद्ध होईल. हा तुमच्या कुटुंबात दरमहा येणारा एक सन्मित्र आहे. केव्हाही उपयोगी पडणारा–गरजेच्या वेळी धावून येणारा.

असा हा आपणा सर्वांस हवाहवासा वाटणारा श्रीभविष्यदर्शन भरपूर विशेषांकासह वार्षिक वर्गणी १५ रुपये भरल्यास दरमहा आपल्या घरी पाठविला जाईल. निश्चित अंक मिळविण्यासाठी आजच वर्गणीदार व्हा. वर्गणी म. ऑ. ने या पत्त्यावर पाठवावी :

**श्रीगजानन बुक डेपो कबुतरखाना, दादर, मुंबई २८.**

...का ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ८८७९ वि: ७९ंध
क्रमांक २२६६ नों दि: ३२७८२

REFBK-0018430